भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८

**(सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ३४)**

[१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The Employees' State Insurance Act, 1948

**(Act No. 34 of 1948)**

[*As in force on the 1st March, 1998*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२०००

**[ किंमत : रु. १२.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि एम्प्लॉईज स्टेट इन्स्युरन्स अॅक्ट, १९४८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक १, दिनांक ८ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ ३९ ते ८८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ८ ऑक्टोबर १९९८.

**रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Employees' State Insurance Act, 1948 as on the 1st March 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. I, Vol. 9, dated 8th October 1998 on pages 39 to 88.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2 Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it become the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 8th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८

कलमांचा क्रम

कलमे

## प्रकरण पहिले

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
२-क. कारखान्यांची व आस्थापनांची नोंदणी.

## प्रकरण दुसरे

### निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद

३. कर्मचारी राज्य विमा निगमाची स्थापना.
४. निगम घटित करणे.
५. निगमाच्या सदस्यांचा पदावधी.
६. फेरनियुक्ती किंवा फेरनिवड होण्याची पात्रता.
७. आदेश, निर्णय, इत्यादींचे अधिप्रमाणन.
८. स्थायी समिती घटित करणे.
९. स्थायी समितीच्या सदस्यांचा पदावधी.
१०. वैद्यकीय लाभ परिषद.
११. सदस्यत्वाचा राजीनामा.
१२. सदस्य म्हणून असण्याचे बंद होणे.
१३. निरर्हता.
१४. रिक्त पद भरणे.
१५. फी व भत्ते.
१६. महासंचालक व वित्त आयुक्त.
१७. कर्मचारी वर्ग.
१८. स्थायी समितीच्या शक्ती.
१९. विमेदार व्यक्तींचे आरोग्य इत्यादींबाबतच्या उपाययोजनांना चालना देण्याची शक्ती.
२०. निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद यांच्या बैठका.
२१. निगम व स्थायी समिती निष्प्रभावी करणे.
२२. वैद्यकीय लाभ परिषदेची कर्तव्ये.
२३. प्रधान अधिकाऱ्यांची कर्तव्ये.
२४. निगम इत्यादींच्या कृती या घटनेमध्ये दोष असल्याच्या कारणावरून विधिग्राह्य होत नाहीत.
२५. प्रादेशिक मंडळे, स्थानिक समित्या, प्रादेशिक व स्थानिक वैद्यकीय लाभ परिषदा.

## प्रकरण तिसरे

### वित्त व्यवस्था व लेखा परीक्षा

२६. कर्मचारी राज्य विमा निधी.
२७. (निरसित).
२८. कोणत्याही प्रयोजनांसाठी निधी खर्च करता येईल.
२८-क. प्रशासकीय खर्च.
२९. संपत्ती इत्यादी धारण करणे.

३०. निगमाकडे संपत्ती निहित होणे.

३१. (निरसित).

३२. अर्थसंकल्पीय अंदाज.

३३. हिशेब.

३४. लेखा परीक्षा.

३५. वार्षिक अहवाल.

३६. अर्थसंकल्प, लेखापरीक्षा झालेले हिशेब आणि वार्षिक अहवाल संसदेपुढे ठेवणे.

३७. मत्ता व दायित्व यांचे मूल्यांकन.

## प्रकरण चौथे

### अंशदाने

३८. सर्व कर्मचाऱ्यांचा विमा उतरविणे.

३९. अंशदाने.

४०. प्रधान नियोक्त्याने प्रथमतः अंशदान रकमा भरणे.

४१. निकटतम नियोक्त्याकडून अंशदानाची वसुली.

४२. अंशदानाच्या प्रदानाबद्दल सर्वसाधारण उपबंध.

४३. अंशदान प्रदानाची पद्धती.

४४. विवक्षित प्रकरणी नियोक्त्यांनी प्रतिवेदने सादर करणे आणि नोंदवह्या ठेवणे.

४५. निरीक्षकांचे कार्याधिकार व कर्तव्ये.

४५-क. विवक्षित प्रकरणी अंशदानाचे निर्धारण.

४५-ख. अंशदानाची वसुली.

४५-ग. वसुली अधिकाऱ्याकडे प्रमाणपत्र पाठविणे.

४५-घ. ज्याला प्रमाणपत्र द्यावयाचे तो वसुली अधिकारी.

४५-ङ. प्रमाणपत्राची विधिग्राह्यता आणि त्याचे विशोधन.

४५-च. प्रमाणपत्राखालील कार्यवाहीला स्थगिती आणि त्याची सुधारणा किंवा ती काढून घेणे.

४५-छ. वसुलीचे अन्य प्रकार.

४५-ज. आयकर अधिनियमाचे विवक्षित उपबंध लागू असणे.

४५-झ. व्याख्या.

## प्रकरण पाचवे

### लाभ

४६. लाभ.

४७. (वगळलेले).

४८. (निरसित).

४९. रुग्णता लाभ.

५०. प्रसुतीविषयक लाभ.

५१. विकलांगता लाभ.

५१-क. रोजगाराच्या ओघात उद्भवणाऱ्या अपघातांबाबत गृहीतक.

५१-ख. विनियम इत्यादींचा भंग करून काम करत असताना अपघात होणे.

५१-ग. नियोक्त्याच्या परिवाहनातून प्रवास करत असताना अपघात होणे.

५१-घ. संकटप्रसंगी काम करताना अपघात होणे.

५२. अवलंबित व्यक्तीला मिळणारा लाभ.
५२क. व्यवसायजन्य रोग.
५३. इतर कोणत्याही कायद्यान्वये भरपाई किंवा नुकसानी घेण्यास किंवा वसूल करण्यास आडकाठी.
५४. विकलांगतेच्या प्रश्नाबाबत निर्णय.
५४क. वैद्यकीय मंडळाकडे निर्णयार्थ निर्देशन आणि वैद्यकीय अपील अधिकरणांकडे व कर्मचारी विमा न्यायालयांकडे अपिले.
५५. वैद्यकीय मंडळाने किंवा वैद्यकीय अपील अधिकरणाने निर्णयांचे पुनर्विलोकन करणे.
५५क. अवलंबितांच्या लाभाचे पुनर्विलोकन.
५६. वैद्यकीय लाभ.
५७. वैद्यकीय लाभांची प्रमाणश्रेणी.
५८. राज्य शासनाकडून वैद्यकीय उपचारांची व्यवस्था.
५९. निगमाने रुग्णालये, इत्यादी स्थापन करणे व चालविणे.
५९क. राज्य शासनाऐवजी निगमाने वैद्यकीय लाभाची तरतूद करणे.

[सर्वसाधारण]

६०. लाभ अभिहस्तांकनीय किंवा जप्तीयोग्य असणार नाहीत.
६१. इतर अधिनियमांखाली लाभ प्रतिबंध.
६२. व्यक्तींना रोख रकमेचे लाभ परिवर्तीत करता येणार नाहीत.
६३. विवक्षित प्रकरणी व्यक्तींना लाभ मिळण्याचा हक्क असणार नाही.
६४. आजारपण किंवा विकलांगता लाभ स्वीकारणाऱ्या व्यक्तींनी शर्तींचे अनुपालन करणे.
६५. लाभ एकत्रित न करणे.
६६. (निरसित).
६७. (निरसित).
६८. प्रधान नियोक्ता कोणतेही अंशदान भरण्यास कसूर करील वा दुर्लक्ष करील त्याबाबतीत निगमाचा अधिकार.
६९. अत्याधिक रुग्णता लाभाबद्दल कारखाने इत्यादींच्या मालकांचे किंवा कार्यचालकांचे दायित्व.
७०. अयोग्य रीतीने मिळालेला लाभ परत करणे.
७१. मृत्यूच्या दिवसापर्यंत व तो दिवस जमेस धरून द्यावयाचा लाभ.
७२. नियोक्त्याने मजुरी कमी न करणे.
७३. नियोक्त्याने कर्मचाऱ्याला आजारपण इत्यादींच्या कालावधीत बडतर्फ न करणे किंवा शिक्षा न देणे.

प्रकरण पाचवे-क

**अस्थायी उपबंध**

७३क. नियोक्त्याचे विशेष अंशदान.
७३ख. जेथे कर्मचारी विमा न्यायालय नसेल तेथे, या प्रकरणाच्या कक्षेत येणाऱ्या वादांचा किंवा प्रश्नांचा निर्णय करण्यासाठी विशेष अधिकरणे.
७३ग. प्रकरण पाच खालील लाभ कर्मचाऱ्यांच्या अंशदानावर अवलंबून असणे.
७३घ. नियोक्त्याच्या विशेष अंशदानाची वसुली करण्याची रीत.
७३ङ. जादा माहिती किंवा प्रतिवेदन मागविण्याची शक्ती.
७३च. नियोक्त्याच्या विशेष अंशदानाच्या बाबतीत सूट देण्याची शक्ती फक्त केंद्र शासनाने वापरणे.
७३छ. या अधिनियमाचे विवक्षित उपबंध नियोक्त्याच्या विशेष अंशदानाबाबत लागू करणे.
७३ज. (निरसित).
७३झ. प्रकरण पाचवे-क याची मुदत.

## प्रकरण सहावे

### तंट्याचा व हक्क मागण्यांचा अभिनिर्णय

७४. कर्मचारी विमा न्यायालयाची घटना.
७५. कर्मचारी विमा न्यायालयाने ज्या बाबींवर निर्णय द्यावयाचा त्या बाबी.
७६. कार्यवाही दाखल करणे इत्यादी.
७७. कार्यवाहीचा प्रारंभ.
७८. कर्मचारी विमा न्यायालयाचे अधिकार.
७९. विधिव्यवसायी इत्यादींमार्फत उपस्थिती.
८०. (निरसित).
८१. उच्च न्यायालयाकडे निर्णयार्थ निर्देशन.
८२. अपील.
८३. अपील प्रलंबित असेपर्यंत रक्कम देणे स्थगित ठेवणे.

## प्रकरण सातवे

### शास्ती

८४. खोटे निवेदन केल्याबद्दल शास्ती.
८५. अंशदाने भरण्यात कसूर करणे, इत्यादींबद्दल शिक्षा.
८५क. पूर्व दोषसिद्धीनंतर विवक्षित प्रकरणी वाढीव शिक्षा देणे.
८५ख. नुकसानी वसूल करण्याची शक्ती.
८५ग. आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.
८६. खटले.
८६क. कंपन्यांनी केलेले अपराध.

## प्रकरण आठवे

### संकीर्ण

८७. कारखान्याला किंवा आस्थापनेला अथवा कारखान्यांच्या वा आस्थापनांच्या वर्गाला सूट.
८८. व्यक्तींना किंवा व्यक्तिवर्गाला सूट.
८९. निगमाने अभिवेदन करणे.
९०. शासनाच्या मालकीच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या कारखान्यांना किंवा आस्थापनांना सूट.
९१. अधिनियमाच्या एका वा अनेक उपबंधापासून सूट.
९१क. सूट भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी असणे.
९१ख. लाभांचा गैरवापर.
९१ग. नुकसान निर्लेखित करणे.
९२. निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.
९३. निगमाचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.
९३क. आस्थापनेचे हस्तांतरण झाल्यास त्या बाबतीतील दायित्व.
९४. निगमाला देय असलेली अंशदाने, इत्यादींना इतर गुणांपेक्षा अग्रक्रम देणे.
९४क. अधिकारांचे प्रत्यायोजन.
९५. नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.
९६. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.
९७. विनियम करण्याची निगमाची शक्ती.
९८. (निरसित).
९९. विमेदार व्यक्तींच्या कुटुंबासाठी वैद्यकीय शुश्रुषा.
९९क. अडचणी दूर करण्याची शक्ती.
१००. निरसने व व्यावृत्ती.

पहिली अनुसूची (वगळली).
दुसरी अनुसूची.
तिसरी अनुसूची.

# कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८

[1][सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ३४]

(१ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान) [१९ एप्रिल १९४८]

**आजारपण, प्रसुती आणि सेवाजन्य इजा यांच्या बाबतीत कर्मचाऱ्यांकरिता विवक्षित लाभांबाबत उपबंध करण्यासाठी व त्या संबंधातील विवक्षित इतर बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, आजारपण, प्रसुती व सेवाजन्य इजा यांच्या बाबतीत कर्मचाऱ्यांकरिता विवक्षित लाभांबाबत उपबंध करणे व त्या संबंधातील विवक्षित इतर बाबींकरिता उपबंध करणे समयोचित आहे.

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार [2]* * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास किंवा दिनांकाना [3]अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी आणि [4][वेगवेगळ्या राज्यांसाठी किंवा त्यांच्या वेगवेगळ्या भागांसाठी] वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

(४) तो प्रथमतः हंगामी कारखान्यांव्यतिरिक्त सर्व कारखान्यांना (शासनाच्या मालकीच्या कारखान्यांससुद्धा) लागू होईल.

[5][परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट ज्यांच्या कर्मचाऱ्यास मुख्यत्वेकरून; या अधिनियमान्वये उपबंधित केलेल्या लाभांसारखे किंवा त्याहून अधिक चांगले लाभ अन्यथा मिळत असतील अशा शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या कारखान्यास किंवा आस्थापनेस लागू होणार नाही.]

(५) समुचित शासन, महामंडळाशी विचार विनिमय करून व [6][समुचित शासन हे राज्य शासन असेल त्याबाबतीत, केंद्र शासनाच्या मान्यतेने] या अधिनियमाचे उपबंध किंवा त्यांच्यापैकी कोणतेही उपबंध अन्य कोणत्याही आस्थापनेला किंवा कोणत्याही वर्गाच्या आस्थापनांना मग अशी आस्थापना, औद्योगिक, वाणिज्यिक, कृषिविषयक वर्गातील आस्थापनेच्या स्वरूपाची असो किंवा अन्य स्वरूपाची असो—लागू करण्याच्या आपल्या उद्देशाबद्दल सहा महिन्यांची नोटीस **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे दिल्यानंतर तसे करू शकेल :

[7][परंतु, या अधिनियमाचे उपबंध राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात आणण्यात आले असतील त्याबाबतीत त्या राज्याच्या दुसऱ्या भागातील तशाच आस्थापनेला किंवा आस्थापनांच्या वर्गाला ते उपबंध आधीच लागू करण्यात आले असल्यास, उक्त उपबंध त्या भागातील तशा कोणत्याही आस्थापनेला किंवा आस्थापनांच्या वर्गाला लागू होतील.]

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा—**भारताचे राजपत्र,** १९४६ भाग पाच, पृष्ठे ३११ ते ३५७ आणि निवड समितीच्या अहवालासाठी पहा—**भारताचे राजपत्र,** १९४८ भाग पाच, पृष्ठे १२४ ते १५९.

२. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २ याद्वारे "भाग ख राज्ये खेरीज करून" याऐवजी घातलेला "जम्मू व काश्मीर राज्ये खेरीज करून" हा मजकूर १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची याद्वारे वगळण्यात आला (१ सप्टेंबर १९७१ रोजी व तेव्हापासून).

३. दिनांकासाठी जोडपत्र पहा.

हा अधिनियम, १९५४ चा अधिनियम २० याच्या चौथ्या अनुसूचीद्वारे उत्तर प्रदेश राज्याच्या डेहराडून जिल्ह्यातील जौसर बावर परगण्यांवर आणि मिर्झापूर जिल्ह्यातील कायमपूर परिक्षेत्राच्या दक्षिणेकडील क्षेत्रांवर, १९५३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची याद्वारे पाँडिचेरीवर आणि १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूची याद्वारे गोवा, दमण, व दिव यांवर विस्तारित करण्यात आला आहे.

४. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २ द्वारे "वेगवेगळ्या राज्यांसाठी" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९८९ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (६ फेब्रुवारी १९९० रोजी व तेव्हापासून).

६. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २ द्वारे "केंद्र शासनाच्या मान्यतेने" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. १९८९ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (६ फेब्रुवारी १९९० रोजी व तेव्हापासून).

[1][ (६) हा अधिनियम प्रयुक्त असणाऱ्या एखाद्या कारखान्यातील किंवा आस्थापनेतील कामावर लावलेल्या व्यक्तींची संख्या ही, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा कोणत्याही वेळी कमी आहे किंवा तीमधील निर्माणाची प्रक्रिया विजेच्या सहाय्याने केली जाण्याचे बंद करण्यात आले आहे असे असले तरीही त्या कारखान्याचे किंवा आस्थापनेचे नियमन या अधिनियमान्वये होण्याचे चालू राहील.]

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर---

(१) "समुचित शासन" याचा अर्थ, केंद्र शासनाच्या किंवा [2][रेल्वे प्रशासनाच्या] नियंत्रणा खालील आस्थापना किंवा मोठे बंदर, किंवा खाण किंवा तेलक्षेत्रे यांच्या संबंधात केंद्र शासन, व इतर सर्व बाबतीत राज्य शासन, असा आहे ;

[3] * * * *

(३) "प्रसवावस्था" याचा अर्थ, ज्यांच्या परिणामी जिवंत बालकाचा जन्म होतो अशा प्रसववेदना किंवा ज्यांच्या परिणामी गर्भारपणाच्या सव्वीस आठवड्यानंतर बालकाचा--मग ते जिवंत असो वा मृत असो--जन्म होतो असा प्रसववेदना, असा आहे ;

(४) "अंशदान" याचा अर्थ, एखाद्या कर्मचाऱ्याच्या संबंधात प्रधान नियोक्त्याकडून निगम प्रदेय असलेली पैशाची रक्कम असा आहे आणि त्यामध्ये, या अधिनियमाच्या उपबंधानुसार कर्मचाऱ्याकडून किंवा त्याच्या वतीने प्रदेय असलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश आहे ;

[3] * * * *

(६) "निगम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली स्थापन केलेले कर्मचारी राज्य विमा निगम, असा आहे;

[4][ (६क) "अवलंबित व्यक्ती" याचा अर्थ, मृत विमेदार व्यक्तीच्या पुढील नातेवाईकांपैकी कोणताही नातेवाईक, असा आहे ; ते असे :---

(एक) विधवा, औरस किंवा दत्तक अज्ञान मुलगा किंवा औरस किंवा दत्तक अविवाहित [5][मुलगी]

[6][ (एक-क) विधवा आई; ]

(दोन) विमेदार व्यक्तीच्या मृत्युच्या वेळी, तिच्या कमाईवर संपूर्णतः अवलंबून असल्यास वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेली असून विकल असणारा औरस किंवा दत्तक मुलगा किंवा मुलगी ;

(तीन) विमेदार व्यक्तीच्या मृत्युच्या वेळी, तिच्या कमाईवर संपूर्णतः किंवा अंशतः अवलंबून असल्यास.

(क) आई किंवा वडील,---विधवा आई वगळून,

(ख) अज्ञान अनौरस मुलगा, अविवाहित अनौरस मुलगी अथवा विवाहित व अज्ञान असल्यास किंवा विधवा व अज्ञान असल्यास, मुलगी, मग ती औरस असो वा दत्तक किंवा अनौरस असो,

(ग) अज्ञान भाऊ किंवा अविवाहित बहिण किंवा अज्ञान असल्यास विधवा बहिण

(घ) विधवा सून,

(ङ) त्या व्यक्तीच्या एखाद्या पूर्वमृत मुलाचे अज्ञान अपत्य,

(च) त्या व्यक्तीच्या पूर्वमृत मुलीचे अज्ञान अपत्य, जर अशा अपत्याचे आईवडील जिवंत नसतील तर,

(छ) विमेदार व्यक्तीचे आईवडील जिवंत नसतील तर तिच्या वडिलांचे आईवडील; ]

(७) "रीतसर नियुक्त" याचा अर्थ, या अधिनियमाचे उपबंध किंवा त्याखाली केलेले नियम वा विनियम यांनुसार नियुक्त, असा आहे;

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश १९५० याद्वारे "संघीय रेल्वेच्या" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३ द्वारे वगळण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

५. १९८९ चा अधिनियम, २९, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

६ वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

¹[(८) "सेवाजन्य इजा" याचा अर्थ, विमायोग्य रोजगार सेवायोजन असलेल्या सेवेमधून आणि तिच्या उद्भवणाऱ्या अपघातातून किंवा व्यवसायजन्य रोगातून झालेली शारीरिक इजा, असा आहे,— मग तो अपघात किंवा व्यवसायजन्य रोग भारताच्या प्रादेशिक सीमांच्या आत किंवा त्या सीमांबाहेर घडलेला किंवा जडलेला असो.]

(९) "कर्मचारी" याचा अर्थ, हा अधिनियम ज्यास लागू आहे अशा कारखान्यामध्ये अथवा आस्थापनेमध्ये किंवा त्यामधील कामाच्या संबंधात मजुरीने कामावर ठेवलेली आणि—

(एक) प्रधान नियोक्त्याने कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या किंवा त्याच्या कामाशी आनुषंगिक असलेल्या किंवा प्रारंभिक काम म्हणून करावयाच्या किंवा त्याच्याशी संबंध असलेल्या कोणत्याही कामावर—मग असे काम कर्मचारी कारखान्यात करत असो, किंवा आस्थापनेमध्ये करत असो किंवा इतरत्र करत असो—थेट नेमलेली ; किंवा

(दोन) सामान्यपणे, कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या कामाचा भाग असलेल्या किंवा जे काम कारखान्यामध्ये अथवा आस्थापनेमध्ये चालवण्यात येणाऱ्या कामाच्या संबंधातील प्रारंभिक काम म्हणून करावयाचे असेल किंवा कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या प्रयोजनांशी आनुषंगिक असेल अशा कामावर निकटतम नियोक्त्याने किंवा त्याच्या मार्फत कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या परिवास्तूमध्ये किंवा प्रधान नियोक्त्याच्या किंवा त्याच्या एजंटाच्या देखरेखीखाली नेमलेली; किंवा

(तीन) जिने एखाद्या व्यक्तीबरोबर सेवेची संविदा केलेली आहे आणि त्या व्यक्तीने पुर्वोक्त व्यक्तीची सेवा प्रधान नियोक्त्याला तात्पुरती उसनवारीने किंवा भाडयाने दिलेली आहे अशी, सेवा उसनवारीने किंवा भाडयाने दिलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे.

²[आणि त्यामध्ये, कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या अथवा त्याच्या कोणत्याही भागाच्या, विभागाच्या किंवा शाखेच्या प्रशासनाशी किंवा कारखान्यासाठी अथवा आस्थापनेसाठी कच्चा माल खरेदी करण्याशी किंवा कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या उत्पादनांचे वितरण वा विक्री यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा ³[किंवा शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत असलेली परंतु, शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अन्वये किंवा आस्थापनेच्या स्थायी आदेशान्वये जी व्यक्ती शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत नाही अशा कोणत्याही व्यक्तीचा] समावेश आहे, परंतु त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश नाही.]

(क) ⁴[भारतीय] नौसेना, भूसेना किंवा वायुसेना यामधील कोणतीही व्यक्ती, किंवा

⁵[(ख) ज्या व्यक्तीचे वेतन (अतिकालिक कामाबद्दलचे पारिश्रमिक वगळून) ⁶[केंद्र शासन विहित करील अशा वेतनापेक्षा] अधिक असेल अशी, अशा प्रकारे नेमलेली कोणतेही व्यक्ती :

परंतु, अंशदान कालावधीच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी (पूर्वी नव्हे) ज्याचे वेतन (अतिकालिक कामाबद्दलचे पारिश्रमिक वगळून) दरमहा ⁶[केंद्र शासन विहित करील अशा वेतनापेक्षा] अधिक असेल तो कर्मचारी त्या कालावधीच्या अखेरीपर्यंत कर्मचारी असण्याचे चालू राहील; ]

(१०) "सूट मिळालेला कर्मचारी" याचा अर्थ, कर्मचाऱ्याचे अंशदान देण्यास या अधिनियमान्वये दायी नसलेला कर्मचारी, असा आहे;

⁷[(११) "कुटुंब" याचा अर्थ, विमेदार व्यक्तीचे पुढील सर्व किंवा कोणतेही नातेवाईक, असा आहे :—

(एक) विवाह साथी,

(दोन) विमेदार व्यक्तीवर अवलंबून असलेले अज्ञान औरस किंवा दत्तक अपत्य,

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आले (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "परंतु त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "हिज मॅजेस्टीची" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे मूळ उपखंडाऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

६. १९८९ चा अधिनियम २९, कलम २९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ खंड (११) व (१२) या ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(तीन) जे पूर्णपणे विमेदार व्यक्तीच्या कमाईवर अवलंबून आहे आणि—

(क) जो वयाच्या २१ वर्षापर्यंत शिक्षण घेत आहे ;

(ख) जी अविवाहित कन्या आहे ;

असे अपत्य ;

(चार) जे कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक असामान्यता किंवा इजा यामुळे विकलांग झाले आहे आणि विकलांगता असेपर्यंत विमेदार व्यक्तीच्या कमाईवर पूर्णपणे अवलंबून आहे असे अपत्य,

(पाच) अवलंबित आई किंवा वडील, असा आहे;

(१२) "कारखाना" याचा अर्थ, प्रसीमांसह ज्या कोणत्याही

(क) परिवास्तूमध्ये लगतच्या बारा महिन्यांमधील कोणत्याही दिवशी दहा किंवा अधिक व्यक्ती मजुरीने कामावर लावलेल्या आहेत किंवा कामावर लावलेल्या होत्या आणि जिच्या कोणत्याही भागात विजेच्या सहाय्याने निर्मितीची प्रक्रिया चालवण्यात येत असेल किंवा सर्वसाधारणपणे तशी चालविण्यात अशी कोणतीही परिवास्तू, किंवा

(ख) लगतच्या बारा महिन्यांमधील कोणत्याही दिवशी वीस किंवा अधिक व्यक्ती मजुरीने कामावर लावलेल्या आहेत, किंवा कामावर लावलेल्या होत्या आणि जिच्या कोणत्याही भागात विजेच्या सहाय्याविना निर्मितीची प्रक्रिया चालविण्यात येत असेल किंवा सर्वसाधारणपणे तशी चालवण्यात येते अशी कोणतीही परिवास्तू, असा आहे :

परंतु, त्यात खाण अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३५) याच्या प्रवर्तनाधीन असलेल्या खाणीच्या किंवा रेल्वेच्या रनिंग शेडचा समावेश नाही; ]

(१३) "निकटतम नियोक्ता" याचा, त्याने किंवा त्याच्यामार्फत कामावर लावलेल्या कर्मचाऱ्याच्या संबंधातील अर्थ, हा अधिनियम लागू होणाऱ्या कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या परिवास्तूमध्ये किंवा प्रधान नियोक्त्याच्या किंवा त्याच्या एजंटाच्या देखरेखीखाली जे काम सामान्यपणे मुख्य नियोक्त्याच्या कारखान्याच्या अथवा आस्थापनेच्या कामांचा एक भाग असते किंवा कोणत्याही कारखान्यामध्ये अथवा आस्थापनेमध्ये चालविण्यात येणाऱ्या कामाच्या संबंधातील प्रारंभिक काम म्हणून करावयाचे असते किंवा कोणत्याही कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या प्रयोजनांशी आनुषंगिक असते असे कोणतेही संपूर्ण काम किंवा त्याचा कोणताही भाग पार पाडण्याची जबाबदारी जिने घेतली आहे ती व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये, ज्या व्यक्तीने तिच्याबरोबर नोकरीची संविदा केलेल्या कर्मचाऱ्याची सेवा प्रधान नियोक्त्यास तात्पुरती उसनवारीने किंवा भाड्याने दिलेली असेल त्या व्यक्तीचाही समावेश आहे. [1][आणि त्यात संविदाकारांचा समावेश आहे];

[2][(१३क) "विमायोग्य सेवायोजन" याचा अर्थ, हा अधिनियम लागू होणाऱ्या कारखान्यामधील अथवा आस्थापनेमधील सेवायोजन, असा आहे; ]

(१४) "विमेदार व्यक्ती" याचा अर्थ, या अधिनियमाखाली ज्याच्या संबंधात अंशदाने प्रदेय आहेत किंवा होती असा कर्मचारी असलेली किंवा असा कर्मचारी होती ती, व त्या कारणामुळे जी या अधिनियमाखाली उपबंधित केलेल्या कोणत्याही लाभांना हक्कदार असेल ती व्यक्ती, असा आहे ;

[1][(१४क) "व्यवस्थापन अभिकर्ता" याचा अर्थ, जी व्यक्ती अन्य व्यक्तीचा प्रतिनिधी म्हणून अशा अन्य व्यक्तीचा उदीम किंवा धंदा चालविण्यासाठी नियुक्त केलेली असेल किंवा कार्य करत असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे. पण त्यामध्ये, नियोक्त्याच्या अधीन एखाद्या व्यवस्थापकाचा समावेश होत नाही.

[3][(१४कक) "निर्मिती प्रक्रिया" या शब्दप्रयोगाला कारखाना अधिनियम, १९४८ यात नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;]

(१४ख) "गर्भपात" याचा अर्थ, गरोदरपणाच्या सव्विसाव्या आठवड्यापूर्वी किंवा आठवड्यात कोणत्याही वेळी सगर्भ गर्भाशयातील गर्भ बाहेर पडणे, असा आहे; परंतु, त्यामध्ये, जे गर्भपाताचे कृत्य भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याखाली शिक्षापात्र आहे अशा कोणत्याही गर्भपाताचा समावेश नाही;]

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३ (सहा) द्वारे समाविष्ट केले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४४ कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम, २९, कलम ३ (सात) द्वारे (१४ कक) हा खंड समाविष्ट करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(१५) कारखान्याचा "कार्यचालक" याला कारखाना अधिनियम, [1][१९४८] (१९४८ चा ६३) यामध्ये नेमून दिलेला अर्थ असेल;

[2][(१५क) "कायमची आंशिक विकलांगता" याचा अर्थ, ज्यामुळे विकलांगता उद्‌भवली त्या अपघाताच्या वेळी कर्मचारी ज्या कोणत्याही सेवायोजनात होता त्या प्रत्येक सेवायोजनातील त्याची अर्थार्जनक्षमता ज्या विकलांगतेमुळे कमी होते अशी कायम स्वरूपाची विकलांगता, असा आहे ;

परंतु, दुसऱ्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक इजेचे पर्यवसान कायमच्या आंशिक विकलांगतेमध्ये होते असे मानण्यात येईल.

(१५ख) "कायमची संपूर्ण विकलांगता" याचा अर्थ, ज्या विकलांगतेमुळे एखादा कामगार अशी विकलांगता ज्या अपघातामुळे उद्‌भवली त्या अपघाताच्यावेळी तो जी जी कामे पार पाडण्यास समर्थ होता ती सर्व कामे पार पाडण्यास असमर्थ होतो अशी कायम स्वरूपाची विकलांगता, असा आहे :

परंतु, दुसऱ्या अनुसूचीच्या पहिल्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक इजेमुळे, किंवा त्या अनुसूचीच्या पहिल्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही इजांचा एकत्रितपणे विचार केला असता उक्त दुसऱ्या भागामध्ये त्या इजांच्या उल्लेखासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अर्थार्जनक्षमतेत झालेल्या हानीची एकंदर टक्केवारी शंभर टक्के किंवा त्याहून अधिक असते तेव्हा, त्यामुळे कायमची संपूर्ण विकलांगता उद्‌भवते असे मानण्यात येईल ; ]

[3][(१५ग) "वीज" या शब्दप्रयोगाला कारखाना अधिनियम, १९४८ यात नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल.]

(१६) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(१७) "प्रधान नियोक्ता" याचा अर्थ,—

(एक) कारखान्याच्या बाबतीत, कारखान्याचा मालक किंवा कार्यचालक, असा आहे आणि त्यामध्ये अशा मालकाचा किंवा कार्यचालकाचा व्यवस्थापन अभिकर्ता, मृत मालकाचा किंवा कार्यचालकाचा वैध प्रतिनिधी, आणि [4][कारखाना अधिनियम, १९४८] (१९४८ चा ६३) याखाली कारखान्याचा व्यवस्थापक म्हणून एखादी व्यक्ती नामित करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशी नामित व्यक्ती यांचाही समावेश आहे;

(दोन) भारतातील कोणत्याही शासनाच्या कोणत्याही विभागाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही आस्थापनेच्या बाबतीत, अशा शासनाने या संबंधात नियुक्त केलेला प्राधिकारी आणि अशा रीतीने कोणताही प्राधिकारी नियुक्त केलेला नसेल त्या बाबतीत, विभाग प्रमुख, असा आहे;

(तीन) इतर कोणत्याही आस्थापनेच्या बाबतीत, आस्थापनेवरील देखरेख व नियंत्रण यांसाठी जबाबदार असणारी कोणतीही व्यक्ती, असा आहे.

(१८) "विनियम" याचा अर्थ, निगमांमुळे केलेला विनियम, असा आहे;

(१९) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमाची अनुसूची, असा आहे ;

[5][(१९क) "हंगामी कारखाना" याचा अर्थ, जो कारखाना केवळ पुढील एका किंवा अधिक निर्मिती प्रक्रियेत म्हणजे कापूस वटणी, कापसाची किंवा तागाची दाबणी, भुईमुगाच्या शेंगांची सोलणी, कॉफी, नीळ, लाख, रबर, साखर (गूळसुद्धा) किंवा चहा यांची निर्मिती किंवा यांपैकी एका किंवा अधिक निर्मिती प्रक्रियांमध्ये किंवा पूर्वोक्त प्रक्रियांपैकी कोणत्याही एका प्रक्रियेशी आनुषंगिक किंवा संबद्ध अशा कोणत्याही निर्मिती–प्रक्रियेमध्ये सर्वस्वी गुंतलेला कारखाना, असा आहे आणि त्यामध्ये वर्षातील सात महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी—

(क) चहा किंवा कॉफी यांचे संमिश्रण करणे, ते पॅकबंद करणे किंवा पुन्हा पॅकबंद करणे अशा कोणत्याही प्रक्रियेमध्ये; किंवा

(ख) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्न निर्मिती प्रक्रियेमध्ये,

—गुंतलेल्या कारखान्याचा समावेश आहे];

---

१. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे, "१९३४" या संख्येऐवजी ही संख्या दाखल करण्यात आली.

२. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३ (आठ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

४. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे "कारखाना अधिनियम १९३४ याचे कलम ९, पोटकलम (१) खंड (ङ)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३ (नऊ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(२०) "आजार" याचा अर्थ, ज्या स्थितीत वैद्यकीय उपचार आणि शुश्रूषा यांची गरज असते व वैद्यकीय कारणास्तव कामावर गैरहजर रहावे लागते ती स्थिती, असा आहे;

(२१) "तात्पुरती विकलांगता" याचा अर्थ, सेवाजन्य इजेमुळे उद्‌भवलेल्या ज्या स्थितीत वैद्यकीय उपचारांची गरज असते आणि कर्मचारी [1][इजेच्या पूर्वी किंवा इजेच्या वेळी तो जे काम करत होता ते काम करण्यास] तो अशा इजेमुळे तात्पुरता असमर्थ ठरतो ती स्थिती, असा आहे ;

(२२) "वेतन" याचा अर्थ, सेवायोजनाच्या संविदेच्या स्पष्ट वा गर्भित अटींचे पालन झाले तर, कर्मचाऱ्याला रोखीने दिले जाणारे किंवा प्रदेय होणारे सर्व पारिश्रमिक, असा आहे आणि त्यामध्ये [2][अधिकृत रजा, टाळेबंदी, बेकायदेशीर नसणारा संप किंवा अपरिहार्य कामबंदी याच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात कर्मचाऱ्याला दिलेली कोणतीही रक्कम आणि] [3][दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालांतरागणिक] दिले जाणारे कोणतेही पारिश्रमिक असल्यास ते पारिश्रमिक यांचा समावेश आहे. परंतु त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश नाही :—

(क) कोणत्याही पेन्शन निधीमध्ये किंवा भविष्य निधीमध्ये किंवा या अधिनियमाखाली नियोक्त्याने केलेले कोणतेही अंशदान ;

(ख) कोणताही प्रवास भत्ता किंवा कोणत्याही प्रवास सवलतीचे मूल्य ;

(ग) कामावर ठेवलेल्या व्यक्तीला तिच्या सेवायोजन स्वरूपामुळे तिच्यावर करावा लागलेला विशेष खर्च भागविण्यासाठी दिलेली कोणतीही रक्कम ; किंवा

(घ) कार्यमुक्तीनंतर प्रदेय असणारे कोणतेही उपदान ;

[4][(२३) "वेतन कालावधी" याचा कर्मचाऱ्याच्या संबंधातील अर्थ, त्याला वेतनाची रक्कम सर्वसाधारणपणे ज्या कालावधीच्या संदर्भात प्रदेय असते—मग ती सेवायोजनाच्या संविदेच्या स्पष्ट वा गर्भित अटीनुसार असो वा अन्य प्रकारे असो—तो कालावधी, असा आहे.]

[5][(२४) या अधिनियमांमध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) यामध्ये व्याख्या केलेले इतर सर्व शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमामध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.]

कारखान्यांची व आस्थापनांची नोंदणी.

[6][२क. हा अधिनियम लागू होणाऱ्या प्रत्येक कारखान्याची किंवा आस्थापनेची या संबंधात केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने नोंदणी करावी लागेल.]

## प्रकरण दोन

### निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद

कर्मचारी राज्य विमा निगमाची स्थापना.

३. (१) केंद्र शासन या संबंधात शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा तारखेस व तेव्हापासून, या अधिनियमाच्या उपबंधानुसार कर्मचारी राज्य विमा योजनांच्या प्रशासनासाठी "कर्मचारी राज्य विमा निगम" म्हणून ओळखले जाणारे एक निगम स्थापन करण्यात येईल.

(२) निगम म्हणजे, उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला, "कर्मचारी राज्य विमा निगम" या नावाचा निगम निकाय असेल आणि उक्त नावाने ते दावा लावील आणि त्याच्यावर दावा लावण्यात येईल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे "काम करण्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे "वेतन कालावधीच्या अंतिम दिवसानंतर ठराविक कालांतरागणिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९८४ चा अधिनियम ४५, कलम २(व) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला. (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

४. निगम पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल. निगम घटित करणे.

[1][(क्) सभापती—तो केंद्र शासनाने [2][नियुक्त] करावयाचा ;

(ख्) उपसभापती—तो केंद्र शासनाने [2][नियुक्त] करावयाचा ; ]

(ग्) केंद्र शासनाने [2][नियुक्त] करावयाच्या जास्तीत जास्त पाच व्यक्ती, [3][ * * * ]

(घ्) [4][हा अधिनियम जेथे अंमलात असेल अशा [5][राज्यांपैकी]] प्रत्येक राज्याचे प्रतिनिधित्व करणारी, प्रत्येकी एक व्यक्ती-ती संबंधित राज्य शासनाने [2][नियुक्त] करावयाची ;

(ङ्) [6][संघ राज्यक्षेत्रांचे] प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र शासनाने [2][नियुक्त] करावयाची एक व्यक्ती;

(च्) नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या [7][दहा] व्यक्ती-केंद्र शासन या प्रयोजनार्थ मान्यता देईल अशा नियोक्ता संघटनांबरोबर सल्लामसलत करून केंद्र शासनाने त्या [2][नियुक्त] करावयाच्या;

(छ्) कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या [7][दहा] व्यक्ती-केंद्र शासन या प्रयोजनार्थ मान्यता देईल अशा कर्मचारी संघटनांबरोबर सल्लामसलत करून केंद्र शासनाने त्या [2][नियुक्त] करावयाच्या;

(ज्) वैद्यक व्यवसायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती-केंद्र शासन या प्रयोजनार्थ मान्यता देईल अशा वैद्यक व्यवसायी संघटनांबरोबर सल्लामसलत करून केंद्र शासनाने [2][नियुक्त] करावयाच्या; [8] * * * * *

[9][(झ्) तीन संसद-सदस्य त्यांच्यापैकी दोन लोकसभेचे सदस्य असतील व एक राज्यसभेचा सदस्य असेल आणि ते अनुक्रमे लोकसभेचे सदस्य व राज्यसभेचे सदस्य यांनी निवडून दिलेले असतील ; आणि

(ञ्) निगमाचा महासंचालक, पदसिद्ध. ]

५. (१) या अधिनियमामध्ये व्यक्तपणे उपबंधित केलेले असेल ते खेरीजकरून एरव्ही [10][कलम ४-खंड (क्), (ख्), (ग्), (घ्) आणि (ङ्) यामध्ये निर्देशिलेले सदस्य व पदसिद्ध सदस्य] या व्यतिरिक्त-सदस्यांचा रिक्त, निगमाच्या अन्य सदस्यांचा पदावधी, त्यांची [2][नियुक्ती] किंवा निवड अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून चार वर्षे इतका असेल : निगमाच्या सदस्यांचा पदावधी.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४ द्वारे मूळ शब्द "नामनिर्देशन" या ऐवजी "नियुक्ती" हा शब्द दाखल त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे, "यांच्यापैकी किमान तीन व्यक्ती केंद्र शासनाचे कर्मचारी असतील" हा मजकूर वगळण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

४. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ४ द्वारे, "भाग व राज्यांपैकी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६ याद्वारे "भाग क राज्ये व भाग ख राज्ये यांपैकी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील आदेशाद्वारे "भाग ग राज्यांचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. १९८९ चा अधिनियम २९, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून);

८. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ खंड (झ्) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

१०. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

परंतु, चार वर्षांचा उक्त कालावधी उलटून गेला तरी, निगमाचा सदस्य, त्याच्या उत्तराधिकाऱ्याची [1][नियुक्ती] किंवा निवड अधिसूचित केली जाईपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवील.

(२) कलम ४ खंड [2][(क्), (ख्), (ग्), (घ्) व (ङ्)] यांमध्ये निर्देशिलेले नियमाचे सदस्य त्यांना [1][नियुक्त] करणाऱ्या शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करतील.

[1][फेरनियुक्ती] किंवा फेरनिवड होण्याची पात्रता.

६. निगम, स्थायी समिती किंवा वैद्यकीय लाभ परिषद याचा मावळता सदस्य [1][फेरनियुक्तीस] किंवा, प्रकरणपरत्वे, फेरनिवडीस पात्र असेल.

आदेश, निर्णय, इत्यादींचे अधिप्रमाणन.

[3][७. निगमाचे सर्व आदेश व निर्णय निगमाच्या महासंचालकाच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील आणि निगमाचे केलेले इतर सर्व संलेख महासंचालकाच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या, निगमाच्या अन्य अधिकाऱ्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील.]

स्थायी समिती घटित करणे.

८. निगमाची स्थायी समिती त्याच्या सदस्यांमधून घटित करण्यात येईल व पुढील व्यक्ती मिळून ती बनलेली असेल :—

(क्) केंद्र शासनाने [1][नियुक्त] केलेला सभापती ;

(ख्) [4][केंद्र शासनाने [1][नियुक्त] केलेले] निगमाचे तीन सदस्य ;

[5][(खख्) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील, अशा तीन राज्य शासनाचे निगमामध्ये प्रतिनिधित्व करणारे निगमाचे तीन सदस्य].

(ग्) निगमाचे पुढीलप्रमाणे निवडून दिलेले [6][आठ] सदस्य :—

[7]* * * * * * *

(दोन) नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे, निगमाच्या सदस्यांपैकी [8][तीन] सदस्य ;

(तीन) कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे, निगमाच्या सदस्यांपैकी [8][तीन] सदस्य ;

(चार) वैद्यक व्यवसायाचे प्रतिनिधित्व करणारा, निगमाच्या सदस्यांपैकी एक सदस्य ;

(पाच) [9][संसदेने] निवडून दिलेला, निगमाच्या सदस्यांपैकी एक सदस्य ;

[10][(घ्) निगमाचा महासंचालक, पदसिद्ध.]

स्थायी समितीच्या सदस्यांचा पदावधी.

९. (१) या अधिनियमामध्ये अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीज करून एरव्ही कलम ८ खंड (क्) किंवा [11][खंड (ख्) किंवा खंड (खख्)] मध्ये निर्देशिलेल्या सदस्यांव्यतिरिक्त स्थायी समितीच्या अन्य सदस्याचा पदावधी त्याची निवड अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे इतका असेल :

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४ द्वारे मूळ शब्द "नामनिर्देशन" यांऐवजी "नियुक्ती" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ५ द्वारे "(ग्), (घ्) व (ङ्)" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ कलम ७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

५. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ५ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

६. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ७ द्वारे "सहा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

७. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ५ द्वारे उपखंड (एक) वगळण्यात आला.

८. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ७ द्वारे "दोन" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

९. अनुकूलन आदेश १९५०, द्वारे "केंद्रीय विधानमंडळाचे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

१०. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ७ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

११. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे "खंड (ख्)" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, दोन वर्षांचा उक्त कालावधी उलटून गेला तरी, स्थायी समितीचा सदस्य, त्याच्या उत्तराधिकाऱ्याची निवड अधिसूचित होईपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवील :

परंतु आणखी असे की, स्थायी समितीचा सदस्य हा निगमाचा सदस्य असण्याचे बंद होईल तेव्हा, त्याचे पदधारण संपुष्टात येईल.

(२) कलम ८ खंड (क्) किंवा [१][खंड (ख्) किंवा खंड (खख्)] यामध्ये निर्देशिलेला स्थायी समितीचा सदस्य केंद्र शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करील.

वैद्यकीय लाभ परिषद.

१०. (१) केंद्र शासन एक वैद्यकीय लाभ परिषद घटित करील व पुढील व्यक्ती मिळून ती बनलेली असेल :—

(क्) पदसिद्ध सभापती म्हणून आरोग्य सेवेचे महासंचालक ;

(ख्) केंद्र शासनाने [२][नियुक्त] करावयाचा एक उप महासंचालक, आरोग्य सेवा ;

(ग्) निगमाचा वैद्यकीय आयुक्त, पदसिद्ध ;

(घ्) [३][हा अधिनियम जेथे अंमलात असेल अशा [४][राज्यांपैकी] (संघ राज्य क्षेत्रांव्यतिरिक्त)] प्रत्येक राज्याचे प्रतिनिधित्व करणारा प्रत्येकी एक सदस्य तो संबंधित राज्य शासन [२][नियुक्त] करील ;

(ङ्) केंद्र शासन या प्रयोजनार्थ मान्यता देईल अशा नियोक्ता संघटनेबरोबर विचारविनिमय करून केंद्र शासनाने [२][नियुक्त] करावयाचे नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे तीन सदस्य ;

(च्) केंद्र शासन या प्रयोजनार्थ मान्यता देईल अशा कर्मचारी संघटनेबरोबर विचारविनिमय करून केंद्र शासनाने [२][नियुक्त] करावयाचे असे, कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे तीन सदस्य ; आणि

(छ) केंद्र शासन या प्रयोजनार्थ मान्यता देईल अशा वैद्यक व्यवसायी संघटनांबरोबर विचारविनिमय करून केंद्र शासनाने [२][नियुक्त] करावयाचे, वैद्यक व्यवसायाचे प्रतिनिधित्व करणारे तीन सदस्य-यांमध्ये एकापेक्षा कमी नाही इतक्या संख्येत स्त्री सदस्य असतील.

(२) या अधिनियमामध्ये अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केलेले असेल ते खेरीजकरून एरव्ही पोटकलम (१) खंड (क्) ते (घ्) यांपैकी कोणत्याही खंडामध्ये निर्देशिलेल्या सदस्याव्यतिरिक्त वैद्यकीय लाभ परिषदेच्या अन्य सदस्याचा पदावधी त्याची [२][नियुक्ती] केल्याच्या दिनांकापासून चार वर्षे इतका असेल :

[५][परंतु, चार वर्षांचा उक्त कालावधी उलटून गेला तरी, वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य त्याच्या उत्तराधिकाऱ्याची [२][नियुक्ती,] अधिसूचित होईपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवील.]

(३) पोटकलम (१)–खंड (ख्) व (घ्) यांमध्ये निर्देशिलेला वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य त्याला [२][नियुक्त] करणाऱ्या शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करील.

सदस्यत्वाचा राजीनामा.

११. निगमाचा, स्थायी समितीचा किंवा वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य, केंद्र शासनाला लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल आणि त्या शासनाने राजीनामा स्वीकारल्यानंतर त्या सदस्याचे पद रिक्त होईल.

सदस्य असण्याचे बंद होणे.

१२. [६][(१)] निगमाचा, स्थायी समितीचा किंवा वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य, त्या निकायाच्या सदस्य म्हणून लागोपाठच्या तीन सभांना उपस्थित राहण्यास चुकला तर, तो त्या निकायाचा सदस्य असण्याचे बंद होईल :

परंतु, निगम, स्थायी समिती किंवा, प्रकरणपरत्वे, वैद्यकीय लाभ परिषद, केंद्र शासनाने या संबंधात केलेल्या नियमांच्या अधीनतेने त्या सदस्याला त्याचे सदस्यत्व परत बहाल करू शकेल.

---

१. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे "खंड ख्" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४ द्वारे मूळ शब्द "नामनिर्देशन" या शब्दाऐवजी "नियुक्ती" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ७ द्वारे "भाग क् राज्यांपैकी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश (क्रमांक ३) १९५६, द्वारे "भाग क् राज्यांपैकी किंवा भाग ख् राज्यांपैकी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ८ द्वारे या परंतुकाची भर घालण्यात आली (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

६. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ८ द्वारे कलम १२ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[1][(२) निगमावर, स्थायी समितीवर किंवा प्रकरणपरत्वे, वैद्यकीय लाभ परिषदेवर नियोक्त्यांचे, कर्मचाऱ्यांचे किंवा वैद्यक व्यवसायींचे प्रतिनिधित्व करण्यासाठी [3][नियुक्त] केलेली किंवा निवडून दिलेली एखादी व्यक्ती अशा नियोक्त्यांचा, कर्मचाऱ्यांचा किंवा वैद्यक व्यवसायींचा प्रतिनिधी राहिलेली नाही असे केंद्र शासनाचे मत असेल, त्या बाबतीत, केंद्र शासनास शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकी व तेव्हापासून अशी व्यक्ती निगमाचा, स्थायी समितीचा किंवा प्रकरणपरत्वे, वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य म्हणून राहणार नाही.]

[2][(३) कलम ४ खंड (झ) मध्ये निर्देशिलेली व्यक्ती संसदेचा सदस्य असण्याचे बंद झाल्यावर तिचे निगमावरील सदस्यत्व संपुष्टात येईल.]

**निरर्हता.** १३. एखादी व्यक्ती जर,—

(क) सक्षम न्यायालयाने विकल मनाची असल्याचे घोषित केली असेल तर, किंवा

(ख) अविमुक्त दिवाळखोर असेल तर, किंवा

(ग) वैद्यक व्यवसायी किंवा (संचालक सोडून अन्य) कंपनीचा शेअरधारक या नात्याने नव्हे तर अन्यथा, निगमाबरोबर केलेल्या विद्यमान संविदेमध्ये किंवा निगमासाठी करण्यात येत असलेल्या कोणत्याही कामामध्ये स्वत: किंवा आपल्या भागीदारांमार्फत प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारे हितसंबंध असेल तर, किंवा

(घ) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर नैतिक अध:पात अनुस्यूत असणाऱ्या अपराधाबद्दल तिला दोषी ठरवण्यात आले असेल तर, निगमाचा, स्थायी समितीचा किंवा वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा असा सदस्य म्हणून राहण्यास ती व्यक्ती निरर्ह होईल.

**रिक्त पद भरणे.** १४. (१) निगम, स्थायी समिती आणि वैद्यकीय लाभ परिषद यांवर [3][नियुक्त] केलेल्या किंवा निवडून दिलेल्या सदस्यांच्या पदांपैकी रिक्त पदे [3][नियुक्ती] द्वारे किंवा, प्रकरणपरत्वे निवडणुकी-द्वारे भरण्यात येतील.

(२) निमित्तवशात् रिक्त झालेले पद भरण्यासाठी [3][नियुक्त] केलेला किंवा निवडून दिलेला निगमाचा, स्थायी समितीचा किंवा वैद्यकीय लाभ परिषदेचा सदस्य, ज्या सदस्याच्या जागी [3][नियुक्त] केलेले असेल किंवा निवडून दिलेले असेल तो सदस्य पद रिक्त झाले नसते तर तितक्या काळापर्यंत पद धारण करण्यास हक्कदार झाला असता तितक्याच काळापर्यंत पद धारण करील.

**फी व भत्ते.** १५. निगम, स्थायी समिती आणि वैद्यकीय लाभ परिषद यांच्या सदस्यांना केंद्र शासन वेळोवेळी विहित करील त्याप्रमाणे फी व भत्ते मिळतील.

**[4][5][महासंचालक व वित्त आयुक्त.]** १६. (१) केंद्र शासन निगमाशी विचारविनिमय करून महासंचालक व वित्त आयुक्त यांची नियुक्ती करू शकेल.]

(२) महासंचालक हा, निगमाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल.

(३) [5][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] हे निगमाचे पूर्णवेळ अधिकारी असतील आणि केंद्र शासनाच्या [6][व निगमाच्या] मंजुरीवाचून, त्यांच्या पदाशी संबंधित नसलेले कोणतेही काम ते हाती घेणार नाहीत.

(४) [7][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] त्याच्या नियुक्ती आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत पद धारण करील. मावळता [8][महासंचालक व वित्त आयुक्त] अन्यथा अर्हता प्राप्त असेल तर तो पुन्हा नियुक्त होण्यास पात्र असेल.

(५) [9][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] यांस केंद्र शासन विहित करील त्याप्रमाणे पगार व भत्ते मिळतील.

---

१. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ८ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

२. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ९ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४ द्वारे "नामनिर्देशित" या शब्दाऐवजी "नियुक्ती" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलासह दाखल करण्यात आला. (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ६ (एक) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ६ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६. १९६६ चा अधिनियम ४४, कलम १० द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले (१७ जून १९६७ रोजी व तेव्हापासून).

७. १९८९ चा अधिनियम २९, कलम ६ (तीन) (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

८. वरील अधिनियमाच्या कलम ६ (तीन) (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम ६ (चार) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(६) एखादी व्यक्ती कलम १३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही निरर्हतेस पात्र असल्यास [1][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] म्हणून [2][नियुक्त] केली जाण्यास किंवा प्रधान अधिकारी राहण्यास ती निरर्ह ठरेल.

(७) केंद्र शासन कोणत्याही वेळी [1][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] यास त्याच्या पदावरून काढून टाकू शकेल आणि निगमाने त्या प्रयोजनार्थ बोलावलेल्या विशेष सभेमध्ये संमत केलेल्या आणि निगमाच्या एकूण सदस्य संख्येच्या किमान दोन-तृतीयांशापेक्षा कमी नाही इतक्या सदस्यांच्या मतांचा पाठिंबा मिळालेल्या ठरावाद्वारे अशी काढून टाकण्याची शिफारस करण्यात आली असेल तर, केंद्र शासनाला तसे करावे लागेल.

१७. (१) निगम आपले कामकाज कार्यक्षमरीत्या चालविण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे अधिकारी व सेवक असा कर्मचारी वर्ग नेमू शकेल, मात्र [2][केंद्र शासन विहित करील अशा पगारापेक्षा अधिक असेल अशा] कोणत्याही पदाच्या निर्मितीसाठी केंद्र शासनाची मंजुरी मिळवावी लागेल. कर्मचारी वर्ग.

[3][(२)(क) निगमाच्या कर्मचारी वर्गातील कर्मचाऱ्यांच्या भरतीची पद्धत वेतन आणि भत्ते, शिस्त आणि अन्य सेवाशर्ती या तत्सम वेतनश्रेणीतील वेतन घेणाऱ्या केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना लागू होणारे नियम आणि आदेश यांस अनुसरून निगमाने तयार केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील, त्याप्रमाणे असतील :

परंतु, उपरोक्तपैकी कोणत्याही बाबतीत उक्त नियम किंवा आदेश यांहून वेगळे नियम किंवा आदेश करणे आवश्यक आहे असे निगमाचे मत झाल्यास ते केंद्र शासनाची पूर्वमान्यता मिळवील.

(ख) खंड (क) खाली कर्मचारीवर्गातील कर्मचाऱ्यांची तत्सम वेतनश्रेणी ठरविताना निगम केंद्र शासनाच्या अधीन असलेल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता, भरतीची पद्धती, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या विचारात घेईल आणि कोणतीही शंका असल्यास, निगम ती बाब केंद्र शासनाकडे निर्देशित करील व केंद्र शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.]

(३) [4][केंद्र शासनाच्या अखत्याराखालील [5][गट क च्या आणि गट ख च्या] पदांशी समनुरूप असणाऱ्या [6][(वैद्यकीय पदाव्यतिरिक्त)] पदावरील] प्रत्येक नियुक्ती [7][संघ] लोकसेवा आयोगाशी सल्लामसलत करून करण्यात येईल :

परंतु, [8][ * * * * ] एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी केलेल्या स्थानापन्न किंवा तात्पुरत्या नियुक्तीला हे पोटकलम लागू होणार नाही :

[9][परंतु आणखी असे की, अशा कोणत्याही स्थानापन्न किंवा तात्पुरत्या नियुक्तीमुळे नियमित नियुक्तीची कोणतीही हक्क मागणी प्रदान होणार नाही आणि त्या नात्याने केलेली सेवा ही निकटच्या वरच्या श्रेणीतील पदोन्नतीसाठी विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली ज्येष्ठता किंवा किमान अर्हताकारी सेवा यांसाठी जमेस धरली जाणार नाही.]

[10][(४) एखादे पद केंद्र शासनाच्या अखत्याराखालील [5][गट क च्या किंवा गट ख च्या] पदांशी समनुरूप आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास, तो प्रश्न त्या शासनाकडे निर्देशित करण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.]

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ६ (पाच) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ७(दोन) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९७५ चा अधिनियम ३८, कलम ११ द्वारे "पाचशे रुपये आणि त्यापेक्षा अधिक कमाल मासिक वेतन असलेल्या पदावरील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ३ द्वारे "वर्ग एकच्या किंवा वर्ग दोनच्या" या मजकुराऐवजी "गट क च्या व गट ख च्या" हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. १९८९ चा अधिनियम २९, कलम ७ (तीन) (क), द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "फेडरल" या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

८. १९८९ चा अधिनियम २९, कलम ७ (तीन) (ख) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला, (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम ७ (तीन) (ग) द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

१०. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ११ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (१७ जून, १९६६ रोजी व तेव्हापासून).

स्थायी समितीच्या शक्ती.

१८. (१) निगमाचे सर्वसाधारण अधीक्षण व नियंत्रण यांच्या अधीनतेने स्थायी समिती निगमाच्या कामकाजाचे प्रशासन करील आणि तिला निगमाच्या शक्तींपैकी कोणत्याही शक्ती वापरता येतील आणि त्याच्या कार्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडता येतील.

(२) स्थायी समिती या संबंधात केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी सर्व प्रकरणे व बाबी निगमाच्या विचारार्थ, निर्णयार्थ सादर करील.

(३) स्थायी समितीस स्वविवेकानुसार अन्य कोणतेही प्रकरण किंवा बाब निगमाच्या निर्णयार्थ सादर करता येईल.

विमेदार व्यक्तींचे आरोग्य इत्यादी बाबतच्या उपाय-योजनांना चालना देण्याची शक्ती.

१९. निगम, या अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लाभ योजनेशिवाय आणखी, विमेदार व्यक्तींचे आरोग्य व कल्याण यांच्या सुधारणेबाबतच्या व विकलांग झालेल्या किंवा इजा पोचलेल्या विमेदार व्यक्तींचे पुनर्वसन व त्यांना पुन्हा कामधंद्याला लावणे याबाबतच्या उपाययोजनांना चालना देऊ शकेल आणि अशा उपाययोजनांच्या संबंधात केंद्र शासन विहित करील अशा मर्यादांच्या आत निगमाच्या पैशातून खर्च करू शकेल.

निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद यांच्या बैठका.

२०. या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद यांच्या बैठकी यासंबंधात केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी व ठिकाणी घेतल्या जातील आणि ते त्यांच्या बैठकीचे कामकाज चालवण्यासंबंधात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा नियमांचे किंवा कार्यपद्धतीचे पालन करतील.

निगम व स्थायी समिती निष्प्रभावी करणे.

२१. (१) केंद्र शासनाच्या मते, जर निगम किंवा स्थायी समिती या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यात सतत कसूर करत असेल किंवा आपल्या शक्तीचा गैरवापर करत असेल तर, ते शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, निगम निष्प्रभावी करू शकेल किंवा स्थायी समितीच्या बाबतीत, निगमाशी सल्लामसलत करून स्थायी समिती निष्प्रभावी करू शकेल :

परंतु, या पोटकलमाखाली अधिसूचना काढण्यापूर्वी केंद्र शासन निगमाला किंवा, प्रकरणपरत्वे, स्थायी समितीला ती निष्प्रभावी का करण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्याची वाजवी संधी देईल आणि निगमाचे किंवा प्रकरणपरत्वे, स्थायी समितीचे कोणतेही खुलासे व आक्षेप असल्यास, ते विचारात घेईल.

(२) पोटकलम (१) अन्वये अधिसूचना प्रकाशित करून निगम किंवा स्थायी समिती निष्प्रभावी करण्यात आल्यानंतर निगमाच्या किंवा प्रकरणपरत्वे, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी अशा प्रकाशनाच्या दिनांकापासून आपापली पदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल.

(३) स्थायी समिती निष्प्रभावी करण्यात आली असेल तेव्हा ताबडतोब कलम ८ अनुसार नवीन स्थायी समिती घटित करण्यात येईल.

(४) निगम निष्प्रभावी करण्यात आले असेल तेव्हा केंद्र शासन,—

(क) कलम ४ अनुसार निगमावर ताबडतोब नवीन सदस्य [१][नियुक्त] करू शकेल किंवा [१][नियुक्त] करण्याची किंवा निवडून देण्याची व्यवस्था करू शकेल आणि कलम ८ अनुसार नवीन स्थायी समिती घटित करू शकेल.

(ख) निगमाच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी स्वविवेकानुसार स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे तशी यंत्रणा तशा कालावधीपुरती नियुक्त करू शकेल व अशी यंत्रणा निगमाचे सर्व अधिकार वापरण्यास व त्याची सर्व कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असेल.

(५) केंद्र शासन, या कलमाखाली केलेल्या कोणत्याही कारवाईचा व अशा कारवाईस कारणीभूत होणाऱ्या परिस्थितीचा संपूर्ण अहवाल लवकरात लवकर आणि कोणत्याही प्रकरणी, निगम किंवा प्रकरणपरत्वे स्थायी समिती निष्प्रभावी करणारी अधिसूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यानंतरची नसेल अशा वेळी [२][संसदेपुढे] ठेवण्याची व्यवस्था करील.

वैद्यकीय लाभ परिषदेची कर्तव्ये.

२२. वैद्यकीय लाभ परिषद :—

(क) [३][निगमाला व स्थायी समितीला] वैद्यकीय लाभाचे व्यवस्थापन करणे, लाभ मंजूर करण्याच्या प्रयोजनार्थ प्रमाणपत्रे देणे यांच्याशी संबंधित बाबींवर व इतर निगडित बाबींवर सल्ला देईल;

(ख) वैद्यकीय उपचार व शुश्रूषा यांच्या संबंधात वैद्यक व्यवसायींविरूद्ध आलेल्या तक्रारींच्या बाबतीत विहित करण्यात येतील अशा अन्वेषणांच्या शक्तींचा वापर करील व त्यासंबंधीची कर्तव्ये पार पाडील;

(ग) वैद्यकीय उपचार व शुश्रूषा यांच्या संबंधात, विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय विधानमंडळ" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ९ द्वारे "निगम, स्थायी समिती व वैद्यकीय आयुक्त यांना" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२३. [1][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] विहित करण्यात येतील अशा शक्तींचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील. विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी अन्य कामे देखील तो करील. [1][महासंचालक किंवा वित्त आयुक्त] यांची कर्तव्ये.

२४. निगम, स्थायी समिती किंवा वैद्यकीय लाभ परिषद यांची कोणतीही कृती ही, निगमाच्या, स्थायी समितीच्या किंवा वैद्यकीय लाभ परिषदेच्या घटनेमध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणावरून अथवा त्यांचा कोणताही सदस्य कोणत्याही निरर्हतेच्या अथवा त्याच्या [2][नियुक्ती] मधील किंवा निवडणुकी-मधील कोणत्याही नियमबाह्यतेच्या कारणावरून पद धारण करण्यास किंवा पदावर राहण्यास हक्कदार नव्हता अशा कारणावरून अथवा निगमाच्या स्थायी समितीच्या किंवा वैद्यकीय लाभ परिषदेच्या कोणत्याही सदस्याचे पद रिक्त असतानाच्या कालावधीमध्ये अशी कृती करण्यात आलेली होती या कारणावरून विधिबाह्य ठरते असे मानण्यात येणार नाही. निगम इत्यादींच्या कृती या, घटनेमध्ये दोष असल्याच्या कारणावरून विधिबाह्य होत नाहीत.

२५. विनियमांद्वारे उपबंधित करण्यात येतील त्या क्षेत्रांमध्ये आणि त्या रितीने निगमास प्रादेशिक मंडळे, स्थानिक समित्या आणि प्रादेशिक व स्थानिक वैद्यकीय लाभ परिषदा नियुक्त करता येतील आणि त्यांच्याकडे विनियमांद्वारे उपबंधित करण्यात येतील अशा शक्ती व कामे सोपवून देता येतील. प्रादेशिक मंडळे स्थानिक समित्या, प्रादेशिक व स्थानिक वैद्यकीय लाभ परिषदा.

## प्रकरण तीन

### वित्तव्यवस्था व लेखा परीक्षा

२६. (१) या अधिनियमाखाली केलेली सर्व अंशदाने आणि निगमाच्या वतीने स्वीकारलेल्या इतर सर्व रकमा कर्मचारी राज्य विमा निधी या नावाच्या निधीमध्ये भरण्यात येतील व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ निगम हा निधी धारण करील व त्याचे प्रशासन करील. कर्मचारी राज्य विमा निधी.

(२) निगमास, या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी केंद्र शासनाकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून [3][ * * * ] स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही व्यक्तीकडून किंवा निकायाकडून—मग तो निगमित असो वा नसो—अनुदाने, देणग्या आणि दान स्वीकारता येतील.

[4][(३) या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या इतर उपबंधाच्या व या संबंधात केलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांच्या अधीनतेने उक्त निधीमध्ये उपार्जित होणारे किंवा भरावयाचे सर्व पैसे भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये किंवा केंद्र शासन मान्यता देईल अशा अन्य बँकेमध्ये, "कर्मचारी राज्य विमा निधी", या नावाच्या खात्यामध्ये जमा करण्यात येतील.]

(४) अशा खात्याचा व्यवहार स्थायी समिती निगमाच्या मान्यतेने प्राधिकृत करील असे अधिकारी चालवतील.

२७. [केंद्र शासनाकडून अनुदान.]–कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४), कलम १२ द्वारे निरसित (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

२८. या अधिनियमाच्या व केंद्र शासनाने त्या संबंधात केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधाच्या अधीनतेने, कर्मचारी राज्य विमा निधी केवळ पुढील प्रयोजनांसाठी खर्च करण्यात येईल :— कोणत्याही प्रयोजनांसाठी निधी खर्च करता येईल.

(एक) विमेदार व्यक्तींना लाभापोटी पैसे देणे व त्यांच्यावर वैद्यकीय उपचार व त्यांची शुश्रूषा करण्याची व्यवस्था करणे आणि वैद्यकीय लाभ योजना त्यांच्या कुटुंबांना लागू करण्यात आली असेल त्या बाबतीत या अधिनियमाच्या उपबंधानुसार त्यांच्या कुटुंबासाठी अशा वैद्यकीय लाभाची तरतूद करणे आणि त्यांच्याशी संबंधित आकार व खर्च भागविणे ;

(दोन) निगम, स्थायी समिती आणि वैद्यकीय लाभ परिषद, प्रादेशिक मंडळे, स्थानिक वैद्यकीय लाभ परिषद यांच्या सदस्यांना फी व भत्ते देणे ;

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ८ द्वारे "प्रधान अधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "नामनिर्देशन" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरबदलासह दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९५१ चा अधिनियम ५३, कलम १० द्वारे "भाग ख राज्याकडून" हा मजकूर वगळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

(तीन) निगमाचे अधिकारी व सेवक यांचे पगार, रजा व पदग्रहण-अवधीचे भत्ते, प्रवास विषयक व भरपाई भत्ते, उपदाने, अनुकंपा भत्ते, निवृत्तिवेतने त्यांच्या भविष्य निधीमधील व इतर लाभ निधीमधील अंशदाने प्रदान आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी स्थापन केलेली कार्यालये व अन्य सेवा यांच्या संबंधातील खर्च भागविणे;

(चार) रुग्णालये, दवाखाने आणि इतर संस्था यांची स्थापना करणे आणि त्यांचे परिरक्षण व विमेदार व्यक्तींच्या आणि वैद्यकीय लाभ योजना त्यांच्या कुटुंबांना लागू करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्यांच्या कुटुंबाच्या लाभासाठी वैद्यकीय व इतर सहाय्यभूत सेवांची तरतूद करणे;

(पाच) विमेदार व्यक्तींवर आणि वैद्यकीय लाभ त्यांच्या कुटुंबांना लागू करण्यात आले असतील त्या बाबतीत त्यांच्या कुटुंबावर वैद्यकीय उपचार व शुश्रूषा करण्याचा खर्च-कोणत्याही इमारतीचा व साधनसामुग्रीचा खर्चसुद्धा--भागवण्याकरिता, निगमाने केलेल्या कोणत्याही करारानुसार कोणत्याही राज्य शासनाला [१][ * * * * ] स्थानिक प्राधिकरणाला किंवा कोणत्याही खाजगी संस्थेला किंवा व्यक्तीला अंशदाने देणे ;

(सहा) निगमाच्या हिशेबांची लेखा परीक्षा व त्यांच्या मत्तांचे आणि दायित्वांचे मूल्यांकन करून घेण्यावरील परिव्यय (सर्व खर्चासह) भागवणे;

(सात) या अधिनियमाखाली स्थापन केलेल्या कर्मचारी राज्य विमा न्यायालयांचा परिव्यय (सर्व खर्चासह) भागवणे ;

(आठ) निगमाने किंवा स्थायी समितीने अथवा निगम किंवा स्थायी समिती यांच्याकडून त्या संबंधात रीतसर प्राधिकृत झालेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ केलेल्या कोणत्याही संविदेखाली द्यावयाच्या कोणत्याही रकमांचे प्रदान;

(नऊ) निगम किंवा त्याच्या अधिकाऱ्यांपैकी किंवा सेवकांपैकी कोणीही आपले कर्तव्य पार पाडताना त्याने केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल तो अधिकारी किंवा सेवक याच्याविरुद्ध झालेला कोणत्याही न्यायालयाचा किंवा अधिकरणाचा कोणताही हुकूमनामा, आदेश किंवा निवाडा याखाली अथवा निगमाविरुद्ध सुरू केलेला किंवा मांडलेला कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही किंवा मागणी हक्क यासंबंधी झालेल्या तडजोडीनुसार किंवा समझोत्यानुसार रकमांचे प्रदान करणे;

(दहा) या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही कारवाईमधून उद्भवणारी कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही सुरू करणे किंवा तीत बचाव करणे यावरील परिव्यय व इतर आकार भागविणे;

(अकरा) विमेदार व्यक्तींचे आरोग्य व कल्याण त्यांच्या सुधारणेसाठी आणि विकलांग झालेल्या किंवा इजा पोचलेल्या विमेदार व्यक्तींचे पुनर्वसन व पुन:सेवायोजन यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा खर्च विहित मर्यादेत भागविणे; आणि

(बारा) केंद्र शासनाच्या पूर्वसंमतीने निगम प्राधिकृत करील अशी इतर प्रयोजने.

[२][प्रशासकीय खर्च.

२८क. ज्यांची व्याख्या प्रशासकीय खर्च म्हणून करता येईल असे आणि अशा खर्चावर खर्ची घालण्यात येईल अशी निगमाच्या प्राप्तीची टक्केवारी केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल, त्या प्रमाणे असेल आणि निगम, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा मर्यादेच्या आत आपला प्रशासकीय खर्च ठेवील.]

संपत्ती इ. धारण करणे.

२९. (१) केंद्र शासन विहित करील अशा शर्तींच्या अधीनतेने निगमास जंगम आणि स्थावर अशी दोन्ही प्रकारची संपत्ती संपादन व धारण करता येईल, त्याच्या ठायी विहित झालेली असेल किंवा त्याने संपादन केलेली असेल अशी कोणतीही जंगम आणि स्थावर संपत्ती त्यास विकता येईल किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल. आणि निगम ज्या प्रयोजनांसाठी स्थापन केलेले आहे त्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी त्यास करता येतील.

(२) केंद्र शासन विहित करील अशा शर्तींच्या अधीनतेने निगमास या अधिनियमाखाली जे खर्च भागवणे योग्य आहे त्यासाठी ज्यांची तात्काळ आवश्यकता नसेल असे कोणतेही पैसे वेळोवेळी गुंतवता येतील आणि पूर्वोक्तवत त्या शर्तींच्या अधीनतेने वेळोवेळी, असे गुंतवलेले पैसे पुन्हा गुंतवता येतील किंवा ते सोडवून घेता येतील.

(३) निगमास केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीने आणि ते विहित करील अशा अटींवर कर्जे उभारता येतील आणि कर्जे फेडण्यासाठी उपाययोजना करता येतील.

(४) निगमास, त्याच्या कर्मचाऱ्यांच्या किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही वर्गाच्या लाभासाठी त्याला योग्य वाटेल असा भविष्य निधी किंवा अन्य लाभ निधी घटित करता येईल.

---

१. १९५१ चा अधिनियम ५३, कलम ११ द्वारे, "भाग ख राज्याला" हे शब्द वगळण्यात आले.

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम ९ द्वारे हे कलम समाविष्ट केले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३०. निगमाच्या स्थापनेपूर्वी संपादन केलेली सर्व संपत्ती निगमाकडे निहित होईल आणि त्यातून झालेली सर्व प्राप्ती व या संबंधात झालेला सर्व खर्च निगमाच्या हिशेबपुस्तिकांमध्ये दाखवण्यात येईल. **निगमाकडे संपत्ती निहित होणे.**

३१. [केंद्र शासनाने केलेला खर्च कर्ज म्हणून मानणे]--कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४) कलम १२ द्वारे निरसित (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

३२. निगम प्रत्येक वर्षी, पुढील वर्षामधील आपली संभाव्य आवक किती व किती खर्च करण्याचा आपला विचार आहे ते दर्शविणारा अर्थसंकल्प तयार करील आणि अर्थसंकल्पाची एक प्रत केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी, ते त्या संबंधात निश्चित करील अशा दिनांकापूर्वी सादर करील. निगमावर असलेल्या दायित्वाची पूर्तता करता यावी आणि कामकाजी शिल्लक कायम राखली जावी यासाठी केंद्र शासनाच्या मते पुरेशा असणाऱ्या अशा तरतुदी अर्थसंकल्पामध्ये अंतर्भूत असतील. **अर्थसंकल्पीय अंदाज.**

३३. केंद्र शासन विहित करील अशा नमुन्यामध्ये व अशा रीतीने निगम आपल्या जमा खर्चाचे अचूक हिशेब ठेवील. **हिशेब.**

[1][३४. (१) भारताचे नियंत्रक नि महालेखापरीक्षकाकडून निगमाच्या लेख्याची लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात त्याने केलेला कोणताही खर्च निगमाकडून भारताचे नियंत्रक-नि-महालेखा परीक्षकाला प्रदेय असेल. **लेखापरीक्षा.**

(२) भारताचा नियंत्रक-नि-महालेखापरीक्षक आणि महामंडळाच्या लेख्याच्या लेखापरीक्षेसंबंधात नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, सरकारी लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात नियंत्रक-नि-महालेखा-परीक्षकाला जे अधिकार व विशेषाधिकार असतात तेच अधिकार व विशेषाधिकार असतील आणि विशेषत: वह्या, लेखे, संबंधित प्रमाणके आणि अन्य दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा आणि निगमाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा अधिकार असेल.

(३) भारताच्या नियंत्रक-नि-महालेखापरीक्षकाकडून किंवा त्याने यासंबंधात नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून प्रमाणित करण्यात आलेला निगमाचा लेखा त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह निगमाकडे अग्रेषित करण्यात येईल व निगम नियंत्रक-नि-महालेखापरीक्षकाच्या अहवालावरील आपल्या भाष्यासह शासनाकडे पाठवील.]

३५. निगम आपल्या कामाचा व कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल केंद्र शासनास सादर करील. **वार्षिक अहवाल.**

३६. वार्षिक अहवाल, निगमाचे लेखापरीक्षित लेखे [2][व सोबत कलम ३४ खालील [3][नियंत्रक व महालेखापरीक्षकाचा अहवाल आणि निगमाचा अशा अहवालावरील अभिप्राय] आणि निगमाने अंतिमत: स्वीकारल्याप्रमाणेचा तसा अर्थसंकल्प [4][संसदेपुढे] ठेवण्यात येईल.] [5][ * * * * * ] **अर्थसंकल्प, लेखापरीक्षा झालेले हिशेब आणि वार्षिक अहवाल संसदेपुढे ठेवणे.**

३७. निगम केंद्र शासनाच्या मान्यतेने नियुक्त करण्यात आलेल्या मूल्यांकनकर्त्याकडून पाच वर्षांच्या कालांतरागणिक आपल्या मत्तांचे व दायित्वांचे मूल्यांकन करवून घेईल: **मत्ता व दायित्व यांचे मूल्यांकन.**

परंतु, केंद्र शासनास त्यास आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी मूल्यांकन करून घ्यावे, असा निदेश देण्याची मोकळीक राहील.

## प्रकरण चार

### अंशदाने

३८. हा अधिनियम लागू होणाऱ्या कारखान्यामधील किंवा आस्थापनामधील सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबत, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने या अधिनियमाद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने त्यांचा विमा उतरवण्यात येईल. **सर्व कर्मचाऱ्यांचा विमा उतरविणे.**

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम १० द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४४, कलम १३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ११(एक) द्वारे "लेखापरीक्षकाचा त्यावरील अहवाल" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय विधानमंडळापुढे". या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

५. १९८९ चा अधिनियम २९, कलम ११(दोन) द्वारे "आणि शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येईल" हा मजकूर वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

अंशदाने. ३९. (१) एखाद्या कर्मचाऱ्याच्या संबंधात, या अधिनियमाखाली प्रदेय असलेल्या अंशदानामध्ये नियोक्त्याकडून प्रदेय असलेले अंशदान (यात, यापुढे "नियोक्त्याचे अंशदान" म्हणून निर्दिष्ट) व कर्मचाऱ्याकडून प्रदेय असलेले अंशदान (यात यापुढे "कर्मचाऱ्याचे अंशदान" म्हणून निर्दिष्ट) यांचा समावेश असेल आणि त्याचा भरणा महामंडळाकडे करण्यात येईल:

[1][(२) केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा दराने अंशदाने देण्यात येतील :

परंतु, अशा प्रकारे विहित करावयाचे दर हे कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९८९ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी जे अंमलात होते, त्या दरांपेक्षा अधिक असणार नाहीत.]

[2][(३) कर्मचाऱ्यांच्या संबंधातील वेतनकालावधी हा ज्याच्या संबंधात या अधिनियमान्वये सर्व अंशदाने द्यावी लागतील ते युनिट म्हणून धरला जाईल.]

(४) प्रत्येक [3][वेतनकालावधीच्या] संबंधात प्रदेय असणारी अंशदाने साधारणपणे वेतनकालावधीच्या शेवटच्या दिवशी देय होतील, आणि एखादा कर्मचारी [3][वेतनकालावधीच्या] कोणत्याही भागापुरता नेमला गेला असेल अथवा एकाच वेतनकालावधीमध्ये दोन किंवा अधिक नियोक्त्यांच्या अखत्यारीखाली नेमला गेला असेल त्या बाबतीत, विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी अंशदाने देय होतील.

[4][(५) (क) नियोक्त्याने या अधिनियमाखाली प्रदेय असलेले कोणतेही अंशदान ते ज्या दिनांकास प्रदेय असेल त्या दिनांकास प्रदान न केल्यास, अंशदान प्रत्यक्षात प्रदान करण्याच्या दिनांकापर्यंत तो वर्षाला बारा टक्के या दराने किंवा विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वरच्या दराने सरळव्याज देण्यास पात्र ठरेल :

परंतु, विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेले वरच्या दराचे व्याज हे कोणत्याही अनुसूचित बँकेने आकारलेल्या कर्जाऊ रकमेवरील व्याज, व्याजदराहून अधिक असणार नाही.

(ख) खंड (क) अन्वये वसुली योग्य असलेले कोणतेही व्याज जमीन महसुलाची थकबाकी म्हणून किंवा कलम ४५-ग ते कलम ४५ झ अन्वये वसूल करता येईल.

**स्पष्टीकरण.**— या पोटकलमात "अनुसूचित बँक" याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या दुसऱ्या अनुसूचीत त्यावेळी अंतर्भूत असलेली एखादी बँक, असा आहे.]

प्रधान नियोक्त्याने प्रथमतः अंशदान रकमा भरणे. ४०. (१) प्रधान नियोक्त्याला, प्रत्येक कर्मचाऱ्याच्या संबंधात—मग तो कर्मचारी त्याने थेट नमलेला असो वा निकटतम नियोक्त्याद्वारे किंवा त्याच्यामार्फत नेमलेला असो—नियोक्त्याचे अंशदान व कर्मचाऱ्याचे अंशदान या दोहोंचा भरणा करावा लागेल.

(२) इतर कोणत्याही अधिनियमितीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाचे उपबंध आणि त्याखाली कोणतेही विनियम केलेले असल्यास ते विनियम यांच्या अधीनतेने, प्रधान नियोक्त्याने थेट नेमलेला (सूट मिळालेला कर्मचारी सोडून) कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, कर्मचाऱ्याचे अंशदान हे त्याच्या वेतनातून वजा करून घेऊन अन्य प्रकारे नव्हे, वसूल करण्याचा हक्क असेल :

परंतु, ज्या कालावधीच्या संबंधात किंवा कालावधीच्या भागाच्या संबंधात अंशदान प्रदेय आहे त्याच्याशी संबंध असेल ते खेरीजकरून अन्य कोणत्याही वेतनातून किंवा कर्मचाऱ्याचे त्या कालावधीचे अंशदान जितके असेल त्या रकमेपेक्षा अधिक रकमेची अशाप्रकारे वजात करण्यात येणार नाही.

(३) प्रधान नियोक्त्यास किंवा निकटतम नियोक्त्यास नियोक्त्याचे अंशदान कर्मचाऱ्याला प्रदेय असलेल्या कोणत्याही वेतनातून कापून घेण्याचा किंवा कर्मचाऱ्यांकडून ते अन्यथा वसूल करण्याचा हक्क असणार नाही, मग त्याविरुद्ध अशी कोणतीही संविदा झालेली असली तरी हरकत नाही.

(४) प्रधान नियोक्त्याने या अधिनियमाखाली वेतनातून कापून घेतलेली कोणतीही रक्कम ही, ज्या अंशदानाच्या संबंधात ती कापून घेण्यात आली होती ते अंशदान भरण्याच्या प्रयोजनार्थ, कर्मचाऱ्याला त्याच्याकडे सोपविलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल.

(५) अंशदाने निगमाकडे पाठविण्याचा खर्च प्रधान नियोक्त्याला सोसावा लागेल.

---

१. १९८९ अधिनियम २९, कलम १२ (एक) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ४(क) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमांच्या कलम ४(ख) अन्वये "आठवडा" या शब्दाऐवजी "वेतनाचा कालावधी" हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह "आठवडा" हा शब्द जेथे जेथे आला तेथे तेथे दाखल करण्यात आले.

४. १९८९ चा अधिनियम २९, कलम १२ (दोन) अन्वये हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४१. (१) निकटतम नियोक्त्याद्वारे किंवा त्याच्यामार्फत नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात ज्याने अंशदान भरलेले आहे त्या प्रधान नियोक्त्यास अशातऱ्हेने भरलेल्या अंशदानाची रक्कम (म्हणजेच, नियोक्त्याचे अंशदान व त्याचप्रमाण कर्मचाऱ्याचे अंशदान असल्यास, ते) निकटतम नियोक्त्याकडून, एकतर कोणत्याही संविदेखाली प्रधान नियोक्त्याकडून निकटतम नियोक्त्याला देणे असलेल्या कोणत्याही रकमेतून वळते करून किंवा निकटतम नियोक्त्याकडून देणे असलेले ऋण वसूल करण्याचा हक्क असेल. **निकटतम नियोक्त्याकडून अंशदानाची वसुली.**

[1][(१क) निकटतम नियोक्ता, विनियमांमध्ये उपबंधित केल्यानुसार त्याने किंवा त्याच्यामार्फत नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्याची नोंदवही ठेवील आणि पोटकलम (१) खाली प्रदेय असलेली कोणतीही रक्कम चुकती करण्यापूर्वी प्रधान नियोक्त्याला ती सादर करील.]

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणी, निकटतम नियोक्त्यास त्याने किंवा त्याच्या मार्फत नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून कलम ४० चे पोटकलम (२) च्या परंतुकात विनिर्दिष्ट शर्तींच्या अधीनतेने, वजातीद्वारे कर्मचारी अंशदान वसूल करण्याच्या हक्क असेल.

[2][ * * * * * ]

४२. (१) कोणत्याही कर्मचाऱ्याचे अंशदान ज्या कर्मचाऱ्याचे सरासरी दैनिक वेतन [3][केंद्र शासन विहित करील असे वेतन] यापेक्षा कमी असेल अशा कोणत्याही कर्मचाऱ्याकडून किंवा त्याच्या वतीने प्रदेय असणार नाही. **अंशदानाच्या प्रदानाबद्दल सर्वसाधारण उपबंध.**

**स्पष्टीकरण.**—कर्मचाऱ्याचे दैनिक सरासरी वेतन [4][केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा रीतीने] परिगणना करून ठरवण्यात येईल.

(२) [5][ज्या संपूर्ण [6][वेतन कालावधीच्या] किंवा त्याच्या भागाच्या संबंधात कर्मचाऱ्याला वेतन प्रदेय आहे] त्या प्रत्येक [6][वेतन कालावधीच्या] संबंधात प्रधान नियोक्त्याकडून अंशदान (नियोक्त्याचे अंशदान व कर्मचाऱ्याचे अंशदान अशी दोन्ही) प्रदेय असेल [5][अन्यथा नव्हे].

[7] * * * * *

[8] * * * * *

४३. या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, निगमास, या अधिनियमाखाली प्रदेय असलेल्या अंशदानाचे प्रदान व वसुली यांच्याशी संबद्ध किंवा आनुषंगिक अशा कोणत्याही बाबीकरता विनियम करता येतील आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येतील :— **अंशदानाच्या प्रदानाची पद्धती.**

(क) अंशदाने प्रदान करण्याची रीत व वेळ;

(ख) चिकटमुद्रांक किंवा अन्य मुद्रांक चोपड्यांवर, कार्डांवर अगर अन्यथा डकवून किंवा उमटवून त्या रूपाने अंशदानाचा भरणा करणे आणि असे मुद्रांक कशा रीतीने, कोणकोणत्या वेळी व कोणत्या शर्तींवर डकवावेत किंवा उमटवावेत ते विनियमित करणे;

[9][(खख) अंशदाने भरण्यात आली असल्याबद्दलचा पुरावा कोणत्या दिनांकापर्यंत निगमास मिळावयास हवा; ]

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम १३ अन्वये समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४४, कलम १४ द्वारे स्पष्टीकरण वगळण्यात आले (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम १४ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १४ (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे "ज्या संपूर्ण आठवड्यामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये कर्मचारी कामावर असेल" या मजकुराऐवजी "ज्या संपूर्ण आठवड्याच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात कर्मचाऱ्याला वेतन प्रदेय आहे" हा मजकूर दाखल करण्यात आला व पोटकलमाच्या शेवटी—अन्यथा नव्हे" या मजकुराची भर घालण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ४ (ख) अन्वये "आठवडा" या शब्दाऐवजी "वेतन कालावधी" हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह "आठवडा" हा शब्द जेथे जेथे आला तेथे तेथे दाखल करण्यात आले.

७. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ५ (ग) द्वारे पोटकलम (३) वगळण्यात आले.

८. १९६६ चा अधिनियम ४४, याच्या कलम १५ द्वारे पोटकलमे (४) व (५) वगळण्यात आली (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे हा उपखंड समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

(ग) चोपडया किंवा कार्डे ज्यांच्याशी संबंधित असतील त्या विमेदार व्यक्तींच्या बाबतीत भरलेल्या अंशदानाच्या रकमा व वितरित केलेले लाभ यांच्या तपशिलाची चोपडयांमध्ये किंवा कार्डांवर नोंद घेणे; आणि

(घ) चोपडया किंवा कार्डे देणे, त्यांची विक्री करणे, ती सांभाळून ठेवणे, ती सादर करणे, त्यांचे निरीक्षण आणि सुपूर्दगी करणे व तसेच गहाळ, नष्ट किंवा खराब झालेल्या चोपडया किंवा कार्डे बदलून त्या जागी नवीन चोपडया किंवा कार्डे दाखल करणे.

[1][विवक्षित प्रकरणी नियोक्त्यांनी प्रतिवेदने सादर करणे आणि नोंदवह्या ठेवणे.

४४. (१) प्रत्येक प्रधान आणि निकटतम नियोक्त्याला, निगमाकडे किंवा ते निर्देशित करील अशा त्याच्या अधिकाऱ्याकडे, त्याने नियुक्त केलेल्या व्यक्तींच्याबाबत अगर तो ज्या कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधात प्रधान किंवा निकटतम नियोक्ता असेल त्या कारखान्याबाबत किंवा आस्थापनेबाबत या बाबतीत केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा नमुन्यात व तसा तपशील अंतर्भूत असलेली प्रतिवेदने सादर करावी लागतील.

(२) कोणत्याही कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधात, पोटकलम (१) खाली प्रतिवेदन सादर करणे आवश्यक असूनही ते तसे सादर केलेले नाही असे निगमास सकारण वाटत असेल त्या-बाबतीत, तो कारखाना किंवा ती आस्थापना ही, हा अधिनियम लागू होतो, असा कारखाना किंवा आस्थापना आहे किंवा कसे हे ठरवणे निगमास शक्य व्हावे म्हणून निगम आपणास आवश्यक वाटेल असा तपशील पुरवण्यास कारखान्याचा किंवा आस्थापनेचा प्रभारी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला फर्मावू शकेल.

(३) प्रत्येक प्रधान आणि निकटतम नियोक्त्याला त्याच्या कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधात याबाबतीत केलेल्या विनियमांमध्ये आवश्यक करण्यात येतील अशा नोंदवह्या किंवा अभिलेख ठेवावे लागतील.]

निरीक्षकांचे कार्याधिकार व कर्तव्ये.

४५. (१) निगमास या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींची, ते त्यांना नेमून देईल अशा स्थानिक सीमांमध्ये निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) निगमाने पोटकलम (१) खाली नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक (यात यापुढे "निरीक्षक" म्हणून निर्देशिलेला) किंवा निगमाने यासंबंधात प्राधिकृत केलेला त्याचा अन्य अधिकारी, कलम ४४ मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही प्रतिवेदनामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही तपशिलाच्या यथातथ्यतेबद्दल चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा या अधिनियमाच्या उपबंधांपैकी एखाद्या उपबंधाचे अनुपालन करण्यात आलेले आहे किंवा नाही याची निश्चित माहिती करून घेण्याच्या प्रयोजनार्थ,—

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक वाटेल अशी माहिती आपणाकडे सादर करण्यास कोणत्याही प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याला फर्मावू शकेल; किंवा

(ख) अशा प्रधान किंवा निकटतम नियोक्त्यांच्या ताब्यातील कोणत्याही कार्यालयामध्ये, आस्थापनेमध्ये, कारखान्यामध्ये किंवा अन्य परिवास्तूमध्ये कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करू शकेल आणि तेथे जी कोणी व्यक्ती हुकूमतदार असल्याचे त्यास आढळून येईल त्या व्यक्तीने अशा निरीक्षकास किंवा अन्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील असे व्यक्तींचे सेवायोजन व वेतनाचे प्रदान यांच्याशी संबंधित असे हिशेब, चोपडया आणि अन्य दस्तऐवज त्याच्याकडे सादर करावेत व ते त्याला तपासू द्यावेत किंवा अशी माहिती त्याच्याकडे सादर करावी असे फर्मावू शकेल; किंवा

(ग) पूर्वोक्त प्रयोजनांशी संबद्ध अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याची, त्याच्या एजंटाची किंवा सेवकाची अथवा अशा कारखान्यामध्ये, आस्थापनेमध्ये कार्यालयामध्ये किंवा इतर परिवास्तूमध्ये आढळलेल्या कोणत्याही व्यक्तीची किंवा जी कोणतीही व्यक्ती कर्मचारी आहे किंवा होती असे मानण्यात उक्त निरीक्षकास किंवा अन्य अधिकाऱ्यास वाजवी कारण असेल त्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष तपासणी करू शकेल;

[2][(घ) अशा कारखाना, आस्थापना, कार्यालय किंवा इतर परिवास्तू यामध्ये ठेवण्यात आलेली कोणतीही नोंदवही, हिशेबवही किंवा इतर दस्तऐवज यांच्या नकला करून घेऊ शकेल किंवा त्यातील उतारे काढून घेऊ शकेल;

(ङ) विहित करण्यात येईल अशा अन्य शक्तींचा वापर करू शकेल.]

(३) निरीक्षक हा, निगमाकडून प्राधिकृत करण्यात येईल किंवा विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी कामे करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

---

१. १९५१ चा अधिनियम ५३, कलम १२ द्वारे कलम ४४ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले. भाग बारा २३.

२. वरील अधिनियमाच्या ५३, कलम १३ द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

विवक्षित प्रकरणी अंशदानाचे निर्धारण.

[१][४५क. (१) एखाद्या कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधात कलम ४४ च्या उपबंधानुसार कोणतीही प्रतिवेदने, तपशील, नोंदवह्या किंवा अभिलेख सादर करण्यात, पाठवण्यात किंवा ठवण्यात आलेले नसतील किंवा कलम ४५ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या, निगमाच्या कोणत्याही निरीक्षकास किंवा अन्य अधिकाऱ्यास तो कलम ४५ खाली आपली कामे करीत असताना किंवा आपली कर्तव्ये पार पाडत असताना प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने त्याला [२][कोणत्याही प्रकारे प्रतिबंध] केला तर, त्या बाबतीत, निगम त्याला उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर त्या कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात प्रदेय असलेल्या अंशदानाची रक्कम आदेशाद्वारे निर्धारित करू शकेल :

[३][परंतु, प्रधान नियोक्ता किंवा निकटतम नियोक्ता किंवा कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या प्रभारी व्यक्तीला स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिली नसेल तर, निगमाकडून असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.]

(२) निगमाने पोटकलम (१) खाली काढलेला आदेश हा, निगमाला कलम ७५ खाली मागणी-हक्क आहे याचा किंवा अशा आदेशाद्वारे निर्धारित केलेली रक्कम कलम ४५ख खाली जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे [४][किंवा कलम ४५ग ते कलम ४५झ अन्वये वसूल करण्याजोगी] आहे याचा पुरेसा पुरावा असेल.

अंशदानाची वसुली.

४५ख. या अधिनियमाखाली प्रदेय असलेले कोणतेही अंशदान जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.]

थकबाकीची वसुली अधिकाऱ्याकडे प्रमाणपत्र पाठविणे.

[५][४५ग. (१) या अधिनियमान्वये काही रक्कम बाकी असल्यास प्राधिकृत अधिकारी, थकबाकीची रक्कम विनिर्दिष्ट केलेले प्रमाणपत्र त्याच्या सहीने वसुली अधिकाऱ्याकडे पाठवील आणि वसुली अधिकारी असे प्रमाणपत्र मिळाल्यावर त्यात विनिर्दिष्ट केलेली रक्कम, कारखाना किंवा आस्थापना किंवा प्रकरण-परत्वे, प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडून पुढे उल्लेखिलेल्या एक किंवा अधिक पद्धतीने वसूल करण्याची कार्यवाही करील :—

(क) कारखाना किंवा आस्थापना किंवा प्रकरणपरत्वे प्रधान किंवा त्याच्याशी थेट संबंधित निकटतम नियोक्त्याच्या जंगम किंवा स्थावर संपत्तीवर जप्ती आणणे आणि तिची विक्री करणे.

(ख) नियोक्त्याला अटक करणे, आणि त्याला कारागृहात स्थानबद्ध करणे.

(ग) कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या किंवा प्रकरणपरत्वे नियोक्त्याच्या जंगम किंवा स्थावर संपत्तीच्या व्यवस्थापनासाठी प्रापक नियुक्त करणे :

परंतु, या कलमाखाली कोणत्याही संपत्तीची जप्ती आणि विक्री ही, प्रथम कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संपत्तीची करण्यात येईल आणि अशी जप्ती आणि विक्री ही प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या थकबाकीची संपूर्ण रक्कम वसूल होण्यास अपुरी पडत असेल तर, वसुली अधिकारी, संपूर्ण थकबाकीची रक्कम किंवा तिचा काही भाग वसूल करण्यासाठी नियोक्त्याच्या संपत्तीवर अशी कार्यवाही करू शकेल.

(२) थकबाकीच्या वसुलीसाठी अन्य कोणत्याही पद्धतीने कार्यवाही करण्यात आली असली तरीही, प्राधिकृत अधिकारी पोट-कलम (१) खाली प्रमाणपत्र पाठवील.

ज्याला प्रमाणपत्र द्यावयाचे तो वसुली अधिकारी.

४५घ. (१) प्राधिकृत अधिकारी, कलम ४५ग मध्ये निर्दिष्ट केलेले प्रमाणपत्र ज्याच्या अधिकार क्षेत्रात नियोक्ता,—

(क) त्याचा धंदा किंवा पेशा करीत असेल किंवा ज्याच्या अधिकार क्षेत्रात त्याच्या कारखान्याचे किंवा आस्थापनेचे मुख्य ठिकाण स्थित असेल; किंवा

(ख) राहत असेल किंवा कारखान्याची किंवा आस्थापनेची किंवा प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याची कोणतीही जंगम किंवा स्थावर संपत्ती स्थित असेल;

—त्या वसुली अधिकाऱ्यास पाठवू शकेल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम १७ द्वारे कलमे ४५क व ४५ख समाविष्ट करण्यात आली (१७ जून १९६७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम १५ (एक) (क) द्वारे "अडथळा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या, कलम १५ (एक) (ख) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १५ (दोन) द्वारे "किंवा कलम ४५ग ते कलम ४५झ अन्वये" हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे कलमे ४५ग ते ४५झ समाविष्ट करण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(२) कारखान्याची किंवा आस्थापनेची किंवा प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याची संपत्ती एकापेक्षा अधिक वसुली अधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रात येत असेल आणि प्राधिकृत अधिकाऱ्यान ज्या वसुली अधिकाऱ्याला प्रमाणपत्र पाठविले असेल तो वसुली अधिकारी—

(क) त्याच्या अधिकार क्षेत्रात येत असलेल्या जंगम किंवा स्थावर संपत्तीची विक्री करून संपूर्ण रक्कम वसूल करण्यास समर्थ नसेल, किंवा

(ख) संपूर्ण रकमेची किंवा तिच्या कोणत्याही भागाची वसुली त्वरेने किंवा निश्चितपणे करण्याच्या प्रयोजनार्थ तसे करणे आवश्यक आहे असे त्याचे मत असेल

—त्याबाबतीत, तो प्रमाणपत्र पाठवू शकेल किंवा रक्कम अंशतः वसूल करावयाची असल्यास, केंद्र शासनाने विहित केलेल्या रीतीने प्रमाणित केलेल्या आणि वसूल करावयाची रक्कम विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणपत्राची प्रत वसुली अधिकाऱ्याच्या अधिकार क्षेत्रात कारखान्याची किंवा आस्थापनेची किंवा प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याची संपत्ती आहे किंवा नियोक्ता राहतो, त्या वसुली अधिकाऱ्याकडे पाठवू शकेल आणि त्यानंतर पाठविण्यात आलेले प्रमाणपत्र किंवा त्याची प्रत जणू काही प्राधिकृत अधिकाऱ्याने पाठविलेले प्रमाणपत्र किंवा प्रत असल्याप्रमाणे तो वसुली अधिकारी देखील या कलमाखाली प्रदेय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही करील.

**प्रमाणपत्राची विधिग्राह्यता आणि त्याचे विशोधन.** ४५ ङ. (१) प्राधिकृत अधिकारी, कलम ४५ ग खाली, वसुली अधिकारी प्रमाणपत्र देईल तेव्हा, कारखाना किंवा आस्थापना किंवा प्रधान किंवा निकटतम नियोक्त्यास वसुली अधिकाऱ्यासमोर रकमेच्या अचूकपणाविषयी हरकत घेता येणार नाही आणि अन्य कोणत्याही कारणामुळे प्रमाणपत्राबाबत घेतलेला कोणताही आक्षेपसुद्धा वसुली अधिकाऱ्याकडून स्वीकारला जाणार नाही.

(२) वसुली अधिकाऱ्याकडे, प्रमाणपत्र पाठवले असले तरी, प्रमाणपत्र काढून घेण्याची किंवा वसुली अधिकाऱ्याला सूचना पाठवून प्रमाणपत्रातील कोणतीही लेखनविषयक किंवा अंकगणितीय चूक सुधारण्याची शक्ती प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल.

(३) प्राधिकृत अधिकारी, प्रमाणपत्र काढून घेणारे किंवा ते रद्द करणारे कोणतेही आदेश किंवा पोटकलम (२) खाली त्याने केलेली कोणतीही दुरुस्ती किंवा कलम ४५ याच्या पोटकलम (४) खाली करावयाची कोणतीही सुधारणा वसुली अधिकाऱ्याला कळवील.

**प्रमाणपत्राखालील कार्यवाहीला स्थगिती आणि त्याची सुधारणा किंवा ती काढून घेणे.** ४५ च. (१) वसुली अधिकाऱ्याला, कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र दिलेले असले तरी, प्राधिकृत अधिकारी, रकमेचा भरणा करण्यासाठी वेळ देऊ शकेल आणि त्यानंतर वसुली अधिकारी ती दिलेली मुदत समाप्त होईपर्यंत कार्यवाही स्थगित ठेवील.

(२) रकमेच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याबाबतीत प्राधिकृत अधिकारी, असे प्रमाणपत्र दिल्यानंतर, भरणा केलेल्या कोणत्याही रकमेबाबत किंवा भरणा करण्यासाठी दिलेल्या मदतीबाबत वसुली अधिकाऱ्याला माहिती देत राहील.

(३) ज्या रकमेच्या वसुली प्रीत्यर्थ प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्या वाढीव रकमेची मागणी करणारा आदेश, अपिलात किंवा या अधिनियमाखालील अन्य कार्यवाहीत आपरिवर्तित करण्यात आला असेल, आणि त्याचा परिणाम म्हणून मागणीत कपात केली गेली असेल, परंतु हा आदेश, या अधिनियमाखालील पुढील कार्यवाहीचा विषय वस्तू असेल तर, प्राधिकृत अधिकारी, उक्त कपातीशी संबंधित अशा प्रमाणपत्रातील रकमेच्या भागाची वसुली, ज्या कालावधीपर्यंत अपील किंवा अन्य कार्यवाही प्रलंबित राहील त्या कालावधीपुरता स्थगित ठेवील.

(४) रकमेच्या वसुली प्रीत्यर्थ प्रमाणपत्र देण्यात आले असेल आणि त्यानंतर अपिलाचा किंवा या अधिनियमाखालील अन्य कार्यवाहीचा परिणाम म्हणून अदत्त मागणीच्या रकमेत कपात केली गली असेल तर, अशा अपिलांचा किंवा अन्य कार्यवाहीचा विषयवस्तू असलेला आदेश अंतिम व निर्णायक झाला असेल तेव्हा, प्राधिकृत अधिकारी, प्रकरणपरत्वे प्रमाणपत्र सुधारेल किंवा ते काढून घेईल.

**वसुलीचे अन्य प्रकार.** ४५ छ. (१) कलम ४५ ग अन्वये प्रमाणपत्र वसुली अधिकाऱ्याला दिले असले तरी, महासंचालक किंवा निगमाने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी या कलमात उपबंधित केलेल्या कोणत्याही एका किंवा अधिक पद्धतीने रक्कम वसूल करू शकेल.

(२) कोणत्याही कारखान्याला किंवा आस्थापनेला किंवा प्रकरणपरत्वे, प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याला कोणत्याही व्यक्तीकडून काही रक्कम देय असल्यास महासंचालक किंवा निगमाने याबाबतीत प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी, या अधिनियमाखाली अशा कारखान्याकडून किंवा आस्थापनेकडून किंवा प्रकरणपरत्वे, प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडून येणे असलेल्या उक्त रकमेतून रक्कम वजा करण्यास फर्मावू शकेल आणि अशी व्यक्ती अशा कोणत्याही फर्मानाचे अनुपालन करील आणि अशा रीतीने वजा केलेली रक्कम निगमाच्या खाती जमा करील :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ९) याच्या कलम ६० अन्वये दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्तीतून वगळण्यात आलेल्या रकमेच्या कोणत्याही भागाला लागू होणार नाही.

(३) (एक) महासंचालक, किंवा निगम याबाबतीत प्राधिकृत करील असा कोणताही अधिकारी, ज्याच्याकडे रक्कम थकित आहे अशा कारखान्याला किंवा आस्थापनेला किंवा प्रकरणपरत्वे प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याला किंवा कारखान्यासाठी किंवा आस्थापनेसाठी किंवा कारखान्याच्या वतीने किंवा आस्थापनेच्या वतीने जो पैसा स्वत:कडे ठेवून घेणे किंवा नंतर ठेवून घेईल अशा कोणत्याही व्यक्तीला जिच्याकडून रक्कम देय आहे किंवा देय झाली आहे अशा व्यक्तीस, एक तर पैसा देय झाल्यावर लगेच किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत (पैसा देय होण्याच्या किंवा ठेवून घेण्याच्या पूर्वीची नसेल अशा वेळेच्या आत) कारखान्याकडून किंवा आस्थापनेकडून किंवा प्रकरणपरत्वे प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडून देय असलेली रक्कम फेडण्यासाठी पुरेसा असेल एवढा पैसा किंवा त्या देय रकमेएवढी किंवा त्या रकमेपेक्षा कमी असेल तेव्हा त्या पैशाचा संपूर्ण भाग निगमाला देण्यास फर्मावि शकेल.

(दोन) प्रधान किंवा निकटतम नियोक्त्यासाठी किंवा त्याच्या खात्यावर जी व्यक्ती एखाद्या इतर व्यक्तीसह संयुक्तपणे पैसा धारण करील किंवा नंतर पैसा धारण करु शकेल अशा व्यक्तीला या पोट-कलमाखाली नोटीस देण्यात येईल, आणि या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, विरूद्ध सिद्ध होईपर्यंत खात्यातील संयुक्त धारकाचे भाग हे समान असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

(तीन) नोटिशीची एक प्रत महासंचालकाला किंवा प्रकरणपरत्वे, अशाप्रकारे प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला ज्ञात असलेल्या अंतिम पत्त्यावर, प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडे पाठवण्यात येईल किंवा संयुक्त खाते असेल त्या प्रकरणी, सर्व संयुक्त धारकांना, महासंचालकाला किंवा प्रकरणपरत्वे अशा प्रकारे प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला संयुक्त धारकांना ज्ञात असलेल्या अंतिम पत्त्यावर पाठवता येईल.

(चार) या पोट-कलमात उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, जिला या पोट-कलमाखाली नोटीस पाठविलेली आहे अशी प्रत्येक व्यक्ती अशा नोटिशीचे अनुपालन करण्यास बांधील राहील आणि विशेषत: अशी कोणतीही नोटीस एखादे डाकघर, बँक किंवा विमाकाराला पाठविलेली असेल त्याबाबतीत कोणताही नियम, प्रथा किंवा आवश्यक गोष्ट विरूद्ध असली तरी, प्रदान होण्यापूर्वी कोणतीही नोंद, पृष्ठांकन किंवा तशाच प्रयोजनार्थ, कोणतेही पास-बुक, निक्षेप पावती, विमा पत्र किंवा अन्य कोणताही दस्तऐवज सादर करण्याची आवश्यकता असणार नाही.

(पाच) कोणतीही संपत्ती, जिच्याशी संबंधित या पोट-कलमाखाली नोटीस काढण्यात आलेली आहे अशा संपत्तीसंबंधात उद्‌भवलेला कोणताही मागणी हक्क नोटीस काढल्याच्या दिनांकानंतर नोटिशीत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही मागणी हक्कामुळे निरर्थक ठरेल.

(सहा) ज्या व्यक्तीला या पोट-कलमाखाली नोटीस पाठविली आहे, तिने शपथपूर्वक निवेदनाद्वारे त्या नोटिशीत असा आक्षप घेतला असेल की, मागणी हक्क दाखल केलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याला प्रदेय नाही किंवा तिने प्रधान किंवा निकटतम नियोक्त्यासाठी किंवा त्याच्या निमित्ताने कोणताही पैसा धारण केलेला नाही तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशी कोणतीही रक्कम किंवा प्रकरणपरत्वे, तिचा कोणताही भाग प्रदान करण्यासाठी अशा व्यक्तीला भाग पाडण्यात आल्याचे मानले जाणार नाही :

परंतु, असे कोणतेही निवेदन कोणत्याही महत्त्वपूर्ण तपशिलाच्या बाबतीत खोटे असल्याचे आढळून आल्यास अशी व्यक्ती महासंचालक किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला नोटीस पाठविल्याच्या दिनांकास प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडे असलेले तिचे स्वत:चे दायित्व किंवा या अधिनियमाखाली प्रदेय असलेल्या कोणत्याही रकमेचे प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडे असलेले दायित्व, यापैकी जे कमी असेल त्या दायित्वापुरती व्यक्तिश: जबाबदार राहील.

(सात) महासंचालक किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेला अधिकारी, कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी या पोट-कलमाखाली काढलेली कोणतीही नोटीस सुधारू किंवा अपहृत करु शकेल किंवा अशा नोटिशीस अनुसरुन कोणतेही प्रदान करण्याची मुदत वाढवू शकेल.

(आठ) महासंचालक अशा रीतीने प्राधिकृत केलेला अधिकारी, या पोट कलमाखाली काढलेल्या नोटिशीच्या अनुपालनार्थ, प्रदान केलेल्या कोणत्याही रकमेबद्दल पावती देईल आणि अशा रीतीने रक्कम प्रदान करणारी व्यक्ती, प्रदान केलेल्या रकमेच्या बाबतीत, प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याच्या दायित्वा-तून पूर्णपणे विमुक्त होईल.

(नऊ) या पोट-कलमाखालील नोटीस मिळाल्यानंतर, प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याच्या कोण-त्याही दायित्वातून नियुक्त होणारी कोणतीही व्यक्ती अशा प्रकारे विमुक्त झालेल्या तिच्या स्वत:च्या प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडे असलेले तिचे स्वत:चे दायित्व किंवा या अधिनियमाखाली कोणत्याही प्रदेय रकमेचे प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याचे दायित्व यापैकी कमी असेल त्या दायित्वापुरती तितका महासंचालक किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेला अधिकारी याला व्यक्तीश: दायी राहील.

(दहा) या पोट-कलमाखाली ज्या व्यक्तीला नोटीस पाठविली असेल ती व्यक्ती त्या नोटिशीस अनुसरून महासंचालकाकडे किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे प्रदान करण्यास चुकल्यास, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या रकमेबाबत ती व्यक्ती ही कसूर करणारी प्रधान किंवा निकटतम नियोक्ता असल्याचे मानले जाईल आणि रकमेच्या वसुलीसाठी जणू काही ती रक्कम त्याच्याकडून प्रदेय असल्याप्रमाणे, कलमे ४५ग ते ४५च मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने तिच्याविरुद्ध पुढील कार्यवाही केली जाईल आणि वसुली अधिकाऱ्याने कलम ४५ग खाली त्याच्या शक्तींचा वापर करून आणलेल्या कर्जावरील टाच असल्याप्रमाणे ती नोटीस तशीच परिमाणकारक होईल.

(४) महासंचालक, किंवा केंद्र शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी, ज्या न्यायालयाच्या अभिरक्षेत प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याच्या मालकीचा पैसा आहे त्या न्यायालयाकडे अशा संपूर्ण पैसा किंवा तो प्रदेय रकमेहून जास्त असल्यास प्रदेय असलेली रक्कम चुकती करण्यास पुरेशी असेल अशी रक्कम त्याला प्रदान करण्यासाठी अर्ज करु शकेल.

(५) महासंचालक किंवा केंद्र शासनाने अशा रीतीने प्राधिकृत केल्यास, निगमाचा कोणताही अधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कारखान्याकडून किंवा आस्थापनेकडून किंवा प्रकरणपरत्वे प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याकडून प्रदेय असलेल्या रकमेची कोणतीही थकबाकी अटकावून ठेवील आणि आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याच्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये घालून दिलेल्या रीतीने त्याची किंवा त्याच्या जंगम संपत्तीची विक्री करुन वसुली करु शकेल.

आयकर अधिनियमाचे विवक्षित उपबंध लागू असणे. ४५ज. आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या अनुसूचीचे उपबंध आणि वेळोवेळी अंमलात असणारे आयकर (प्रमाणपत्र कार्यवाही) नियम, १९६२ हे जणू काही उक्त उपबंध आणि निर्देशिलेले नियम आयकराच्या ऐवजी या अधिनियमाखालील अंशदानाच्या व्याजाच्या किंवा नुकसानीच्या रकमेच्या थकबाकीला जसे लागू होतात त्याप्रमाणे ते आवश्यक त्या आपरिवर्तनांसह, आयकर अधिनियमाऐवजी लागू होतील :

परंतु, उक्त उपबंध आणि नियम यामधील "करपात्र व्यक्ती" कोणत्याही निर्देशाचा अर्थ, या अधिनियमाखालील कारखाना किंवा आस्थापना किंवा प्रधान किंवा निकटतम नियोक्त्याचा निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

व्याख्या. ४५झ. कलम ४५ग ते ४५ज याच्या प्रयोजनार्थ,—

(क) "प्राधिकृत अधिकारी" याचा अर्थ, महासंचालक, विमा आयुक्त, विमा सहआयुक्त प्रादेशिक संचालक किंवा केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करील असा अन्य अधिकारी, असा आहे ;

(ख) "वसुली अधिकारी" याचा अर्थ, ज्याला वसुली अधिकाऱ्याच्या या अधिनियमाखालील शक्तीचा वापर करण्यासाठी केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करील, असा केंद्र शासनाचा, राज्य शासनाचा किंवा निगमाचा कोणताही अधिकारी, असा आहे.]

## प्रकरण पाच

### लाभ

लाभ. ४६. (१) या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, विमेदार व्यक्तींना, [1][त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना किंवा, प्रकरणपरत्वे, यात यापुढे नमूद केलेल्या व्यक्तींना] पुढील लाभ मिळण्याचा हक्क असेल :—

(क) कोणत्याही विमेदार व्यक्तीला, तिच्या आजाराबद्दल रीतसर नेमणूक झालेल्या वैद्यक व्यवसायीने [2][किंवा निगम या बाबतीत, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अर्हता आणि अनुभव असणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीने] प्रमाणपत्र दिल्यास त्या बाबतीत, नियतकालिक प्रदाने (यात यापुढे "रुग्णता लाभ" म्हणून निर्दिष्ट);

[3][(ख) विमेदार स्त्रीला प्रसवावस्था किंवा गर्भपात या बाबतीत अथवा गरोदरपणा, प्रसवावस्था बालकाचा अकाली जन्म किंवा गर्भपात यांमधून उद्‌भवणारा आजार याबाबतीत नियतकालिक प्रदाने (यात यापुढे "प्रसुति लाभ" म्हणून निर्दिष्ट)— मात्र विनियमांद्वारे या संबंधात विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाने अशी स्त्री अशा प्रदानास पात्र असल्याचे प्रमाणित केले पाहिजे;]

(ग) या अधिनियमाखालील कर्मचारी म्हणून असताना झालेल्या सेवाजन्य इजेच्या परिणामी विकलांग झालेल्या व विनियमांद्वारे या संबंधात विनिर्दिष्ट केलेल्या, प्राधिकरणाने नियतकालिक प्रदानांस पात्र असल्याचे प्रमाणित केलेल्या विमेदार व्यक्तीस;

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम १८ द्वारे, "किंवा, प्रकरणपरत्वे त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

(घ) या अधिनियमाखालील कर्मचारी म्हणून असताना झालेल्या सेवाजन्य इजेच्या परिणामी मरण पावलेल्या विमेदार व्यक्तीच्या ज्या अवलंबित व्यक्ती वा अधिनियमाखालील भरपाईस हक्कदार असतात अशा अवलंबित व्यक्तींना नियतकालिक प्रदाने (यात यापुढे "अवलंबितांचा लाभ" म्हणून निर्दिष्ट); [1][ * * * ]

(ङ) विमेदार व्यक्तीवर वैद्यकीय उपचार व त्यांची शुश्रूषा (यात यापुढे "वैद्यकीय लाभ" म्हणून निर्दिष्ट); [2][आणि]

[2][ (च) जी विमेदार व्यक्ती मरण पावलेली आहे तिच्या मागे कुटुंबात हयात राहिलेल्या सर्वात ज्येष्ठ व्यक्तीला मृत विमेदार व्यक्तीच्या उत्तरक्रियेच्या खर्चापोटी किंवा विमेदार व्यक्ती कुटुंबवान नसेल किंवा तिच्या मृत्यूसमयी ती आपल्या कुटुंबासमवेत राहत नव्हती असे असेल त्या बाबतीत प्रत्यक्ष मृत विमेदार व्यक्तीच्या उत्तरक्रियेचा खर्च करणाऱ्या व्यक्तीला [3][उत्तरक्रिया खर्च] म्हणून मानण्यात येईल असे प्रदान :

परंतु, अशा प्रदानाची रक्कम [4][केंद्र शासन विहित करील अशा रकमेपेक्षा] अधिक असणार नाही व अशा प्रदानाबाबतचा मागणी हक्क विमेदार व्यक्तीच्या मृत्यूपासून तीन महिन्यांच्या आत अथवा निगम किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण परवानगी देईल अशा वाढीव मुदतीत दाखल करावा लागेल.]

२) निगमत (शासनाच्या,चमुसि विनंतीवरून आणि विनियमांमध्ये घालून देण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने विमेदार व्यक्तीच्या कुटुंबाला वैद्यकीय लाभ उपलब्ध करून देऊ शकेल.

[5] * * * *

४८. [व्यक्ती रोजगारासाठी उपलब्ध असल्याचे केव्हा समजावयाचे.]—कर्मचारी विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४), कलम २० द्वारे निरसित.

[6][४९. रुग्णता लाभ मिळण्यासाठी व्यक्तीची अर्हता, ज्या शर्तींच्या अधीनतेने असे लाभ देण्यात येतील त्या शर्ती, यांचा दर आणि कालावधी, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल. **रुग्णता लाभ.**

५०. प्रसुतिविषयक लाभ मिळण्यासाठी विमेदार स्त्रीची अर्हता, ज्या शर्तींच्या अधीनतेने असे लाभ देण्यात येतील त्या शर्ती, त्यांचा दर आणि कालावधी केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.] **प्रसूतिविषयक लाभ**

[7][५१. या अधिनियमाच्या [8][ * * * ] अधीनतेने, **विकलांगता लाभ.**

(क) तीनपेक्षा कमी नसतील इतक्या दिवसांची (अपघाताचा दिवस वगळून) तात्पुरती विकलांगता प्राप्त होणाऱ्या व्यक्तीस [9][केंद्र शासन विहित करील अशा दराने व अशा कालावधी-करिता आणि अशा शर्तींच्या अधीनतेने] नियतकालिक प्रदान मिळण्याचा हक्क असेल ;

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम १८ द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे "आणि" हा शब्द व खंड (च्) समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम १७(एक) द्वारे "उत्तरक्रिया प्रसुविधा" या मजकुराऐवजी "उत्तरक्रिया खर्च" हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १७ (दोन) द्वारे "शंभर रुपये" या मजकुराऐवजी "केंद्र शासन विहित करील अशा रकमेपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून.)

५. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे कलम ४७ वगळण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या, कलम १९ द्वारे मूळ कलमाऐवजी ही कलमे दाखल करण्यात आली (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २२ द्वारे मूळ कलम ५१ ऐवजी कलमे ५१ ते ५१ घ ही दाखल करण्यात आली (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून.)

८. १९८९चा अधिनियम २९, कलम २० (एक) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम २० (दोन) द्वारे "विकलांगतेबद्दल पहिल्या अनुसूचीच्या उपबंधानुसार" या मजकुराएवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

(ख) कायमची विकलांगता—मग ती संपूर्ण असो वा आंशिक असो—प्राप्त झालेल्या व्यक्तीला [1][केंद्र शासन विहित करील अशा दराने व अशा कालावधीकरिता आणि अशा शर्तींच्या अधीनतेने] नियतकालिक प्रदान मिळण्याचा हक्क असेल ;

[2][*      *      *      *      *      *]

रोजगाराच्या ओघात उद्भवणाऱ्या अपघातांबाबत गृहीतक.

**५१ क.** विमेदार व्यक्तीच्या रोजगाराच्या ओघात उद्भवलेला अपघातसुद्धा त्या रोजगारामुळे उद्भवला असे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ तद्विरुद्ध पुराव्याच्या अभावी, गृहीत धरण्यात येईल.

विनियम इत्यादींचा भंग करून काम करत असताना अपघात होणे.

**५१ ख.** विमेदार व्यक्ती अपघाताच्या वेळी, तिला लागू असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांचे किंवा तिच्या नियोक्त्याकडून किंवा त्याच्या वतीने देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशांचे उल्लंघन करून काम करत असली किंवा तिच्या नियोक्त्याकडून तशा सूचना मिळालेल्या नसतानाही काम करत असली तरीही तो अपघात हा विमेदार व्यक्तीच्या रोजगारामुळे सेवेतून किंवा तिच्या ओघात उद्भवला असे पुढील बाबतीत मानण्यात येईल :—

(क) पूर्वोक्ताप्रमाणे उल्लंघन करून किंवा, प्रकरणपरत्वे, तिच्या नियोक्त्याकडून सूचना मिळालेल्या नसताना काम केले गेले नसते तर, अपघात अशा प्रकारे उद्भवल्याचे मानण्यात आले असते अशी स्थिती असेल तर, आणि

(ख) नियोक्त्याला उदीम किंवा धंदा त्यांच्या प्रयोजनार्थ, आणि त्याच्या संबंधात काम करण्यात आले असेल तर.

नियोक्त्याच्या परिवाहनातून प्रवास करत असताना अपघात होणे.

**५१ ग.** (१) विमेदार व्यक्ती, ही तिच्या नियोक्त्याच्या व्यक्त वा गर्भित परवानगीने, एखाद्या वाहनातून तिच्या कामाच्या ठिकाणाहून अन्य ठिकाणी उतारू म्हणून जात असेल अथवा कामाच्या ठिकाणी येत असेल त्यावेळी अपघात झाल्यास नियोक्त्याने त्या व्यक्तीवर त्याच वाहनातून प्रवास करण्याचे बंधन घातलेले नसले तरी सुद्धा तो अपघात पुढील बाबतीत, त्या व्यक्तीच्या सेवेतून व त्याच्या ओघात उद्भवल्याचे मानण्यात येईल :—

(क) त्या व्यक्तीवर तसे बंधन घातले असते तर, अपघात तशा प्रकारे उद्भवल्याचे मानण्यात आले असते अशी स्थिती असेल तर, आणि

(ख) अपघाताच्या वेळी, ती वाहन सेवा—

(एक) त्या व्यक्तीच्या नियोक्त्याकडून किंवा त्याच्यावतीने, अथवा नियोक्त्याने ज्या व्यक्तीबरोबर व्यवस्था केलेली असून त्या व्यवस्थेनुसार जिने ती सेवा पुरविली असेल अशा अन्य व्यक्तीकडून चालवण्यात येत असेल तर ; आणि

(दोन) सार्वजनिक परिवहन सेवेच्या नित्यक्रमानुसार चालविली जात नसेल तर.

(२) या कलमात "वाहन" यात जलयान व वायुयान यांचाही समावेश आहे.

संकटप्रसंगी काम करताना अपघात होणे.

**५१ घ.** विमेदार व्यक्ती ही, तिच्या नियोक्त्याचा उदीम किंवा धंदा याच्या प्रयोजनार्थ, ज्या एखाद्या परिवास्तूमध्ये त्या त्या काळी कामाला असेल त्या परिवास्तूमध्ये किंवा तिच्या आसपास त्या विमेदार व्यक्तीला अपघात झालेला असून त्या परिवास्तूमध्ये प्रत्यक्ष उद्भवलेल्या किंवा मानीव अशा संकटप्रसंगी ज्या व्यक्ती जखमी झालेल्या व धोकाग्रस्त आहेत अथवा तशा स्थितीत आहेत असे वाटते अथवा तसे होण्याची शक्यता आहे अशा व्यक्तींना संकटातून बाचवण्यासाठी, मदत देण्यासाठी व संरक्षण देण्यासाठी किंवा संपत्तीचे गंभीर नुकसान टाळण्यासाठी वा ते कमी करण्यासाठी ती विमेदार व्यक्ती उपाययोजना करत असताना तो अपघात घडला असेल तर, तो अपघात त्या विमेदार व्यक्तीच्या सेवेतून व त्याच्या ओघात झाला असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम २० (तीन) द्वारे "विकलांगतेबद्दल पहिल्या अनुसूचीच्या उपबंधानुसार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २० (चार) द्वारे "परंतुक" वगळण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

**अवलंबित व्यक्तीला लाभ.**

[1][५२. (१) एखादी विमेदार व्यक्ती, ती या अधिनियमाखालील कर्मचारी म्हणून असताना तिला झालेल्या सेवाजन्य इजेच्या परिणामी मरण पावली तर, (त्या इजेमुळे तिला आलेल्या तात्पुरत्या विकलांगतेबद्दल त्या व्यक्तीला ठराविक कालांतरागणिक काही रक्कम मिळत असो वा नसो) कलम २ खंड (६क) चा [2][उपखंड (एक—क)] आणि उपखंड (दोन) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्या व्यक्तीच्या अवलंबित व्यक्तींना [3][केंद्र शासन विहित करील अशा दराने व अशा कालावधीकरता आणि अशा शर्तींना अधीन राहून] अवलंबित व्यक्तींचा लाभ प्रदेय होईल.

(२) जर विमेदार व्यक्ती मरण पावली व तिच्यामागे पूर्वोक्त अशा कोणीही अवलंबित व्यक्ती हयात नसतील तर त्याबाबतीत, अवलंबितांचा लाभ [4][केंद्र शासन विहित करील अशा दराने व अशा कालावधीकरिता आणि अशा शर्तींना अधीन राहून] त्या मृत व्यक्तीच्या इतर अवलंबित व्यक्तींना देण्यात येईल.

**व्यवसायजन्य रोग.**

५२क. (१) तिसऱ्या अनुसूचीच्या भाग "क" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या सेवेवर असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला, त्यात विनिर्दिष्ट केलेला विशेषेकरून त्या सेवेतून उद्‌भवणारा व्यवसायजन्य रोग जडला किंवा त्या अनुसूचीच्या भाग "ख" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सेवेत सहा महिन्यांहून कमी नसेल इतका काळ सतत कामाला असलेल्या कर्मचाऱ्याला त्या भागात विनिर्दिष्ट केलेल्या त्या सेवेमुळे विशेषेकरून उद्‌भवणारा व्यवसायजन्य रोग जडला अथवा त्या अनुसूचीच्या भाग "ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या सेवेवर निगम अशा प्रत्येक सेवेकरिता विनिर्दिष्ट करील अशा सलग कालावधीपर्यंत कामाला असलेल्या कर्मचाऱ्याला त्यात विनिर्दिष्ट केलेला असा, त्या सेवेतून विशेषेकरून उद्‌भवणारा व्यवसायजन्य रोग जडला तर, विरुद्ध काही शाबीत न झाल्यास, तो रोगसंसर्ग ही "सेवाजन्य इजा" असल्याचे आणि ती इजा त्या सेवेतून व त्याच्या ओघात झाल्याचे मानण्यात येईल.

(२) (एक) जेव्हा केंद्र शासन किंवा प्रकरणपरत्वे, राज्य शासन, कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) त्याच्या कलम ३ पोटकलम (३) द्वारे त्याजकडे निहित झालेल्या अधिकारान्वये त्या अधिनियमाच्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सेवांच्या यादीत अन्य एखाद्या सेवेच्या वर्णनाची भर घालील तेव्हा, उक्त सेवेचे वर्णन आणि त्या सेवेचे वैशिष्टय म्हणून त्या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेले व्यवसायजन्य रोगाचे वर्णन हा तिसऱ्या अनुसूचीचा भाग असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) खंड (एक) च्या उपबंधांना बाध न येता, निगम शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आपला तसा उद्देश असल्याबद्दल तीन पेक्षा कमी नसतील इतक्या महिन्याची नोटीस देऊन नंतर तशाच एका अधिसूचनेद्वारे, तिसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट असलेल्या सेवांच्या यादीत अन्य कोणत्याही कामधंद्याचे वर्णन जादा दाखल करु शकेल आणि अशा दाखल केलेल्या वर्णनाच्या सेवेच्या बाबतीत या कलमाच्या प्रयोजनार्थ, कोणते रोग हे त्या त्या सेवेचे वैशिष्टय म्हणून व्यवसायजन्य रोग म्हणून जणू काही या अधिनियमाद्वारे जाहीर करण्यात आलेले असावेत त्याप्रमाणे त्यांना या अधिनियमांचे उपबंध लागू होतील.

(३) पोटकलम (१) व (२) यांमध्ये उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही कर्मचाऱ्याला त्याच्या सेवेमुळे किंवा त्याच्या ओघात उद्‌भवलेल्या अपघातामुळे झालेल्या विशिष्ट इजेचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून एखादा रोग झालेला असल्याशिवाय त्या रोगासंबंधात कोणताही लाभ प्रदेय होणार नाही.

(४) हे कलम ज्या प्रकरणांना लागू होते त्यांना कलम ५१क चे उपबंध लागू होणार नाहीत.]

**इतर कोणत्याही कायद्यान्वये भरपाई किंवा नुकसानी घेण्यास किंवा वसूल करण्यास आडकाठी.**

[5][५३. कोणत्याही विमेदार व्यक्तीला किंवा तिच्या अवलंबित व्यक्तीला, ती विमेदार व्यक्ती या अधिनियमाखालील कर्मचारी म्हणून असताना झालेल्या सेवाजन्य इजेच्या संबंधात, कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) याखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्याखाली किंवा अन्यथा विमेदार व्यक्तीच्या नियोक्त्याकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही भरपाई वा नुकसानी घेण्याचा वा वसूल करण्याचा हक्क असणार नाही.]

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २४ द्वारे मूळ कलम ५२ ऐवजी कलमे ५२ व ५२-क दाखल करण्यात आली (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम २१(क) (दोन) द्वारे मूळ मजकूर "उपखंड (एक)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २१(क्) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २१ (ख्) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २५ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

[1][ विकलांगतेच्या प्रश्नाबाबत निर्णय.

५४. (क) संबंधित अपघाताच्या परिणामी कायमची विकलांगता आली आहे काय; किंवा

(ख) उपार्जन क्षमतेची कितपत हानी झाली आहे हे तात्पुरते वा अंतिमरीत्या निर्धारित करता येईल काय; किंवा

(ग) उपार्जन क्षमतेची हानी किती प्रमाणात झाली आहे त्यासंबंधीचे निर्धारण तात्पुरते आहे की अंतिम आहे; किंवा

(घ) तात्पुरत्या निर्धारणाच्या बाबतीत, असे निर्धारण किती कालावधीपर्यंत ग्राह्य मानता येईल;

यांपैकी कोणत्याही प्रश्नाचा निर्णय, विनियमांच्या उपबंधानुसार स्थापन केलेल्या वैद्यकीय मंडळाकडून घेतला जाईल आणि अशा कोणत्याही प्रश्नाचा निर्देश यापुढे "विकलांगतेचा प्रश्न" म्हणून करण्यात येईल.

वैद्यकीय मंडळाकडे निर्णयार्थ निर्देशन आणि वैद्यकीय अपील अधिकरणांकडे व कर्मचारी विमा न्यायालयांकडे अपिले.

५४क. (१) कोणत्याही विमेदार व्यक्तीचे कायम विकलांगता लाभ मिळण्यासंबंधीचे प्रकरण, निगम वैद्यकीय मंडळाकडे विकलांगतेच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी निर्देशित करील आणि जर अशा निर्देशनाअंती किंवा त्यानंतरच्या निर्देशनाअंती, विमेदार व्यक्तीच्या उपार्जनाच्या हानीचे तात्पुरते निर्धारण करण्यात आले असेल तर ते प्रकरण तात्पुरत्या निर्धारणासाठी विचारात घेतलेला कालावधी संपलेला नाही तोवर पुन्हा वैद्यकीय मंडळाकडे निर्देशित करण्यात येईल.

(२) जर विमेदार व्यक्तीचे किंवा निगमाचे वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाने समाधान झाले नाही तर, विमेदार व्यक्ती किंवा निगम विहित पद्धतीने आणि विहित कालावधीत पुढील प्रमाणे अपील करु शकेल :—

(एक) विनियमांच्या उपबंधांनुसार घटित झालेल्या वैद्यकीय अपील अधिकरणाकडे त्यानंतर पुढे विहित पद्धतीने व विहित कालावधीत कर्मचारी विमा न्यायालयाकडे अपील करण्याचा अधिकार राहील ; किंवा

(दोन) थेट कर्मचारी विमा न्यायालयाकडे :

[2][परंतु, विमेदार व्यक्तीने वैद्यक मंडळाच्या निर्णयाच्या आधारे विकलांगता लाभांच्या परिवर्तनासाठी अर्ज केला असल्यास आणि लाभांचे परिवर्तित मूल्य मिळाले असल्यास अशा व्यक्तीस या पोटकलमाखाली कोणतेही अपील करता येणार नाही :

परंतु, आणखी असे की, निगमाने वैद्यक मंडळाच्या निर्णयाच्या आधारे विकलांगता विषयक लाभांचे परिवर्तित मूल्य दिले असल्यास, निगमास या पोटकलमाखाली कोणतेही अपील करता येणार नाही.]]

[3][ वैद्यकीय मंडळाने किंवा वैद्यकीय अपील अधिकरणाने निर्णयांचे पुनर्विलोकन करणे.

५५. (१) वैद्यकीय मंडळाची किंवा वैद्यकीय अपील अधिकरणाची नवीन पुराव्यावरून जर अशी खात्री झाली की, कर्मचाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने महत्त्वाचे तथ्य उघड न केल्याने किंवा अपदेशन केल्याने परिणामी असा निर्णय देण्यात आला आहे तर, वैद्यकीय मंडळाने किंवा वैद्यकीय अपील अधिकरणाने या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही निर्णयाचे वैद्यकीय मंडळाला किंवा, प्रकरणपरत्वे, वैद्यकीय अपील अधिकरणाला कोणत्याही वेळी पुनर्विलोकन करता येईल (मग याप्रमाणे वस्तुस्थिती उघड न करणे किंवा अपदेशन करणे हे कपटपूर्ण असो वा नसो.)

(२) संबंधित सेवाजन्य इजेच्या परिणामी आलेल्या विकलांगतेचे निर्धारण केल्यानंतर संबंधित इजेमुळे झालेले परिणाम जास्त प्रमाणात व अनपेक्षितपणे विकोपाला गेले आहेत अशी जर वैद्यकीय मंडळाची खात्री पटली तरी देखील ते मंडळ त्या निर्धारणाचे पुनर्विलोकन करू शकेल :

परंतु, निर्धारणाच्या वेळी विचारात घेतलेला कालावधी व उपरोक्ताप्रमाणे परिणाम विकोपाला जाण्याकरता लागणारा संभाव्य कालावधी यांचा विचार करता, निर्धारणाचे पुनर्विलोकन न करणे हे फारच अन्यायकारक होईल असे वैद्यकीय मंडळाचे मत असल्याशिवाय, या पोटकलमानुसार निर्धारणाचे पुनर्विलोकन करण्यात येणार नाही.

(३) वैद्यकीय अपील अधिकरणाची परवानगी घेतल्याखेरीज, कोणत्याही निर्धारणाच्या बाबतीत, त्या निर्धारणाच्या तारखेपासून पाच वर्षांच्या आत किंवा तात्पुरत्या निर्धारणाच्या बाबतीत, सहा महिन्यांच्या आत केलेल्या कोणत्याही अर्जानुसार पोटकलम (२) अन्वये पुनर्विलोकन केले जाणार नाही आणि असे पुनर्विलोकन केल्यानंतर, अशा सुधारित निर्धारणाच्या वेळी विचारात घेतल्या जाणाऱ्या कालावधीमध्ये अर्जाच्या तारखेच्या पूर्वीचा कालावधी समाविष्ट केला जाणार नाही.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २६ द्वारे मूळ कलम ५४ ऐवजी कलमे ५४ व ५४ क ही दाखल करण्यात आली (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून.)

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम २२ द्वारे ही परंतुके समाविष्ट करण्यात आली (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २७ द्वारे मूळ कलम ५५ ऐवजी कलमे ५५ व ५५ क ही दाख करण्यात आली (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

(४) या कलमाच्या पूर्वगामी उपबंधांच्या अधीनतेने, वैद्यकीय मंडळ, पुनर्विलोकनाच्या प्रकरणाच्या बाबतीत, ते प्रकरण त्याच्याकडे प्रथमच विचारार्थ निर्देशित केले असते तर, त्यावर ज्या कोणत्याही रीतीने कार्यवाही करील, आणि विशेषकरून पुनर्विलोकनासाठी पाठवलेले निर्धारण हे अंतिम स्वरूपाचे असले तरीही त्या प्रकरणी तात्पुरते निर्धारण करू शकेल ; आणि कलम ५४क याचे उपबंध जसे, त्या कलमाखाली विकलांगता लाभाच्या प्रकरणाला आणि अशा प्रकरणातील वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाला लागू होतात तसेच ते, या कलमाखाली पुनर्विलोकनासाठी केलेल्या अर्जाला आणि अशा अर्जाबाबत वैद्यकीय मंडळाने दिलेल्या निर्णयालाही लागू होतील.

५५क. (१) हक्क मागणीदाराने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने महत्त्वाचे तथ्य प्रकट न केल्यामुळे अथवा त्याबाबत अपदेशन केल्यामुळे असा निर्णय देण्यात आला होता (मग ते अप्रकटीकरण किंवा अपदेशन हे कपटपूर्ण असो वा नसो) किंवा एखाद्या जन्माच्या वा मृत्यूच्या घटनेमुळे अथवा हक्क मागणीदाराचा विवाह वा पुनर्विवाह झाल्यामुळे किंवा हक्क मागणीदाराची विकलांगता नष्ट झाल्यामुळे किंवा हक्क मागणीदार अठरा वर्षे वयाचा झाल्यामुळे तो निर्णय यापुढे या अधिनियमानुसार वैध ठरणार नाही अशी जर निगमाची नवीन पुराव्यावरून खात्री झाली तर या अधिनियमान्वये अवलंबित व्यक्तीस लाभ देण्याविषयीच्या कोणत्याही निर्णयाचे कोणत्याही वेळी निगमाला पुनर्विलोकन करता येईल. अवलंबितांच्या लाभाचे पुनर्विलोकन.

(२) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, उपरोक्ताप्रमाणे पुनर्विलोकन केल्यानंतर, निगम अवलंबितांचा लाभ तसाच चालू ठेवावा, वाढवावा, कमी करावा किंवा बंद करावा, असा निदेश देऊ शकेल.]

५६. (१) एखाद्या विमेदार व्यक्तीला किंवा (अशी वैद्यकीय लाभ योजना तिच्या कुटुंबालाही लागू असेल त्याबाबतीत) तिच्या कुटुंबातील ज्या व्यक्तीला तिच्या परिस्थितीनुसार वैद्यकीय उपचार व शुश्रुषा यांची आवश्यकता आहे त्या व्यक्तीला वैद्यकीय लाभ मिळण्याचा हक्क असेल. वैद्यकीय लाभ.

(२) एकतर एखाद्या रुग्णालयात, दवाखान्यात, चिकित्सालयात किंवा इतर कोणत्याही संस्थेत बाह्यरुग्ण म्हणून विमेदार व्यक्तीवर उपचार करणे व तिची शुश्रूषा करून किंवा विमेदार व्यक्तीच्या घरी जाऊन अथवा तिला रुग्णालयात किंवा अन्य संस्थेत आंतररुग्ण म्हणून दाखल करून घेऊन तिच्यावर उपचार करून अशा प्रकारचा वैद्यकीय लाभ देता येईल.

(३) एखाद्या व्यक्तीच्या संबंधात ज्या [1][कालावधीकरता] अंशदान प्रदेय असेल किंवा ज्या [1][कालावधीत] ती रुग्णता लाभ किंवा प्रसुती लाभ मिळण्यास पात्र ठरत असेल [2][किंवा त्या व्यक्तीला ज्यामुळे तो विनियमांखालील वैद्यकीय लाभ मिळण्यास अपात्र ठरत नाही अशा प्रकारचा विकलांगता लाभ मिळत असेल] अशा कोणत्याही [1][कालावधीत] ती व्यक्ती वैद्यकीय लाभ मिळण्यास हक्कदार असेल :

परंतु, ज्या व्यक्तीच्या संबंधात या अधिनियमानुसार अंशदान प्रदेय असणे बंद होईल त्या व्यक्तीला विनियमात उपबंधित करण्यात येईल तेवढ्या कालावधीसाठी आणि अशा स्वरूपात वैद्यकीय लाभ देता येईल :

[3][परंतु आणखी असे की, कायमच्या विकलांगतेमुळे जी विमेदार व्यक्ती विमायोग्य सेवेत असण्याचे बंद झाले असेल तर, अंशदानाचे प्रदान आणि केंद्र शासनाकडून विहित करण्यात येतील अशा अन्य शर्ती यांच्या अधीनतेने, तिला अशी कायमची विकलांगता सोसावी लागली नसती तर, तिचे नियत सेवावधीचे वय झाल्यावर ज्या दिनांकास तिचे पद रिक्त झाले असते त्या दिनांकापर्यंत तिला वैद्यकीय लाभ मिळणे चालू राहील :

परंतु आणखी असे की, ज्या विमेदार व्यक्तीचे नियत सेवावधीचे वय पूर्ण झाले आहे ती व्यक्ती, आणि तिचा विवाहसाथी अंशदानाचे प्रदान आणि केंद्र शासनाकडून विहित करण्यात येतील अशा अन्य शर्ती यांच्या अधीनतेने, वैद्यकीय लाभ मिळण्यास पात्र राहतील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात, विमेदार व्यक्तीच्या संबंधात "नियमत सेवावधी" याचा अर्थ, ती व्यक्ती सेवासंविदा किंवा सेवाशर्ती यांमध्ये नियत करण्यात आले असेल ते वय किंवा जे वय पूर्ण झाल्यावर ती विमायोग्य सेवा सोडील ते वय किंवा असे कोणतेही वय निश्चित करण्यात आलेले नसेल त्याबाबतीत साठ वर्षे वय, आणि त्या वयानंतर ती व्यक्ती सेवेत नसणे, असा आहे.]

---

१. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ८ अन्वये "आठवडा" हा शब्द जेथे जेथे आला तेथे तेथे "वेतन कालावधी" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात आला.

२. १९५१ चा अधिनियम ५३, कलम १७ द्वारे, "किंवा विनियमात उपबंधित केल्याप्रमाणे तिला विकलांगता प्रसुविधा मिळत असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम २३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

वैद्यकीय लाभांची प्रमाणश्रेणी.

५७. (१) विमेदार व्यक्तीला आणि (जिथे अशी वैद्यकीय लाभ योजना तिच्या कुटुंबाला लागू करण्यात आली असेल तेथे राज्य शासन किंवा निगम उपबंधित करील अशा स्वरूपाची आणि तशाच प्रमाणश्रेणीनुसार वैद्यकीय लाभ मिळण्याचा हक्क असेल, आणि विमेदार व्यक्तीला किंवा, ज्याबाबतीत अशी वैद्यकीय लाभ योजना तिच्या कुटुंबाला लागू करण्यात आली असेल तेथे) तिच्या कुटुंबाला, ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंब ज्याकडे सोपविण्यात आले असेल तो दवाखाना, रुग्णालय, चिकित्सालय किंवा अशी अन्य संस्था यांमध्ये मिळणाऱ्या वैद्यकीय उपचाराव्यतिरिक्त, किंवा विनियमांनुसार उपबंधित करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, अन्य कोणतेही वैद्यकीय उपचार मागण्याचा हक्क असणार नाही.

(२) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, विमेदार व्यक्तीला आणि (जेथे अशी वैद्यकीय लाभ योजना तिच्या कुटुंबाला लागू करण्यात आली असेल तेथे) तिच्या कुटुंबाला, विनियमात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही वैद्यकीय उपचारांच्या संबंधात केलेल्या कोणत्याही खर्चाची निगमाकडून प्रतिपूर्ती मागण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

राज्य शासनाकडून वैद्यकीय उपचारांची व्यवस्था.

५८. (१) राज्य शासन, विमेदार व्यक्तींसाठी आणि (जेथे अशी लाभ योजना त्यांच्या कुटुंबांनाही लागू करण्यात आलेली असेल तेथे) त्यांच्या कुटुंबासाठी, राज्यात वाजवी वैद्यकीय, शस्त्रक्रियाविषयक व प्रसूतिविषयक उपचारांची व्यवस्था करील :

परंतु, राज्य शासन निगमाची मान्यता घेऊन, संमत होतील अशा अटींवर व शर्तींवर आणि अशा प्रमाणश्रेणीत वैद्यक व्यवसायीच्या चिकित्सालयात वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करू शकेल.

(२) जेव्हा एखाद्या राज्यात, विमेदार व्यक्तींना "रुग्णता लाभाबद्दलचा" दायित्वभार अखिल भारतीय सरासरीपेक्षा जास्त असल्याचे आढळून येईल त्याबाबतीत, जास्तीच्या रकमेचे दायित्व निगम आणि राज्य शासन यांच्यातील करारात निश्चित करण्यात येईल त्या प्रमाणात त्यांच्यात वाटून घेण्यात येईल :

परंतु, निगम एखाद्या बाबतीत, राज्य शासनाने जितका खर्च सोसावयाचा त्याचा काही भाग किंवा ती संपूर्ण रक्कम वसूल करण्याबाबत हक्कवर्जन करू शकेल.

(३) विमेदार व्यक्तींना आणि (जेथे अशी वैद्यकीय लाभ योजना कुटुंबांनाही लागू करण्यात आली असेल तेथे) त्यांच्या कुटुंबांना (इमारती, साधनसामग्री, औषधे आणि कर्मचारी वर्ग यांच्या तरतुदींसह) द्यावयाच्या वैद्यकीय उपचारांचे स्वरूप व प्रमाण आणि त्याच्या खर्चाची तसेच विमेदार व्यक्तींना द्यावयाच्या रुग्णता लाभाच्याबाबतीतील जास्तीच्या खर्चाच्या रकमेची निगम व राज्य शासन यांच्यात वाटणी यासंबंधी निगम राज्य शासनाशी संविदा करू शकेल.

(४) निगम व एखादे राज्य शासन यांच्यात उपरोक्त संविदा झाली नसेल तर, राज्य शासनाने व्यवस्था करावयाच्या वैद्यकीय उपचारांचे स्वरूप व व्याप्ती आणि त्याबाबतचा खर्च, तसेच रुग्णता लाभाच्या बाबतीतील जास्तीच्या खर्चाची रक्कम निगम व ते शासन यांच्यात कोणत्या प्रमाणात वाटून घ्यावयाची याबाबतचा निर्णय, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीने नियुक्त केलेल्या लवादामार्फत केला जाईल (हा लवाद म्हणजे जी व्यक्ती [1][ [2][एखाद्या राज्याच्या] उच्च न्यायालयाचा] न्यायाधीश आहे किंवा तत्पूर्वी होती अशी व्यक्ती असेल) आणि या लवादाचा निवाडा निगमावर व राज्य शासनावर बंधनकारक राहील.

निगमाने रुग्णालये, इत्यादी स्थापन करणे व चालविणे.

५९. (१) निगम, विमेदार व्यक्तीच्या फायद्याच्या दृष्टीने आणि (जेथे अशी वैद्यकीय लाभ योजना त्यांच्या कुटुंबांनाही लागू करण्यात आली असेल तेथे) त्यांच्या कुटुंबांच्या फायद्याच्या दृष्टीने त्यास योग्य वाटतील अशी रुग्णालये, दवाखाने आणि इतर वैद्यकीय व शस्त्रक्रियाविषयक सेवा, राज्य शासनाच्या संमतीने स्थापन करू व चालवू शकेल.

(२) विमेदार व्यक्तींना आणि (जेथे अशी वैद्यकीय लाभ योजना त्यांच्या कुटुंबांनाही लागू करण्यात आली असेल तेथे) त्यांच्या कुटुंबांना एखाद्या क्षेत्रात वैद्यकीय उपचार व देखभाल यांची सोय उपलब्ध करून देण्याविषयी आणि त्यांचा खर्च वाटून घेण्याविषयी निगम [3][ * * *] स्थानिक प्राधिकरणाबाहेर, खाजगी संस्थेबरोबर किंवा व्यक्तीबरोबर करार करू शकेल.

[4][राज्य शासनाऐवजी निगमाने वैद्यकीय लाभाची तरतूद करणे.

५९क. (१) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरीही निगमाला, राज्य शासनाशी विचारविनिमय करून राज्यातील विमेदार व्यक्तींना आणि तेथे अशी वैद्यकीय लाभ योजना त्यांच्या कुटुंबांनाही लागू करण्यात आली असेल तेथे, अशा विमेदार व्यक्तींच्या कुटुंबांना वैद्यकीय लाभ पुरवण्याची जबाबदारी अंगावर घेता येईल. मात्र, अशा वैद्यकीय लाभाच्या खर्चाला राज्य शासन व निगम यांच्यातील करारानुसार संमत होईल अशा प्रमाणात राज्य शासनाने वाटेकरी व्हावे ही त्याबाबतची शर्त राहील.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांताच्या उच्च न्यायालयाचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९५१ चा अधिनियम ५३, कलम १८ द्वारे "भाग क राज्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधि अनुकूलन (क्रमांक ४) आदेश, १९५७ याद्वारे "भाग ख राज्य" हे शब्द वगळण्यात आले.

४. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१७ जून १९६७ रोजी व तेव्हापासून).

(२) निगमाने पोटकलम (१) खालील आपल्या शक्तींचा वापर केल्यास, या अधिनियमाखाली मिळणाऱ्या वैद्यकीय लाभासंबंधीचे उपबंध हे शक्य असेल तेथवर, त्यातील राज्य शासनाचे उल्लेख जणू काही निगमाचे उल्लेख असावेत अशा रीतीने लागू होतील.]

## सर्वसाधारण

६०. (१) या अधिनियमाखालील कोणत्याही लाभांची कोणतीही रक्कम घेण्याचा अधिकार हस्तांतरणीय किंवा अभिहस्तांकनीय असणार नाही.

लाभ अभिहस्तांकनीय किंवा जप्तीयोग्य असणार नाहीत.

(२) या अधिनियमान्वये रोख रकमेत प्रदेय असलेले लाभ कोणत्याही न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीच्या ओघात होणाऱ्या जप्तीस किंवा विक्रीस पात्र असणार नाही.

६१. जेव्हा एखाद्या व्यक्तीला या अधिनियमाखाली तरतूद करण्यात आलेले लाभ मिळण्याचा हक्क असेल तेव्हा, तिला अन्य कोणत्याही अधिनियमाखाली अनुज्ञेय असलेली तत्सदृश इतर कोणतेही लाभ मिळण्याचा हक्क राहणार नाही.

इतर अधिनियमांखाली लाभ प्रतिबंध.

६२. विनियमांत उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला, या अधिनियमाखाली अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही [1][विकलांगता लाभांचे] ठोक रकमेत परिवर्तन करून घेण्याचा हक्क असणार नाही.

व्यक्तींना रोख रकमेचे लाभ परिवर्तित करता येणार नाहीत.

[2][६३. विनियमांत उपबंधित करण्यात येईल ते खेरीज करून, कोणतीही व्यक्ती आजारपणविषयक लाभ किंवा त्याला वेतन मिळणाऱ्या ज्या दिवशी ती काम करते किंवा रजेवर राहते किंवा सुट्टीवर राहते त्या कोणत्याही दिवसाच्या किंवा संपावर राहते त्या कोणत्याही दिवसाच्या तात्पुरत्या विकलांगतेसाठी विकलांगताविषयक लाभ मिळण्यास पात्र राहील.]

विवक्षित प्रकरणी व्यक्तींना लाभ मिळण्याचा हक्क असणार नाही.

६४. ज्या व्यक्तीला (कायम स्वरूपाच्या विकलांगतेच्या आधारे लाभ देण्यात येणाऱ्या लाभा-व्यतिरिक्त) आजारपणाविषयीचे लाभ किंवा विकलांगता लाभ मिळत असेल त्या व्यक्तीला—

आजारपण किंवा विकलांगता लाभ स्वीकारणाऱ्या व्यक्तींनी शर्तींचे अनुपालन करणे.

(क) या अधिनियमाखाली उपलब्ध करून दिलेल्या दवाखान्यात, रूग्णालयात, चिकित्सालयात किंवा अन्य संस्थेत वैद्यकीय उपचार करून घ्यावे लागतील आणि तेथील प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने किंवा वैद्यकीय परिचालकाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल ;

(ख) वैद्यकीय उपचार करून घेत असताना, ज्यामुळे तिची बरे होण्याची शक्यता दुरावेल अथवा तिला बाध येईल अशा तऱ्हेची कोणतीही गोष्ट करता येणार नाही ;

(ग) ज्या क्षेत्रात या अधिनियमात तरतूद केलेले वैद्यकीय उपचार तिच्यावर करण्यात येत असतील ते क्षेत्र, वैद्यकीय अधिकाऱ्याच्या वैद्यकीय परिचारकाच्या किंवा विनियमानुसार या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय सोडून जाता येणार नाही ; आणि

(घ) रीतसर नियुक्त झालेल्या कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून [3][ * * * ] किंवा निगम यांसंबंधात प्राधिकृत करील अशा कोणत्याही व्यक्तीकडून स्वतःची तपासणी करून घ्यावी लागेल.

६५. (१) विमेदार व्यक्ती एकाच कालावधीसाठी—

लाभ एकत्रित न करणे.

(क) रुग्णता लाभ व प्रसुतीलाभ हे दोन्ही ; किंवा

(ख) रुग्णता लाभ व तात्पुरत्या विकलांगतेबाबतचे विकलांगता लाभ हे दोन्ही ; किंवा

(ग) प्रसुतीलाभ व तात्पुरत्या विकलांगतेबाबतचे विकलांगता लाभ हे दोन्ही

मिळण्यास हक्कदार असणार नाही.

(२) ज्या बाबतीत एखाद्या व्यक्तीला पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या लाभांपैकी एकापेक्षा अधिक लाभ मिळण्याचा हक्क असेल त्याबाबतीत आपण कोणता लाभ घ्यावयाचा हे ठरवण्याचा तिला हक्क असेल.

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम २४ द्वारे "नियतकालिक प्रदानांचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे "किंवा रुग्ण-वीक्षकाकडून" हा मजकूर वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६६. [विवक्षित प्रकरणी नियोक्त्याकडून नुकसानी वसूल करण्याचा निगमाचा अधिकार]—कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४), कलम २९ अन्वये निरसित (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

६७. [विवक्षित प्रकरणी क्षतिपूर्ती करून घेण्याचा निगमाचा अधिकार]—कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४), कलम २९ द्वारे निरसित (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

**प्रधान नियोक्ता कोणतेही अंशदान भरण्यास कसूर केले करील वा दुर्लक्ष करील त्याबाबतीत निगमाचा अधिकार.**

६८. (१) या अधिनियमान्वये एखाद्या कर्मचाऱ्याच्या बाबतीतील, जे अंशदान भरण्याचे दायित्व प्रधान नियोक्त्यावर असेल ते अंशदान भरण्यात एखाद्या प्रधान नियोक्त्याने कसूर केली वा त्याकडे दुर्लक्ष केले आणि त्या कारणास्तव त्या कर्मचाऱ्याचा एखादा लाभ मिळण्याचा हक्क, हिरावून घेतला जात असेल किंवा कमी प्रमाणात लाभ मिळण्यास तो हक्कदार ठरत असेल तर, ते अंशदान प्रधान नियोक्त्यानेच भरावयास पाहिजे होते अशी निगमाची खात्री झाल्यास, निगम, त्या कर्मचाऱ्यास अशा रीतीने अशी कसूर वा असे दुर्लक्ष झाले नसते तर ज्या दराने लाभ मिळण्यास तो कर्मचारी हक्कदार ठरला असता त्या दराने लाभ देईल आणि निगमास, प्रधान नियोक्त्याकडून एकतर—

[1][(एक) निगमाने उक्त व्यक्तीस दिलेली लाभाची रक्कम आणि नियोक्त्याने वास्तवात भरलेल्या अंशदानाच्या आधारे प्रदेय झाली असती अशा लाभाची रक्कम यांमधील तफावतीची रक्कम ; किंवा]

(दोन) नियोक्त्याने जे अंशदान भरण्यात कसूर केली असेल वा दुर्लक्ष केले असेल त्या रकमेच्या दुपटी एवढी रक्कम यापैकी अधिक असेल अशी रक्कम वसूल करण्याचा हक्क राहील.

(२) या कलमाखाली [2][किंवा कलम ४५ग ते कलम ४५ञ अन्वये] वसूल करण्याजोगी रक्कम ही जणू काही जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे वसूल करता येईल.

**अत्यधिक रुग्णता लाभाबद्दल कारखाने इत्यादींच्या मालकांचे किंवा कार्यचालकांचे दायित्व.**

६९. (१) विमेदार व्यक्तींमधील आजारपणाचे अत्यधिक प्रमाण पुढील कारणांमुळे, म्हणजे—

(एक) कारखान्यातील किंवा आस्थापनेतील अस्वच्छता किंवा कारखान्याच्या व आस्थापनेच्या मालकावर वा कार्यचालकावर कोणत्याही अधिनियमितीद्वारे वा त्या अन्वये लादण्यात आलेल्या आरोग्यविषयक विनियमांचे अनुपालन करण्याबाबत त्याने केलेले दुर्लक्ष यामुळे उद्भवलेले आहे; किंवा

(दोन) विमेदार व्यक्ती रहात असलेल्या कोणत्याही गाळ्यातील किंवा निवासस्थानातील अस्वच्छतेचे वातावरण यामुळे उद्भवले असून, ते गाळ्यांच्या वा निवासस्थानांच्या मालकावर कोणत्याही अधिनियमितीद्वारे किंवा त्याअन्वये लादण्यात आलेल्या आरोग्यविषयक विनियमांचे अनुपालन करण्याबाबत त्याने दुर्लक्ष केल्याच्या परिणामी निर्माण झालेले आहे,

असे निगमाचे मत असेल त्याबाबतीत, निगम त्या कारखान्याच्या वा आस्थापनेच्या मालकाकडे अथवा कार्यचालकाकडे किंवा, प्रकरणपरत्वे, त्या गाळ्यांच्या वा निवासस्थानांच्या मालकाकडे, निगमाने रुग्णता लाभासाठी खर्च केलेली जादा रक्कम देण्यासंबंधी मागणी करु शकेल; आणि जर, ती मागणी संविदेद्वारे मान्य करण्यात आली नाही तर निगम आपल्या मागणीला पुष्टी देणारे निवेदन सोबत जोडून ते प्रकरण समुचित शासनाकडे विचारार्थ पाठवू शकेल.

(२) एखादे प्रकरण, हे प्रथमदर्शनी चौकशी करण्यासारखे आहे असे समुचित शासनाचे मत असेल तर ते शासन त्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी सक्षम अशा एका वा अनेक व्यक्तींची नेमणूक करू शकेल.

(३) जर अशा चौकशीअंती, कारखान्याच्या वा आस्थापनेच्या मालकाने वा कार्यचालकाने किंवा, प्रकरणपरत्वे, गाळ्यांच्या वा निवासस्थानांच्या मालकाने कसूर केल्याने किंवा दुर्लक्ष केल्याने विमेदार व्यक्तींमधील आजाराचे प्रमाण अत्यधिक झाले आहे असे ती चौकशी करणाऱ्या व्यक्तीची वा व्यक्तींची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध झाले तर ती किंवा त्या व्यक्ती, अशा रुग्णता लाभासाठी किती जादा रक्कम खर्च झाली आणि ती रक्कम कोणत्या व्यक्तीने वा व्यक्तींनी संपूर्णतः वा अंशतः निगमाकडे भरावी याचा निर्णय करतील.

(४) पोटकलम (३) अन्वये केलेला निर्णय म्हणजे जणू काही दिवाणी न्यायालयाने एखाद्या खटल्यात रकमेचे प्रदान करण्याबाबत दिलेला हुकूमनामा असावा त्याप्रमाणे त्या निर्णयाची अंमलबजावणी करविता येईल.

(५) या कलमाच्या प्रयोजनार्थ, गाळ्यांचा व निवासस्थानांचा "मालक" या संज्ञेमध्ये मालकाचा कोणताही अभिकर्ता किंवा मालकाचा पट्टेदार, या नात्याने गाळ्यांचे किंवा निवासस्थानांचे भाडे वसूल करण्यास हक्कदार असलेली कोणतीही व्यक्ती यांचा समावेश आहे.

---

१. १९५१ चा अधिनियम ५८, कलम १९ द्वारे मूळ खंड (एक) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम २७ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

**अयोग्य रीतीने मिळालेला लाभ परत करणे.**

७०. (१) जेव्हा एखाद्या व्यक्तीला, ती कायदेशीररीत्या हक्कदार नसताना या अधिनियमान्वये एखादा लाभ किंवा रक्कम मिळालेली असेल तेव्हा, ती व्यक्ती अशा रीतीने मिळालेल्या लाभाचे मूल्य किंवा, अशी रक्कम निगमाला परत करण्यास दायी राहील किंवा ती व्यक्ती मरण पावल्यास, तिचा प्रतिनिधी त्याच्या हातात त्या मृत व्यक्तीची काही मत्ता असल्यास, त्या मत्तेतून ती चुकती करण्यास दायी राहील.

(२) रोख रकमेव्यतिरिक्त इतर जे काही लाभ मिळाले असतील त्यांचे मूल्य त्या संदर्भात केलेल्या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याकडून निर्धारित केले जाईल आणि अशा प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

(३) या कलमाखाली [१][किंवा कलम ४५ग ते कलम ४५ झ अन्वये] वसूल करण्याजोगी रक्कम ही जणू काही जमीन-महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे वसूल करता येईल.

**मृत्यूच्या दिवसापर्यंत व तो दिवस जमेस धरून द्यावयाचा लाभ.**

७१. [२][एखाद्या व्यक्तीला ज्या कालावधीबद्दल या अधिनियमान्वये रोख रकमेत लाभ मिळण्याचा हक्क असेल अशा कोणत्याही कालावधीत ती मृत्यू पावली तर] त्या व्यक्तीच्या मृत्यूच्या दिवसापर्यंत व तो दिवस धरून तिला मिळणाऱ्या लाभाची रक्कम, त्या मृत व्यक्तीने, विनियमांत विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात जिचे लेखी नामनिर्देशन केलेले असेल अशा एखाद्या व्यक्तीला किंवा अशा प्रकारे कोणाही व्यक्तीचे नामनिर्देशन केलेले नसेल तर, मृत व्यक्तीच्या वारसदाराला किंवा कायदेशीर प्रतिनिधीला देण्यात येईल.

**नियोक्त्याने मजुरी कमी न करणे इत्यादी.**

७२. या अधिनियमानुसार, प्रदेय असलेल्या कोणत्याही अंशदानाचे दायित्व आपणांवर आहे एवढ्याच केवळ कारणावरून कोणत्याही नियोक्त्याला, कोणत्याही कर्मचाऱ्याची मजुरी प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे कमी करता येणार नाही, अथवा त्या कर्मचाऱ्याच्या सेवाशर्तींनुसार त्याला प्रदेय असलेले जे लाभ या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या लाभांसारखे असतील ते लाभ देण्याचे विनियमांत उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, बंद किंवा कमी करता येणार नाहीत.

**नियोक्त्याने कर्मचाऱ्याला आजारपण इत्यादींच्या कालावधीत बडतर्फ न करणे किंवा शिक्षा न देणे.**

७३. (१) कर्मचारी, ज्या काळात रुग्णता किंवा प्रसुती लाभ घेत असेल त्या काळात नियोक्ता त्या कर्मचाऱ्याला बडतर्फ, कार्यमुक्त किंवा पदावनत करू शकणार नाही अथवा अन्य शिक्षा देऊ शकणार नाही; तसेच, कर्मचारी ज्या काळात तात्पुरत्या विकलांगतेबाबत विकलांगता लाभ घेत असेल अथवा आजारपणामुळे वैद्यकीय उपचार घेत असेल अथवा गरोदरपणात वा बाळंतपणात उद्भवणारा आजार म्हणून विनियमांनुसार रीतसर प्रमाणित केलेल्या आजारामुळे काम करण्यास असमर्थ झाल्याने तो कर्मचारी कामावर अनुपस्थित असेल त्या काळात, नियोक्ता, विनियमांनुसार उपबंधित केले असेल तेवढे खेरीज-करून एरव्ही, त्या कर्मचाऱ्यास बडतर्फ, कार्यमुक्त वा पदावनत करू शकणार नाही किंवा अन्यथा शिक्षा देऊ शकणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काळात एखाद्या कर्मचाऱ्याला दिलेली बडतर्फीची किंवा कार्यमुक्तीची वा पदावनतीची कोणतीही नोटीस विधिग्राह्य वा क्रियाशील होणार नाही.

## [३][[४][प्रकरण पाच—क ]

### अस्थायी उपबंध

**नियोक्त्याचे विशेष अंशदान.**

७३क. (१) या प्रकरणातील उपबंध जोवर अंमलात राहतील तोवर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक प्रधान नियोक्त्याला निगमाकडे, पोटकलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने विशेष अंशदान (यात यापुढे "नियोक्त्याचे विशेष अंशदान" म्हणून निर्दिष्ट) द्यावे लागेल.

(२) नियोक्त्याचे विशेष अंशदान हे, ज्या क्षेत्रात प्रकरण चार व पाच या दोन्हीचे उपबंध अंमलात असतील त्या क्षेत्रातील कारखान्याच्या वा आस्थापनेच्या बाबतीत, प्रकरण चार नुसार प्रदेय असलेल्या नियोक्त्याच्या अंशदानाऐवजी द्यावयाचे अंशदान म्हणून मानले जाईल.

(३) नियोक्त्याचे विशेष अंशदान हे, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील तितके टक्के मात्र नियोक्त्याच्या एकूण वेतन—बिलाच्या रकमेच्या पाच टक्क्यांहून अधिक नव्हे—एवढे असेल :

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम २७ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २८ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला. (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून)

३. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २० द्वारे प्रकरण पाच-क समाविष्ट करण्यात आले.

४. प्रकरण पाच-क याचे उपबंध १ जुलै, १९७३ पासून परिणामक असल्याचे बंद झाले, पहा अधिसूचना क्र. १७३(इ) दोन विभाग (३) (दोन), दिनांक २६ मार्च, १९७३.

परंतु, ही टक्केवारी ठरविण्यापूर्वी किंवा बदलण्यापूर्वी, केंद्र शासन आपला तसा उद्देश असल्याबद्दल तशाच अधिसूचनेद्वारे दोनपेक्षा कमी नसतील इतक्या सहिन्यांची नोटीस देईल आणि अशा अधिसूचनेमध्ये केंद्र शासनाने जी टक्केवारी निश्चित करण्याचे ठरवले असेल ती टक्केवारी किंवा, प्रकरणपरत्वे, आधीच निश्चित केलेल्या टक्केवारीत किती प्रमाणात बदल करायचा आहे ते प्रमाण विनिर्दिष्ट करील :

परंतु आणखी असे की, प्रकरण चार व पाच या दोन्हींचे उपबंध जेथे अंमलात आहेत अशा कोणत्याही क्षेत्रातील कारखान्यांच्या वा आस्थापनेच्या बाबतीत, नियोक्त्याचे विशेष अंशदान हे, ज्या क्षेत्रात उक्त प्रकरणांचे उपबंध अंमलात नाहीत अशा क्षेत्रातील कारखान्यांच्या वा आस्थापनांच्या बाबतीतील अंशदानाच्या दरापेक्षा अधिक दराने निश्चित केले जाईल.

(४) नियोक्त्याचे विशेष अंशदान हे, त्याचे मजुरी देण्याचे दायित्व प्रोद्भूत झाल्याबरोबर देय होईल, परंतु ही विशेष अंशदानाची रक्कम केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठराविक कालांतरागणिक, अशा मुदतीत आणि अशा रीतीने निगमाकडे भरता येईल आणि उक्त अधिसूचनेमध्ये, असे अंशदान त्वरित भरल्यास वटाव देण्याचीही तरतूद करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील "एकूण वेतन-बिल" याचा अर्थ, केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या कलमाच्या प्रयोजनार्थ, विनिर्दिष्ट करील अशा कालावधींच्या संबंधात एखाद्या कारखान्याच्या वा आस्थापनेच्या कर्मचाऱ्यांना उपार्जित झालेली एकूण मजुरी, असा आहे.

*जेथे कर्मचारी विमा न्यायालय नसेल तेथे, या प्रकरणाच्या कक्षेत येणाऱ्या वादांचा किंवा प्रश्नांचा निर्णय करण्यासाठी विशेष अधिकरणे.*

७३ख. (१) या प्रकरणानुसार प्रदेय असलेल्या वा वसूल करावयाच्या नियोक्त्याच्या विशेष अंशदानाबाबत जर काही प्रश्न वा वाद उपस्थित झाला, आणि अशा प्रश्नाबाबत वादाबाबत संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेले एखादे कर्मचारी विमा न्यायालय तेथे नसेल तर, केंद्र शासन या संदर्भात विनिर्दिष्ट करील असे प्राधिकरण त्या प्रश्नाबाबत वा वादाबाबत निर्णय देईल.

(२) कलम ७६ चे पोटकलम (१), कलमे ७७ ते ७९ आणि ८९ यांचे उपबंध जसे कर्मचारी विमा न्यायालयासमोरील कार्यवाहीला लागू होतात तसे ते, शक्य तेथवर, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणासमोरील कार्यवाहीलाही लागू होतील.

*प्रकरण पाच खालील लाभ कर्मचाऱ्याच्या अंशदानावर अवलंबून असणे.*

७३ग. प्रकरण चारचे सर्व उपबंध ज्या क्षेत्रात अंमलात आहेत अशा कोणत्याही क्षेत्रात त्या प्रकरणाच्या उपबंधानुसार कोणत्याही आठवड्याकरिता कर्मचाऱ्याने भरावयाची अंशदानाची रक्कम ही, प्रकरण पाचच्या प्रयोजनार्थ, त्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्या आठवड्याकरिता प्रकरण चार खाली प्रदेय असणारी अंशदाने जणू काही भरण्यात आलेली असावीत अशारितीने परिणामक होईल, आणि तो कर्मचारी जर प्रकरण पाचमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लाभांना एरव्ही हक्कदार असेल तर, याही बाबतीत तो कर्मचारी विमेदार व्यक्ती म्हणून त्या लाभांना हक्कदार होईल.

**स्पष्टीकरण.**—सूट मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, या प्रकरणाचे उपबंध नसते तर, त्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात त्या आठवड्याकरिता प्रकरण चारनुसार नियोक्त्याचे अंशदान प्रदेय झाले असते अशी निगमाची खात्री झाली तर, त्या कर्मचाऱ्याचे त्या आठवड्याचे अंशदान भरण्यात आले आहे असे मानण्यात येईल.

*नियोक्त्याच्या विशेष अंशदानाची वसुली करण्याची रीत.*

७३घ. या प्रकरणान्वये प्रदेय असलेले नियोक्त्याचे विशेष अंशदान म्हणजे जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे ते वसूल करता येईल.

*जादा माहिती किंवा प्रतिवेदन मागविण्याची शक्ती.*

७३ङ. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या इतर उपबंधांना बाध न येता, निगम, नियोक्त्याचे विशेष अंशदान या प्रकरणानुसार प्रदेय आहे किंवा कसे हे ठरवण्याच्या किंवा त्याची रक्कम ठरवण्याच्या प्रयोजनार्थ, सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून कोणत्याही प्रधान वा निकटतम नियोक्त्याला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती किंवा प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे, अशा नमुन्यात आणि अशा कालावधीत सादर करण्यास फर्मावू शकेल.

*नियोक्त्याच्या विशेष अंशदानाच्या बाबतीत सूट देण्याची शक्ती फक्त केंद्र शासनाने वापरणे.*

७३च. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासन, एखाद्या कारखान्यात किंवा आस्थापनेत किंवा एखाद्या वर्गाच्या कारखान्यांमध्ये किंवा आस्थापनांमध्ये चालवण्यात येणाऱ्या उद्योगाचा व्याप किंवा ठिकाण अथवा स्वरूप विचारात घेऊन त्या कारखान्याला किंवा आस्थापनेला किंवा त्या वर्गातील कारखान्यांना व आस्थापनांना, या प्रकरणानुसार प्रदेय असलेले नियोक्त्याचे विशेष अंशदान भरण्यापासून सूट देऊ शकेल आणि कलमे ८७ ते ९१ (९१ धरून) यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे अशा प्रकारची सूट देण्यास कोणतेही राज्य शासन प्राधिकृत होते असे मानण्यात येणार नाही.

*या अधिनियमाचे विवक्षित उपबंध नियोक्त्याच्या विशेष अंशदानाबाबत लागू करणे.*

७३छ. या प्रकरणात अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, प्रकरण चार, कलम ७२ व प्रकरण सात आणि या अधिनियमाखाली केलेले कोणतेही नियम व विनियम यांचे उपबंध, हे प्रकरण अंमलात नसते तर आणि नियोक्त्याचे अंशदान या अधिनियमाखाली प्रदेय असते तर नियोक्त्याच्या अंशदानाला जसे लागू झाले असते तसे ते नियोक्त्याचे विशेष अंशदान भरणे किंवा वसूल करणे त्यासंबंधात विनिर्दिष्ट केलेल्या शास्ती आणि इतर तदानुषंगिक सर्व बाबी यांना, शक्य तेथवर लागू होतील.

७३ज. [अडचणी दूर करण्याचा अधिकार]—कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४), कलम ३१ द्वारे निरसित (१७ जून १९६७ रोजी व तेव्हापासून).

७३झ. केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, या प्रकरणाचे उपबंध अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस परिणामक राहण्याचे बंद होईल, मात्र ही तारीख, अधिसूचनेच्या तारखेपासून तीन महिन्यांपेक्षा अगोदरची नाही अशी तारीख असेल : **प्रकरण पाच-क याची मुदत.**

परंतु, अशा रीतीने या प्रकरणाचे उपबंध परिणामक असण्याचे बंद झाल्यावर, या प्रकरणाचे उपबंध जणू काही त्यावेळी केंद्रीय अधिनियमाद्वारे निरसित झालेले असावेत अशा तऱ्हेने, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) कलम ६ चे उपबंध लागू होतील.]

## प्रकरण सहा

### तंट्याचा व हक्कमागण्यांचा अभिनिर्णय

७४. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्राकरिता एक कर्मचारी विमा न्यायालय घटित करील. **कर्मचारी विमा न्यायालयाची घटना.**

(२) राज्य शासनास योग्य वाटतील तेवढे न्यायाधीश मिळून हे न्यायालय बनलेले असेल.

(३) जी व्यक्ती न्यायिक अधिकारी आहे किंवा होती अथवा पाच वर्षांचा अनुभव असलेला विधिव्यवसायी आहे ती व्यक्ती कर्मचारी विमा न्यायालयाच्या न्यायाधीश होण्यास अर्ह ठरेल.

(४) राज्य शासन दोन वा अधिक स्थानिक क्षेत्रांसाठी एकच न्यायालय नेमू शकेल किंवा एकाच स्थानिक क्षेत्रासाठी दोन वा अधिक न्यायालये नेमू शकेल.

(५) एकाच स्थानिक क्षेत्राकरिता एकापेक्षा अधिक न्यायालये नेमून देण्यात आली असतील त्या बाबतीत, राज्य शासन, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे त्यांच्यात काम वाटून देऊ शकेल.

७५. (१) जर पुढील बाबींसंबंधी, म्हणजेच,— **कर्मचारी विमा न्यायालयाने ज्या बाबींवर निर्णय द्यावयाचा त्या बाबी.**

(क) एखादी व्यक्ती, या अधिनियमाच्या अर्थानुसार कर्मचारी आहे किंवा नाही अथवा ती कर्मचाऱ्यांचे अंशदान भरण्यास दायी आहे किंवा कसे यासंबंधी, किंवा

(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, कर्मचाऱ्यांच्या मजुरीच्या किंवा सरासरी रोजंदारीच्या दरासंबंधी, किंवा

(ग) प्रधान नियोक्त्याने एखाद्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत भरावयाच्या अंशदानाच्या दरासंबंधी, किंवा

(घ) कोणती व्यक्ती एखाद्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत प्रधान नियोक्ता आहे किंवा होती त्यासंबंधी, किंवा

(ङ) एखाद्या लाभाबाबत आणि तिच्या रकमेबाबत व कालावधीबाबत एखाद्या व्यक्तीच्या अधिकारासंबंधी, किंवा

[1][(ङङ) अवलंबिताच्या लाभार्थ केलेल्या कोणत्याही प्रदानाचे पुनर्विलोकन करून, निगमाने कलम ५५क अन्वये काढलेल्या एखाद्या निदेशासंबंधी, किंवा]

[2]* * * * * *

(छ) प्रधान नियोक्ता व निगम यांच्यामध्ये, किंवा प्रधान नियोक्ता व निकटतम नियोक्ता यांच्यामध्ये किंवा कर्मचारी व प्रधान वा निकटतम नियोक्ता यांच्यामध्ये, या अधिनियमाखाली प्रदेय वा वसुलीयोग्य असलेले एखादे अंशदान वा लाभ किंवा इतर देय रकमा यांविषयीची जी बाब वादग्रस्त असेल अशी अन्य कोणतीही बाब [3][किंवा कर्मचारी विमा न्यायालयाने या अधिनियमान्वये ज्यावर निर्णय देणे आवश्यक असेल किंवा न्यायालयाला ज्यावर निर्णय देता येईल अशी इतर कोणतीही बाब—यासंबंधी]

कोणताही प्रश्न वा वाद उपस्थित झाला तर, अशा प्रश्नाबाबत वा वादाबाबत [4][पोटकलम (२क) च्या उपबंधांच्या अधीनतेने] कर्मचारी विमा न्यायालय या अधिनियमाच्या उपबंधानुसार निर्णय देईल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३२ द्वारे, मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे खंड (च) वगळण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

(२) [1][पोटकलम (२क) च्या उपबंधाच्या अधीनतेने, पुढील मागणीहक्कांबाबत] कर्मचारी विमा न्यायालय निर्णय देईल, म्हणजे :

(क) प्रधान नियोक्त्याकडून अंशदानाची वसुली करण्याचा मागणीहक्क;

(ख) प्रधान नियोक्त्याने एखाद्या निकटतम नियोक्त्याकडून अंशदान वसूल करण्याबाबत केलेला मागणीहक्क ;

[2]* * * * *

(घ) कलम ६८ अन्वये प्रधान नियोक्त्याविरुद्ध केलेला मागणीहक्क ;

(ङ) एखाद्या व्यक्तीस कायद्याने हक्क नसतानाही तिला मिळालेल्या लाभांच्या संबंधात त्यांचे मूल्य वा रक्कम वसूल करण्यासाठी असलेल्या कलम ७० खालील मागणीहक्क ; आणि

(च) या अधिनियमानुसार अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही लाभाच्या वसुलीसाठी केलेला मागणीहक्क.

[3][(२क) कर्मचारी विमा न्यायालयासमोरील एखाद्या कामात जर विकलांगतेचा प्रश्न उदभवला आणि त्याबाबत वैद्यकीय मंडळाचा किंवा वैद्यकीय अपील अधिकरणाचा निर्णय मिळवण्यात आला नसेल आणि कर्मचारी विमा न्यायालयासमोर असलेल्या मागणीहक्काचा किंवा प्रश्नाचा निकाल करण्यासाठी अशा विकलांगतेच्या प्रश्नाचा निर्णय लागणे आवश्यक असेल तर, ते न्यायालय निगमाला या अधिनियमान्वये, त्या प्रश्नाचा निर्णय करवून घेण्याबाबत निदेश देईल, आणि त्यानंतर, आपल्यासमोर मांडलेल्या हक्कमागणीच्या प्रश्नाचा, वैद्यकीय मंडळाच्या किंवा, प्रकरण-परत्वे, वैद्यकीय अपील अधिकरणाच्या निर्णयानुसार निकाल करण्याची कार्यवाही करील मात्र जेथे कलम ५४ क, पोटकलम (२) अनुसार कर्मचारी विमा न्यायालयाकडे अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, कर्मचारी विमा न्यायालय स्वतःच त्याच्यासमोर उपस्थित झालेल्या सर्व बाबींचा निर्णय करील.]

[4][(२ख) कोणतेही अंशदान किंवा अन्य प्रदेयाच्या बाबतीत प्रधान नियोक्ता आणि निगम यांच्या मधील वादातील कोणतीही बाब, प्रधान नियोक्ता, निगमाने दावा केल्यानुसार त्याच्याकडून प्रदेय असलेल्या रकमेच्या पन्नास टक्के रक्कम न्यायालयाकडे जमा केल्याशिवाय कर्मचारी विमा न्यायालयात आणणार नाही :

परंतु, न्यायालय, कारणे लेखी नमूद करून या पोटकलमांखाली जमा करावयाची रक्कम सोडून देऊ शकेल किंवा कमी करू शकेल.]

(३) कोणत्याही दिवाणी न्यायालयाला, उपरोक्त अशा कोणत्याही प्रश्नावर किंवा वादावर निर्णय देण्याची किंवा त्याचा परामर्श घेण्याची अथवा ज्याचा निर्णय या अधिनियमानुसार किंवा त्या अन्वये [5][एखाद्या वैद्यकीय मंडळाने, किंवा वैद्यकीय अपील अधिकरणाने किंवा कर्मचारी विमा न्यायालयाने] करावयाचा आहे अशा कोणत्याही दायित्वाचा अभिनिर्णय करण्याची अधिकारिता असणार नाही.

कार्यवाही दाखल करणे इत्यादी.

७६. (१) या अधिनियमाच्या व त्याखाली राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधांच्या अधीनतेने, कर्मचारी किंवा न्यायालयासमोर, दाखल करावयाची सर्व कार्यवाही जेव्हा प्रस्तुत प्रश्न वा वाद उपस्थित झाला तेव्हा विमेदार व्यक्ती ज्या क्षेत्रात काम करीत असेल त्या स्थानिक क्षेत्राकरिता नेमून दिलेल्या न्यायालयात दाखल करावी लागेल.

(२) जर एखाद्या न्यायालयाची अशी खात्री झाली की, त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या एखाद्या कार्यवाहीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीचा, त्याच राज्यातील एखाद्या अन्य कर्मचारी विमा न्यायालयात अधिक चांगल्या रीतीने परामर्श घेतला जाऊ शकेल तर, ते न्यायालय, राज्य शासनाने या संदर्भात केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, अशी बाब, ती निकालात काढण्यासाठी, अशा अन्य न्यायालयाकडे वर्ग करण्याचा आदेश देऊ शकेल आणि त्या बाबींशीं संबंधित असे कागदपत्र त्या दुसऱ्या न्यायालयाकडे तावडतोब पाठवून देईल.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३२ द्वारे "पुढील हक्कमागण्यांबाबत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे, खंड (ग) वगळण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

४. १९८९ चा अधिनियम २९, कलम २९ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३२ द्वारे, "कर्मचारी विमा न्यायालयाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२८ जानेवारी १९६८ रोजी व तेव्हापासून).

(३) राज्य शासन, आपल्या राज्यातील एखाद्या कर्मचारी विमा न्यायालयापुढे प्रलंबित असलेली कोणतीही बाब, इतर राज्यांतील अशा न्यायालयाकडे त्या राज्य शासनाच्या परवानगीने वर्ग करू शकेल.

(४) पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) अनुसार ज्या न्यायालयाकडे एखादी बाब वर्ग करण्यात आली असेल ते न्यायालय, जणूकाही ती बाब त्याच्याकडे मुळातच दाखल करण्यात आलेली असावी अशा रीतीने त्यावर कार्यवाही सुरू करील.

७७. (१) कर्मचारी विमा न्यायालयासमोरील कार्यवाहीची सुरूवात अर्ज करून त्याद्वारे केली जाईल. कार्यवाहीचा प्रारंभ.

[1][ (१क) असा प्रत्येक अर्ज, वादकारण ज्या दिवशी उद्भवले असेल त्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत करावा लागेल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ :—

(क) विमेदार व्यक्तीने किंवा अवलंबितांच्या लाभाच्या बाबतीत विमेदाराच्या अवलंबित व्यक्तींनी, लाभासंबंधीचा मागणी हक्क निर्माण झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत किंवा कर्मचारी विमा न्यायालय, त्यास वाजवी वाटतील अशा कारणांच्या आधारे आणखी जी मुदत वाढवून देईल अशा मुदतीच्या आत, त्यासंबंधात करण्यात आलेल्या विनियमांनुसार मागणीहक्क दाखल केल्याशिवाय त्या लाभाबाबतचे वादकारण उद्‌भवले, असे मानण्यात येणार नाही.

[2][ (ख) प्रधान नियोक्त्याकडून (व्याज व नुकसानभरपाई सहित) अंशदाने वसूल करण्यासाठी निगमाने केलेल्या मागणीहक्काच्या बाबतीत कार्यवाहीचे कारण ज्या दिनांकास निगमाने पहिल्यावेळी असा मागणी हक्क दाखल केला असेल त्या दिनांकास वादकारण उद्‌भवल्याचे मानण्यात येईल :

परंतु, मागणीहक्क ज्या कालावधीशी संबंधित असेल त्या पाच वर्षांच्या कालावधीनंतर निगमाला मागणी हक्क दाखल करता येणार नाही.

(ग) निगमाने निकटतम नियोक्त्याकडून अंशदाने वसूल करण्यासाठी प्रधान नियोक्त्याने केलेल्या मागणीहक्काच्या संबंधातील वादकारण हे, अंशदाने देण्यात आलेली आहेत याचा पुरावा निगमाकडे ज्या तारखेपर्यंत यावयास हवा त्या तारखेपर्यंत उद्‌भवले आहे, असे मानण्यात येणार नाही.]]

(२) असा प्रत्येक अर्ज, राज्य शासनाने निगमाशी विचारविनिमय करून केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात करावा लागेल, त्यात असा विहित तपशील द्यावा लागेल, आणि काही फी विहित केलेली असल्यास, ती फी त्यासोबत भरावी लागेल.

७८. (१) साक्षीदारांना समन्स पाठवणे व प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास भाग पाडणे, दस्तऐवज व भौतिक वस्तू प्रकट करवून ती सादर करण्यास भाग पाडणे, शपथ देणे व पुराव्याची नोंद करणे या प्रयोजनार्थ, कर्मचारी विमा न्यायालयाला दिवाणी न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील आणि [3][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७३ चा २) याचे कलम १९५ व प्रकरण सव्वीस] यांच्या अर्थानुसार, असे न्यायालय हे दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. कर्मचारी विमा न्यायालयाचे अधिकार.

(२) हे कर्मचारी विमा न्यायालय, राज्य शासनाने केलेल्या नियमांनुसार विहित करण्यात येईल ती कार्यपद्धती अनुसरील.

(३) कर्मचारी विमा न्यायालयासमोरील कोणत्याही कार्यवाही संबंधीचा सर्व आनुषंगिक खर्च, राज्य शासन यासंबंधात करील अशा नियमांच्या अधीनतेने, त्या न्यायालयाच्या विवेकाधीन राहील.

(४) कर्मचारी विमा न्यायालयाचा कोणताही आदेश हा, जणू काही दिवाणी न्यायालयाने एखाद्या दाव्यासंबंधात काढलेला हुकूमनामा असावा अशा रीतीने त्याची अंमलबजावणी करवून घेता येईल.

७९. जेव्हा कर्मचारी विमा न्यायालयाकडे किंवा न्यायालयापुढे एखाद्या व्यक्तीने एखादा अर्ज करणे किंवा स्वत: उपस्थित होणे किंवा एखादी कृती करणे आवश्यक असेल (साक्षीदार म्हणून एखाद्या व्यक्तीची तपासणी करण्यासाठी त्या व्यक्तीची उपस्थिती आवश्यक असेल ती बाब खेरीजकरून) तेव्हा तो अर्ज किंवा ती उपस्थिती किंवा कृती, अशा व्यक्तीने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही विधिव्यवसायीमार्फत किंवा नोंदलेल्या श्रमिक संघाच्या अधिकाऱ्यामार्फत किंवा न्यायालयाच्या परवानगीने, याप्रमाणे प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत करता येईल. विधिव्यवसायी इत्यादींमार्फत उपस्थिती.

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३३ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३० द्वारे, मूळ उपखंडाऐवजी हे उपखंड दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८०. [लाभाचा मागणीहक्क वेळेवर दाखल केला नाही तर असा लाभ अनुज्ञेय होणार नाही.]—कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ४४)—कलम ३४ द्वारे निरसित.

उच्च न्यायालयाकडे निर्णयार्थ निर्देशन. ८१. कर्मचारी विमा न्यायालय, कोणताही कायदेविषयक प्रश्न निर्णयार्थ उच्च न्यायालयाकडे सादर करू शकेल आणि तसे केल्यास ते कर्मचारी विमा न्यायालय त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या त्या प्रश्नाचा निकाल उच्च न्यायालयाच्या निर्णयानुरुप करील.

अपील. ८२. (१) या कलमात स्पष्टपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरुन एरव्ही कर्मचारी विमा न्यायालयाच्या आदेशावर कोणतेही अपील होऊ शकणार नाही.

(२) कर्मचारी विमा न्यायालयाच्या आदेशात जर, सारभूत कायदेविषयक प्रश्न अंतर्भूत असेल तर, त्या आदेशावर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

(३) या कलमानुसार करावयाच्या अपिलाची मुदत साठ दिवसांची असेल.

(४) [१][मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६)] याची कलमे ५ व १२ यांचे उपबंध, या कलमाखालील अपिलांना लागू होतील.

अपील प्रलंबित असेपर्यंत रक्कम देणे स्थगित ठेवणे. ८३. निगमाच्या कर्मचारी विमा न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल केले असेल तर, ते न्यायालय त्या अपिलाचा निकाल लागेपर्यंत ज्या विरुद्ध अपील केले आहे त्या आदेशात जी रक्कम देण्याचा निदेश देण्यात आला असेल ती रक्कम देण्याचे स्थगित ठेवू शकेल किंवा, जर उच्च न्यायालयाने तसा निदेश दिलेला असेल तर, स्थगित ठेवील.

## प्रकरण सात

### शास्ती

खोटे निवेदन केल्याबद्दल शास्ती. ८४. जो कोणी, या अधिनियमानुसार मिळणाऱ्या रकमेत वा लाभात वाढ करण्याच्या प्रयोजनास्तव किंवा जेथे या अधिनियमानुसार किंवा त्याअन्वये कोणतीही रक्कम वा लाभ प्राधिकृत केलेला नसेल तेथे ती रक्कम वा लाभ मिळवण्याच्या प्रयोजनास्तव, किंवा या अधिनियमानुसार त्याने द्यावयाची एखादी रक्कम देण्याचे टाळण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला अशी रक्कम देण्याचे टाळण्यास मदत करण्याच्या प्रयोजनास्तव, जाणीवपूर्वक, कोणतेही खोटे निवेदन वा खोटे अभिवेदन करील अथवा करवील तो, [२][सहा] महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा [३][दोन हजार] रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या द्रव्यदंडास अथवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल :

[४][परंतु, या कलमाखाली विमेदार व्यक्तीचा दोष सिद्ध झाल्यास, केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी, या अधिनियमाखालील कोणत्याही रोख लाभाला ती व्यक्ती पात्र राहणार नाही.]

अंशदाने भरण्यात कसूर करणे, इत्यादीबद्दल शिक्षा. ८५. जर एखाद्या व्यक्तीने,—

(क) या अधिनियमानुसार ती जे अंशदान भरण्यास दायी असेल ते अंशदान भरण्यात कसूर केली तर, किंवा

(ख) कर्मचाऱ्याच्या मजुरीतून नियोक्त्याचे संपूर्ण अंशदान किंवा त्याचा काही भाग कापून घेतला वा घेण्याचा प्रयत्न केला तर, किंवा

(ग) कलम ७२ चे उल्लंघन करून, एखाद्या कर्मचाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या मजुरीमध्ये किंवा कोणत्याही विशेष सवलतीमध्ये किंवा लाभामध्ये कपात केली तर, किंवा

(घ) कलम ७३ चे किंवा एखाद्या विनियमाचे उल्लंघन करून, एखाद्या कर्मचाऱ्यास बडतर्फ, कार्यमुक्त, पदावनत केले किंवा अन्यथा शिक्षा केली तर, किंवा

(ङ) विनियमांनुसार आवश्यक असलेले एखादे प्रतिवेदन सादर करण्यात कसूर केली वा नकार दिला, अथवा खोटे प्रतिवेदन दिले तर, किंवा

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३१ द्वारे "भारतीय मुदत अधिनियम, १९०८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (एक) द्वारे "तीन महिने" या मजकुराऐवजी "सहा महिने" हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (दोन) द्वारे "पाचशे" या मजकुराऐवजी "दोन हजार" हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (तीन) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले, (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(च) निरीक्षकास किंवा निगमाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यास त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी अटकाव केला तर, किंवा

(छ) या अधिनियमानुसार वा नियमांनुसार वा विनियमांनुसार आवश्यक असलेल्या अशा एखाद्या गोष्टीचे उल्लंघन केले किंवा तिचे अनुपालन केले नाही म्हणून ती दोषी असेल व त्याबद्दल कोणत्याही विशेष शास्तीची तरतूद केलेली नसेल तर,

[१][एखादी व्यक्ती,—

(एक) खंड (क) खाली तिने अपराध केल्यास तीन वर्षे असू शकेल, परंतु—

(क) कर्मचाऱ्यांच्या वेतनातून तिने कापून घेतलेले कर्मचाऱ्यांचे अंशदान प्रदान करण्यात तिने कसूर केल्यास, एक वर्षाहून कमी असणार नाही इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि दहा हजार रुपयांच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेलही पात्र ठरेल ;

(ख) अन्य कोणत्याही प्रकरणी, सहा महिन्यांहून कमी असणार नाही इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि पाच हजार रुपयांच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र ठरेल :

परंतु, न्यायालय न्यायनिर्णयात पुरेशी व विशेष कारणे लेखी नमूद करून अल्पमुदतीच्या कारावासाची शिक्षा देऊ शकेल.

(दोन) तिने खंड (ख) ते (छ) (दोन्ही धरून) पैकी कोणत्याही खंडान्वये अपराध केल्यास एक वर्ष असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा चार हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.]

पूर्व दोषसिद्धीनंतर विवक्षित प्रकरणी वाढीव शिक्षा देणे.

[२][८५क. जो कोणी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल न्यायालयाकडून दोषी ठरवण्यात आल्यानंतर पुन्हा तोच अपराध करील तो, नंतरच्या अशा प्रत्येक अपराधाबद्दल [३][दोन वर्षांच्या कारावासास आणि पाच हजार रुपयांच्या द्रव्यदंडास] पात्र होईल :

परंतु, असा नंतरचा अपराध म्हणजे एखाद्या नियोक्त्याने अधिनियमानुसार, तो जे अंशदान भरण्यास दायी आहे असे अंशदान भरण्यास कसूर केल्याबाबतचा अपराध असेल त्याबाबतीत, तो नंतरच्या अशा प्रत्येक अपराधाबद्दल [४][पाच वर्षांपर्यन्त असू शकेल व दोन वर्षांहून कमी नसेल एवढ्या मुदतीच्या कारावासास आणि पंचवीस हजार रुपयांच्या द्रव्यदंडासही पात्र ठरेल.]

नुकसानी वसूल करण्याची शक्ती.

८५ख. (१) जेव्हा एखादा नियोक्ता, या अधिनियमान्वये प्रदेय असलेले एखादे अंशदान किंवा इतर कोणतीही रक्कम भरण्यास कसूर करील तेव्हा, निगम त्या नियोक्त्याकडून निगमास [५][विनियमात विहित करण्यात येईल अशा थकबाकीच्या रकमेतून अधिक नसेल एवढी रक्कम अशी नुकसानी म्हणून शास्तीच्या रुपाने वसूल करू शकेल] :

परंतु, अशी नुकसानी वसूल करण्यापूर्वी नियोक्त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिली जाईल :

[६][परंतु आणखी असे की, निगम आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५, (१९८६ चा १) याच्या कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या औद्योगिक आणि वित्तीय मंडळाने जी आजारी औद्योगिक कंपनी आहे, अशा ज्या आस्थापनेच्या संबंधात पुनर्वसन योजना मंजूर केलेली आहे, त्या आस्थापनेच्या संबंधात, विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीनतेने, या कलमाखाली वसुलीयोग्य असलेले नुकसान कमी करू शकेल किंवा सोडून देऊ शकेल.

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३३ द्वारे मूळ खंड (एक) व (दोन) याऐवजी हे खंड दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९७५ चा अधिनियम ३८, कलम ५ द्वारे कलमे ८५क, ८५ख व ८५ग दाखल करण्यात आली (१ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३४ (एक) द्वारे "एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३४ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३५ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ३५ (दोन) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) खाली [1][किंवा कलम ४५ ग ते कलम ४५ झ अन्वये] वसूल करावयाची कोणतीही नुकसानीची रक्कम ही, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल केली जाईल.

आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.

८५ ग. (१) जेव्हा एखादा नियोक्ता हा, या अधिनियमाखाली प्रदेय असलेले एखादे अंशदान भरण्यास कसूर केल्याच्या अपराधाबद्दल दोषी ठरलेला असेल तेव्हा, न्यायालय शिक्षेच्या जोडीला त्या नियोक्त्यास, ज्या अंशदानाच्या संबंधात अपराध घडलेला असेल, त्या अंशदानाची रक्कम, लेखी आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कालावधीच्या आत भरण्यास [2][आणि अशा अंशदानासंबंधी विवरणपत्र सादर करण्यास] फर्मावू शकेल ही कालमर्यादा न्यायालय, त्यास योग्य वाटल्यास आणि त्यासंबंधी अर्ज आल्यास वेळोवेळी वाढवू शकेल.

(२) जेव्हा पोटकलम (१) अन्वये एखादा आदेश देण्यात आलेला असेल तेव्हा, नियोक्ता न्यायालयाने मंजूर केलेल्या मुदतीत किंवा मुदत वाढवून दिलेली असल्यास, त्या वाढीव मुदतीत अपराध चालू राहण्याबद्दल या अधिनियमान्वये जबाबदार धरला जाणार नाही. पण जर अशी मुदत अथवा प्रकरणपरत्वे, वाढीव मुदत संपल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाचे पूर्णत: अनुपालन केलेले नसेल तर, नियोक्त्याने आणखी एकदा अपराध केला, असे मानण्यात येईल आणि त्याबद्दल कलम ८५ खाली तो कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि अशाप्रकारे मुदत संपल्यानंतर ज्या ज्या दिवशी आदेशाचे अनुपालन करण्यात आलेले नसेल अशा प्रत्येक दिवसामागे [3][एक हजार] रुपयापर्यन्त असू शकेल इतका द्रव्यदंड भरण्यासही तो पात्र ठरेल.]

खटले.

८६. (१) विमा आयुक्त, [4][[5][किंवा निगमाच्या महासंचालकाकडून] त्या संदर्भात प्राधिकृत करण्यात येईल असा निगमाचा अन्य अधिकारी ] याच्याशिवाय किंवा त्याची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय कोणालाही या अधिनियमाखाली कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

[6][(२) या अधिनियमान्वये प्रथम श्रेणी महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असलेल्या न्यायालयास कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.]

(३) एखादा अपराध [7][* * *] त्या अपराधांबाबत लेखी तक्रार करण्यात आल्याशिवाय, कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

[8][कंपन्यांनी केलेले अपराध.

८६क. (१) या अधिनियमाखालील अपराध करणारी कोणतीही व्यक्ती ही, कंपनी असेल तर, अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालवण्याबद्दल कंपनीची प्रभारी म्हणून असलेली आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनीही, अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल :

परंतु, कोणत्याही शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, अपराध त्याच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये यासाठी तिने सर्व बाजवी खबरदारी घेतली होती असे शाबीत केल्यास, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२)पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कोणताही संचालक, किंवा व्यवस्थापक, सचिव किंवा कंपनीचा अन्य अधिकारी, संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे घडला असल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल.

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३५ (ख) अन्वये "किंवा कलम ४५ग ते ४५झ खाली" हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३६ (एक) द्वारे जादा दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३६ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २२ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३५ द्वारे "केंद्र शासनाकडून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

६. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३७ (एक) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ३७(दोन) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

८. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यात एखादी पेढी आणि अन्य व्यक्तींचे अधिसंघ अंतर्भूत आहेत ;

(दोन) (क) पेढी व्यतिरिक्त, एखाद्या कंपनीशी संबंधित संचालक याचा अर्थ, व्यवस्थापकीय संचालक किंवा पूर्णकालिक संचालक, असा आहे ;

(ख) पेढीशी संबंधित संचालक याचा अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे].

## प्रकरण आठ

### संकीर्ण

**कारखान्याला किंवा आस्थापनेला अथवा कारखान्याच्या वा अस्थापनांच्या वर्गाला सूट.**

८७. समुचित शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, व त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, एखाद्या विनिर्दिष्ट क्षेत्रातील एखाद्या कारखान्याला वा आस्थापनेला अथवा तेथील एखाद्या वर्गातील कारखान्यांना वा आस्थापनांना एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत या अधिनियमाच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल आणि वेळोवेळी तशाच प्रकारची अधिसूचना काढून एका वेळी एक वर्षपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरता नव्याने ती सूट देऊ शकेल.

**व्यक्तींना किंवा व्यक्तिवर्गाला सूट.**

८८. समुचित शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणि त्या शासनास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने, हा अधिनियम ज्याला लागू होतो अशा एखाद्या कारखान्यात वा आस्थापनेत अथवा अशा वर्गातील कारखान्यांमध्ये वा आस्थापनांमध्ये कामाला असलेल्या एखाद्या व्यक्तीला अथवा व्यक्तीवर्गाला, या अधिनियमाच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.

**निगमाने अभिवेदन करणे.**

८९. कलम ८७ किंवा कलम ८८ द्वारे सूट देण्याच्या अथवा सूट नवीकृत करण्याच्या प्रस्तावाबाबत निगम काही अभिवेदन करू इच्छित असल्यास त्यास तसे करण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय आणि असे अभिवेदन समुचित शासनाने विचारात घेतल्याशिवाय, अशी कोणतीही सूट दिली जाणार नाही वा नवीकृत केली जाणार नाही.

**शासनाच्या मालकीच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या कारखान्यांना किंवा आस्थापनांना सूट.**

९०. जर [1][ * * * * ] एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या एखाद्या कारखान्यातील किंवा आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना, या अधिनियमानुसार मिळणाऱ्या लाभांशी सारतः सदृश असणाऱ्या अथवा त्याहून अधिक चांगल्या दर्जाचे लाभ एरव्ही मिळत असतील तर, समुचित शासन [2][निगमाशी विचारविनिमय करून नंतर] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, त्या कारखान्याला वा आस्थापनेला, [2][या अधिनियमाच्या प्रवर्तनापासून] सूट देऊ शकेल.

**अधिनियमाच्या एका वा अनेक उपबंधांपासून सूट.**

९१. समुचित शासन, निगमाच्या संमतीने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एखाद्या कारखान्यातील वा आस्थापनेतील अथवा एखाद्या वर्गाच्या कारखान्यातील वा आस्थापनांतील कोणत्याही कर्मचाऱ्यांना वा कर्मचारी वर्गाला, या अधिनियमाद्वारे उपलब्ध होणाऱ्या लाभाच्या संबंधातील एका व अनेक उपबंधापासून सूट देऊ शकेल.

**सूट भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी असणे.**

[3][**९१क.** कलम ८७, कलम ८८, कलम ९० किंवा कलम ९१ याअन्वये सूट देणारी कोणतीही अधिसूचना, तीस विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस एकतर भविष्यलक्षी प्रभावाने किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येईल अशा रीतीने काढण्यात येईल.]

**लाभांचा गैरवापर.**

[4][**९१ख.** या अधिनियमाखालील लाभांचा कारखान्यातील किंवा आस्थापनेतील विमेदार व्यक्तींकडून गैरवापर होत आहे याबद्दल केंद्र शासनाची खात्री पटल्यास, ते शासन शासकीय राजपत्रात आदेश प्रकाशित करून, अशा व्यक्तीला त्या शासनाला योग्य वाटेल त्यानुसार अशा लाभापासून वंचित करू शकेल :

परंतु, संबंधित कारखाना किंवा आस्थापना, विमेदार व्यक्ती आणि श्रमिक संघ अधिनियम, १९२६ खालील नोंदणी केलेल्या कारखान्यात किंवा आस्थापनेत सदस्य असणाऱ्या श्रमिक संघटना यांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, असा कोणताही आदेश देता येणार नाही.

**नुकसान निर्लेखित करणे.**

**९१ग.** केंद्र शासनाकडून विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, नियमाला प्रदेय असलेले अंशदान, व्याज आणि नुकसान यांची रक्कम वसूल करता येण्यासारखी नाही असे निगमाचे मत असल्यास, निगम उक्त रक्कम शेवटी निर्लेखित करण्यास मंजुरी देऊ शकेल.]

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ३९ द्वारे "शासनाच्या वा" हा मजकूर वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

४. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४० द्वारे ही कलमे समाविष्ट करण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.

९२. [1][(१)] केन्द्र शासन, राज्य शासनाला, त्या राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणीस करण्याबाबत निदेश देऊ शकेल.

[1][(२) केन्द्र शासन, अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे निगमाला वेळोवेळी निदेश देईल आणि असा कोणताही निदेश देण्यात आल्यास, निगम अशा निदेशांचे अनुपालन करील.]

निगमाचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

९३. निगमाचे सर्व अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या (१८६० चा ४५) अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

आस्थापनेचे हस्तांतरण झाल्यास त्या बाबतीतील दायित्व.

[2][९३क. जेव्हा एखाद्या कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधातील एखादा नियोक्ता, तो कारखाना किंवा आस्थापना, विक्रीद्वारे, देणगीद्वारे भाडेपट्टयाने किंवा लायसनाद्वारे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे संपूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरित करील तेव्हा, तो नियोक्ता आणि जिच्याकडे तो कारखाना वा आस्थापना अशा रीतीने हस्तांतरित करण्यात आलेली असेल ती व्यक्ती हे दोघेही, अशा हस्तांतरणाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीकरिता जे अंशदान वा जी कोणतीही अन्य रक्कम या अधिनियमान्वये देय असेल ती भरण्यास, संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार राहतील :

परंतु, हस्तांतरितीचे दायित्व हे, त्याला अशा हस्तांतरणाद्वारे प्राप्त झालेल्या मत्तेच्या मूल्यापुरते मर्यादित असेल.]

निगमाला देय असलेली अंशदाने, इत्यादींना इतर ऋणांपेक्षा अग्रक्रम देणे.

९४. जी ऋणे इलाखा शहर दिवाळखोरी अधिनियम, १९०९ (१९०९ चा ३) याच्या कलम ४९ अन्वये किंवा प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम, १९२० (१९२० चा ५) याच्या कलम ६१ अन्वये [3][किंवा [4][दिनांक १ नोव्हेंबर १९५६ च्या निकटपूर्वी जी राज्यक्षेत्रे एखादा भाग "ख" राज्यात समाविष्ट होतील अशा राज्यक्षेत्रात] दिवाळखोरीसंबंधी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये] [5][किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ५३० अन्वये] दिवाळखोरीच्या संपत्तीचे वितरण करतेवेळी किंवा परिसमापित करण्यात येणाऱ्या एखाद्या कंपनीच्या मत्तेचे वितरण करतेवेळी, अन्य सर्व ऋणांच्या अगोदर चुकती करणे क्रमप्राप्त असते त्या रकमेबद्दलचे दायित्व दिवाळखोरी संबंधीच्या अभिनिर्णयादेशाच्या तारखेपूर्वी किंवा, प्रकरणपरत्वे, परि-समापनाच्या तारखेपूर्वी उपार्जित झालेले असेल अशा कोणत्याही अंशदानासंबंधात देय असलेली रक्कम किंवा या अधिनियमाखाली प्रदेय असलेली अन्य कोणतीही रक्कम समाविष्ट आहे, असे मानण्यात येईल.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

[6][९४क. निगम आणि निगमाने या बाबतीत केलेल्या विनियमांच्या अधीनतेने, स्थायी समिती असा निदेश देऊ शकेल की, निगम किंवा प्रकरणपरत्वे, स्थायी समिती वापरू शकेल असे सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती आणि बजावू शकेल अशी सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कर्तव्ये, विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा बाबतीत आणि अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने, निगमाला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला देखील बजावता येतील.]

नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

९५. (१) केंद्र शासन, [7][निगमाशी विचारविनिमय करून आणि] पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम करू शकेल.

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४१ द्वारे मूळ कलम ९२ यास "९२(१)" हा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोटकलम (२) समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९७५ चा अधिनियम ३८, कलम ६ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

३. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश (क्रमांक ३) १९५६, द्वारे "भाग ख राज्यात" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

७. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :—

[1][(क) एखाद्या व्यक्तीला, ज्या मर्यादेपलिकडे कर्मचारी असल्याचे मानण्यात येणार नाही ती वेतन मर्यादा;

(क ख) कलम १७ च्या पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ कमाल मासिक वेतनाची मर्यादा; ]

[1][(क ग)] निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद यांच्या सदस्यांची [2][नियुक्ती] व निवडणुका कशा पद्धतीने करण्यात येतील ते ;

(ख) निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद यांच्या सभांसाठी लागणारी गणसंख्या आणि या संस्थांच्या वर्षभरात आयोजित करावयाच्या सभांची किमान संख्या;

(ग) निगम, स्थायी समिती व वैद्यकीय लाभ परिषद यांनी कामकाजाबाबत ठेवावयाचे अभिलेख ;

(घ) [3][महासंचालक व वित्त आयुक्तांच्या] शक्ती व कर्तव्ये आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती;

(ड.) वैद्यकीय लाभ परिषदेच्या शक्ती व कर्तव्ये;

[4][(ड.क) ज्या खर्चांना प्रशासकीय खर्च म्हणता येईल त्या खर्चाचे प्रकार, अशा खर्चासाठी निगमाची जी प्राप्ती खर्ची पडेल त्या प्राप्तीची टक्केवारी;

(ड.ख) अंशदानाचे दर आणि कर्मचारी ज्या वेतनापेक्षा कमी वेतन असल्यामुळे अंशदान देण्यास पात्र ठरणार नाही ती वेतन मर्यादा ;

(ड.ग) सरासरी दैनिक वेतनाच्या गणनेची पद्धती;

(ड.घ) वसुली अधिकाऱ्याने रक्कम वसूल करण्यासाठी प्रमाणपत्र प्रमाणित करण्याची पद्धती;

(ड.ड.) अंत्यसंस्कारावरील खर्चाची रक्कम ;

(ड.च) आजारपणाचे लाभ, प्रसूतिविषयक लाभ, विकलांगताविषयक लाभ आणि अवलंबितांना द्यावयाचे लाभ यांच्या अर्हता, अटी, दर व कालावधी ;

(ड.छ) जी विमेदार व्यक्ती, कायम विकलांगतेमुळे विमा सेवेत असण्याचे बंद झाले असेल त्या विमेदार व्यक्तीस वैद्यकीय लाभ देण्यासंबंधीच्या शर्ती;

(ड.ज) ज्या व्यक्तींचा नियत सेवावधी पूर्ण झाला आहे त्या व्यक्तींना वैद्यकीय लाभ देण्यासंबंधीच्या शर्ती ; ]

[5][[6][ड.झ] वैद्यकीय अपील अधिकरणाकडे किंवा कर्मचारी विमा न्यायालयांकडे कशा पद्धतीने व किती मुदतीत अपिले दाखल करता येतील ते ;]

(च) संविदांची अंमलबजावणी करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(छ) निगमाने संपत्ती संपादन करणे, धारण करणे आणि तिची विल्हेवाट करणे ;

(ज) कर्जे उभारणे व त्यांची परतफेड करणे ;

(झ) निगमाच्या पैशाची आणि एखाद्या भविष्य निधीची किंवा अन्य लाभ निधीची गुंतवणूक आणि त्यांचे हस्तांतरण किंवा रोख वसुली ;

(ञ) निगमाच्या मत्तांचे व दायित्वांचे नियतकालिक मूल्यांकन कोणत्या आधारे करावयाचे ते ;

(ट) निगमाचा पैसा कोणत्या बँकेत वा बँकांत ठेव म्हणून ठेवावयाचा आणि निगमाला उपार्जित होणारा वा त्याला देय असणारा पैसा जमा करण्याबाबत कोणती कार्यपद्धती अनुसरावयाची आणि निगमाच्या पैशातून एखादी रक्कम कशा रीतीने चुकती करावयाची आणि अशी रक्कम चुकती करण्यास कोणत्या अधिकाऱ्यांना प्राधिकृत करावयाचे ;

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४३ (एक) द्वारे, मूळ खंड (क) पूर्वी 'खंड (क) आणि खंड (क ख)' हे दोन खंड नव्याने समाविष्ट करण्यात आले आणि मूळ खंड '(क)' याला '(कग)' असा नवीन क्रमांक देण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४३ (दोन) अन्वये "नामनिर्देशन" या शब्दाऐवजी "नियुक्ती" हा शब्द दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४३ (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी "महासंचालक व वित्त आयुक्त" हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या, कलम ४३ (चार) द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३८ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

६. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४३ (चार) द्वारे मूळ खंड (ड.ड.) यास (ड.झ) असा नवीन क्रमांक देण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

(ठ) निगमाने कोणते हिशेब ठेवावयाचे आणि असे हिशेब कोणत्या नमुन्यात ठेवावयाचे आणि कोणकोणत्या वेळी हिशेबांची लेखापरीक्षा करावयाची ती वेळ ;

(ड) निगमाच्या हिशेबांचे आणि लेखा परीक्षकांच्या अहवालांचे प्रकाशन, लेखा परीक्षा अहवालावर करावयाची कारवाई, खर्चाच्या रकमा नामंजूर करण्याची व अधिभारित करण्याची लेखा परीक्षकांची शक्ती आणि अशाप्रकारे नामंजूर व अधिभारित केलेल्या रकमा वसूल करणे ;

(ढ) अर्थसंकल्प व पुरवणी अंदाजपत्रक तयार करणे आणि या अंदाजपत्रकांना कशा पद्धतीने मंजुरी द्यावयाची व ते प्रकाशित करावयाचे ती पद्धत ;

(ण) निगमाच्या अधिकाऱ्यांकरिता व सेवकांकरिता भविष्य निधी व इतर लाभनिधी स्थापन करणे व राखणे ;

[1][ * * * * ]

[2][(णक) विमेदार व्यक्तीची दोषसिद्धी झाल्यास तो रोख रकमेच्या लाभास हक्कदार नसण्याचा कालावधी ;]

(त) या अधिनियमानुसार केंद्र शासनाने जी बाब विहित करणे आवश्यक किंवा अनुज्ञेय असेल अशी अन्य कोणतीही बाब ;

[3][(२क) या कलमाद्वारे प्रदान केलेल्या नियम करण्याच्या शक्तीत, नियमांना किंवा त्यापैकी कोणत्याही नियमास या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीचा नसेल अशा दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभाव देण्याच्या शक्तीचा अंतर्भाव असेल—मात्र कोणत्याही नियमाला अशाप्रकारे पूर्वलक्षी प्रभाव देता येणार नाही की, जेणेकरून तो लागू असेल अशा निगमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधावर बाधक परिणाम होईल.]

(३) या कलमानुसार केलेले नियम **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केले जातील आणि त्यानंतर ते जणुकाही या अधिनियमानुसार करण्यात आलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक होतील.

[4][(४) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या [5][अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी] जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शुन्यीकरणामुळे तत्पूर्वी, त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

**नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.** ९६. (१) राज्य शासन, [6][निगमाशी विचारविनिमय करून] आणि पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात, या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम करू शकेल, त्या बाबी अशा :—

(क) कर्मचारी विमा न्यायालयांची घटना, त्यांत न्यायाधीश म्हणून नेमावयाच्या व्यक्तींच्या अर्हता, आणि अशा न्यायाधीशांच्या सेवेच्या शर्ती ;

(ख) अशा न्यायालयापुढील कार्यवाहीमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशा न्यायालयांच्या आदेशांची अंमलबजावणी ;

(ग) कर्मचारी विमा न्यायालयाकडे करावयाच्या अर्जासंबंधी द्यावयाची फी, अशा न्यायालयातील कार्यवाहीचा आनुषंगिक खर्च, न्यायालयाकडे करावयाच्या अर्जाचा नमुना आणि अशा अर्जात विनिर्दिष्ट करावयाचा तपशील ;

---

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४३ (पाच) द्वारे हा शब्द वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४३ (सहा) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९८४ चा अधिनियम ४५, कलम १० अन्वये हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

४. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३८ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

५. १९७५ चा अधिनियम ३८, कलम ७ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

६. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ३९ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

(घ) रुग्णालये, दवाखाने व इतर संस्था यांची स्थापना, विमेदार व्यक्तींना किंवा त्यांच्या कुटुंबांना अशी रुग्णालये, दवाखाने वा इतर संस्था यांच्याकडे नेमून देणे ;

(ङ) कोणत्याही रुग्णालयात, चिकित्सालयात, दवाखान्यात किंवा संस्थात मिळणाऱ्या वैद्यकीय लाभांची प्रमाणश्रेणी, वैद्यकीय अभिलेख ठेवणे आणि आकडेवार प्रतिवेदने सादर करणे;

(च) अशा रुग्णालयात, दवाखान्यात व संस्थांमध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या कर्मचारीवर्गाचे, साधनसामग्रीचे व औषधांचे स्वरूप व प्रमाण;

(छ) अशा रुग्णालयात, दवाखान्यात व संस्थांत कामाला असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती ; आणि

(ज) या अधिनियमानुसार राज्य शासनाने जी बाब विहित करणे आवश्यक किंवा अनुज्ञेय असेल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) या कलमानुसार केलेले नियम, शासकीय राजपत्रात प्रकाशित केले जातील व त्यानंतर, ते जणू काही या अधिनियमात अंतर्भूत केलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक होतील.

[1][(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर जेथे विधानमंडळ दोन सभागृहांचे बनलेले असेल तेथे प्रत्येक सभागृहासमोर व विधानमंडळ एकाच सभागृहाचे बनलेले असेल त्या सभागृहासमोर ठेवण्यात येईल.]

९७. (१) निगमाचा कारभार चालवण्याकरता व या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता पूर्व प्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने, या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम निगम [2][ * * * ] करू शकेल. **विनियम करण्याची निगमाची शक्ती.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींविषयी उपबंध करता येईल, त्या बाबी अशा :—

(एक) निगम, स्थायी समिती आणि वैद्यकीय लाभ परिषद यांच्या सभांची वेळ व ठिकाण आणि अशा सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती ;

[3][(एक-क) कारखान्याची किंवा आस्थापनेची नोंदणी किती मुदतीत व कशा पद्धतीने करावी लागेल.]

(दोन) स्थायी समितीने निगमाकडे निर्णयार्थ निदेशित करावयाच्या बाबी ;

(तीन) या अधिनियमानुसार प्रदेय असलेल्या अंशदानाची आकारणी व वसुली कशा पद्धतीने करण्यात येईल ;

[4][(तीन-क) उशीरा भरण्यात येणाऱ्या अंशदानावरील व्याजाचा दर बारा टक्क्यांहून अधिक असेल.]

(चार) या अधिनियमानुसार प्रदेय असलेले अंशदान निश्चित करण्यासाठी मजुरीचा हिशेब करणे;

[5][(चार-क) निकटतम नियोक्त्याने ठेवावयाची कर्मचाऱ्यांची नोंदवही ;

(चार-ख) आजारपण विषयक लाभ किंवा ज्या कोणत्याही दिवशी एखादी व्यक्ती काम करीत असेल किंवा रजेवर किंवा सुट्टीवर असेल आणि त्या दिवसांचे तिला वेतन मिळत असेल किंवा ज्या कोणत्याही दिवशी ती संपावर असेल, अशा दिवशी आलेल्या तात्पुरत्या विकलांगतेसाठी मिळणारे विकलांगता विषयक लाभ; ]

(पाच) रोखीने द्यावयाच्या कोणत्याही लाभाकरिता आजारपणाचे व पात्रतेचे प्रमाणपत्र देणे;

[6][(सहा) विमेदार व्यक्तीला, तिसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या रोगांपैकी एक वा अनेक रोग झाले आहेत काय हे ठरविण्याची पद्धती ; ]

---

१. १९८४ चा अधिनियम ४५, कलम ११ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

२. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४४ (एक) अन्वये १९८४ चा अधिनियम ४५, कलम १२ (क) द्वारे समाविष्ट केलेला "केन्द्र शासनाच्या पूर्वमान्यतेने" हा मजकूर वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४० द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

४. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४४ (दोन) (क) द्वारे मूळ खंड (तीन) (क) ऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ४४ (दोन) (ख) द्वारे खंड (चार-क) व (चार-ख) समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

६. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४० द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

(शा.म.मुं.) एच ४३११—७ (१०४०—२–२०००)

(सात) रोख रकमी स्वरूपाच्या नसलेल्या कोणत्याही लाभाचे पैशाच्या रुपातील मूल्य निर्धारित करणे ;

(आठ) एखाद्या लाभासाठी किती मुदतीत [1][आणि कोणत्या नमुन्यात व कशा रीतीने] हक्कमागणी करता येईल व अशा हक्क मागणीत कोणता तपशील नमूद करावयाचा ;

(नऊ) विकलांगता विषयक लाभ मिळत असणाऱ्या कर्मचाऱ्याला कोणत्या परिस्थितीत बडतर्फ, कार्यमुक्त, पदावनत करता येईल किंवा अन्य प्रकारे शिक्षा करता येईल ते ;

(दहा) कोणताही लाभ कशा रीतीने ,कोणत्या ठिकाणी, कोणत्या वेळी देण्यात येईल ;

(अकरा) रोख रकमेच्या स्वरूपातील देय लाभाच्या रकमेची परिगणना करण्याची पद्धती आणि, विकलांगता विषयक लाभ व अवलंबिताचे लाभ कोणत्या परिस्थितीत व किती प्रमाणात परिवर्तित करण्यास परवानगी दिली जाईल ते, आणि परिवर्तन मूल्य परिगणित करण्याची पद्धती ;

(बारा) गरोदरपणाबाबतची किंवा प्रसवावस्थेबाबतची नोटीस आणि आजारपणाबाबतची नोटीस व पुरावा ;

[2][ (बारा-क्) प्रसूतिलाभास पात्र असल्याचे प्रमाणपत्र देण्यास सक्षम असणारे प्राधिकरण विनिर्दिष्ट करणे ;

(बारा-ख्) विमेदार स्त्री किंवा तिचे मूल मरण पावल्यास त्या परिस्थितीत प्रसूतिलाभ कोणास द्यावे यासंबंधी त्या स्त्रीने नामनिर्देशन करण्याची पद्धती;

(बारा-ग्) प्रसूतिविषयक लाभाची व जादा प्रसूतिविषयक लाभाची हक्कमागणी करताना तिच्या पुष्ठचर्थ पुरावा सादर करणे ; ]

(तेरा) कोणकोणत्या परिस्थितीत एखादा लाभ निलंबित ठेवण्यात येईल ;

(चौदा) एखाद्या व्यक्तीस, जेव्हा कोणताही लाभ मिळत असेल तेव्हा तिने पाळावयाच्या शर्ती आणि अशा व्यक्तींची नियतकालिक वैद्यकीय तपासणी ;

[3] * * * * *

(सोळा) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, वैद्यक व्यवसायींची नियुक्ती, अशा व्यवसायींची कर्तव्ये आणि वैद्यकीय प्रमाणपत्रांचा नमुना ;

[4][ (सोळा-क्) आजारपणाचे प्रमाणपत्र देण्याकरिता एखाद्या व्यक्तीकडे कोणत्या अर्हता व अनुभव असणे आवश्यक आहे;

(सोळा-ख्) वैद्यकीय मंडळाची व वैद्यकीय अपील अधिकरणांची घटना ; ]

(सतरा) विनियमांचे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा म्हणून कर्मचाऱ्यांना (पहिल्या वेळी उल्लंघन केल्याबद्दल दोन दिवसांच्या मजुरीहून अधिक नसेल एवढा आणि त्यानंतर प्रत्येक वेळी तीन दिवसांच्या मजुरीहून अधिक नसेल एवढा) द्रव्यदंड आकारणे ;

[5][ (सतरा-क्) शास्ती म्हणून वसूल करावयाची नुकसानीची रक्कम;

(सतरा-ख्) औद्योगिक कंपनीच्या संबंधातील नुकसानीची रक्कम कमी करणे किंवा ती सोडून देण्यासाठी अटी व शर्ती; ]

(अठरा) कोणत्या परिस्थितीत व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने एखादा विनियम शिथिल करता येईल ती परिस्थिती व शर्ती, शिथिलीकरणाची मर्यादा, आणि असे शिथिलीकरण मंजूर करू शकेल असे प्राधिकरण;

---

१. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४० द्वारे " आणि कोणत्या नमुन्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे मूळ खंड (बारा-क्) ऐवजी खंड (बारा-क्) (बारा-ख्) व (बारा-ग्) दाखल करण्यात आले (२८ जानेवारी, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४४(ग्) द्वारे खंड (पंधरा) वगळण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९६६ चा अधिनियम ४४, कलम २५ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

५. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४४ (घ्) द्वारे खंड (सतरा-क्) व (सतरा-ख्) समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

[1][ (एकोणीस) प्रधान व निकटतम नियोक्त्याने सादर करावयाची प्रतिवेदने आणि ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख, अशा प्रतिवेदनांचे नोंदवह्यांचे किंवा अभिलेखांचे नमुने व अशी प्रतिवेदने कोणकोणत्या वेळी सादर करावी आणि या प्रतिवेदनांत, नोंदवह्यात व अभिलेखात कोणता तपशील नमूद करावा; ]

(वीस) निरीक्षकांची व अन्य अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व शक्ती;

[2][ (एकवीस) निगमाच्या [3][महासंचालक व वित्त आयुक्त] यांव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या सेवाभरतीची पद्धती, त्यांचे वेतन व भत्ते, शिस्त, वयोनिवृत्ती लाभ आणि इतर सेवा शर्ती;

(बावीस) निगमाकडे अंशदाने पाठवण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती ; आणि

(तेवीस) या अधिनियमानुसार ज्या बाबतीत विनियम करावयाची आवश्यकता वा मुभा असेल अशी इतर कोणतीही बाब.]

[4][ (२-क) पोट-कलम (२) च्या खंड (एकवीस) मध्ये नमूद केलेल्या स्वरूपाच्या कोणत्याही विनियमांना पूर्व-प्रकाशनांची शर्त लागू होणार नाही.]

(३) निगमाने केलेले विनियम भारताच्या राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील आणि त्यानंतर ते जणू काही या अधिनियमाद्वारे केलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक होतील.

[5][ (४) प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, केंद्र शासनाला सादर करण्यात येईल आणि ते शासन त्याची एक प्रत संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर सत्रासीन असतांना, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवण्याची तजवीज करील आणि पूर्वोक्त सत्रांच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या विनियमात कोणताही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो विनियम अशा बदललेल्या स्वरुपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेला बाध येणार नाही.]

९८. [भाग "ख" राज्यांमध्ये निगमास कामे हाती घेता येतील.] कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ५३), कलम २६ द्वारे निरसित.

[6][९९. निगम, त्याचा निधी तशा स्थितीत असेल तेव्हा, विमेदार व्यक्तींच्या कुटुंबाकरिता वैद्यकीय शुश्रूषेच्या खर्चासाठी तरतूद किंवा सहाय्य करू शकेल.] विमेदार व्यक्तींच्या कुटुंबासाठी वैद्यकीय शुश्रूषा.

[7][९९क. (१) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना जर, काही अडचण उद्भवली तर केंद्र शासन, शासकीय राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून त्याद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल वा उचित वाटेल अशा तऱ्हेचे व या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे उपबंध करू शकेल किंवा निदेश देऊ शकेल. अडचणी दूर करण्याची शक्ती.

(२) या कलमान्वये केलेला कोणताही आदेश हा, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात किंवा विनियमात त्याच्याशी विसंगत असे काहीही असले तरी, परिणामक होईल.]

---

१. १९८९ चा अधिनियम २९ कलम २५ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २५ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

३. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४४ (ड.) द्वारे "प्रधान अधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २५ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

५. १९८४ चा अधिनियम ४५, कलम १२(ख) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४५ द्वारे मूळ कलम ९९ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. १९६६ चा अधिनियम ४४, कलम ४१ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१७ जून, १९६७ रोजी व तेव्हापासून).

निरसने व व्यावृत्ती. [1][१००. [2][१ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग "ख" राज्यात समाविष्ट होती त्यांच्या कोणत्याही भागात] हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी या अधिनियमाशी समनुरूप असा एखादा कायदा [3][त्या भागात] अंमलात असेल तर, तो कायदा अशा दिनांकी निरसित ठरेल :

परंतु, अशा निरसनामुळे—

(क) अशा कायद्याच्या पूर्वप्रवर्तनाला, किंवा

(ख) अशा कायद्याविरुद्ध करण्यात आलेल्या एखाद्या अपराधाच्या शास्तीसंबंधातील कोणत्याही शास्तीला, जप्तीला, किंवा

(ग) अशा शास्तीला, जप्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधातील कोणत्याही अन्वेषणाला किंवा त्याविरूद्ध केलेल्या उपाययोजनेला,

बाध येणार नाही ;

आणि जणू काही हा अधिनियम संमत झालेला नसावा त्याप्रमाणे असे अन्वेषण, न्यायिक कार्यवाही किंवा उपाययोजना सुरू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा लादता येईल :

परंतु, आणखी असे की पूर्ववर्ती परंतुकाच्या अधीनतेने, अशा कोणत्याही कायद्यान्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधांनुसार केली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमानुसार केलेल्या अन्य कोणत्याही गोष्टीमुळे वा कारवाईमुळे निष्प्रभावी होईपर्यंत ती त्या उपबंधानुसार अंमलात असणे चालू राहील.]

[4][ * * * * * ]

## दुसरी अनुसूची

(कलम २ (१५ क) व (१५ ख) पहा)

| अनुक्रमांक (१) | इजेचे वर्णन (२) | अर्थार्जनक्षमतेच्या हानीची टक्केवारी (३) |
|---|---|---|
| | **भाग एक** | |
| | ज्यामुळे कायमची संपूर्ण विकलांगता प्राप्त झाली असे मानले जाईल अशा इजांची यादी— | |
| १ | दोन्ही हात गमावणे किंवा बऱ्याच वरपासून कापावे लागणे. | १०० |
| २ | एक हात व एक पाय गमावणे. | १०० |
| ३ | तंगडीपासून किंवा मांडीपासून दोन्ही पाय कापावे लागणे अथवा एक पाय तंगडीपासून किंवा मांडीपासून कापावा लागणे व दुसऱ्या पायाचे पाऊल गमावणे. | १०० |
| ४ | ज्याकरता दृष्टि अत्यावश्यक आहे असे कोणतेही काम करण्यास असमर्थ ठरेल इतपत दृष्टि गमावणे. | १०० |
| ५ | चेहरा अत्यंत भयानकरीत्या विद्रुप होणे. | १०० |
| ६ | संपूर्ण बधिरता येणे. | १०० |
| | **भाग दोन** | |
| | ज्यामुळे कायमची आंशिक विकलांगता प्राप्त झाली असे मानले जाईल अशा इजांची यादी— | |
| | अवयव उच्छेदन-वरपासून (दोहोंपैकी एक) हात. | |
| ७ | खांद्याच्या सांध्यापासून कापावा लागणे | ९० |
| ८ | असंकूटाच्या टोकापासून २०.३२ सें. मी. पेक्षा कमी खुंट शिल्लक राहील अशाप्रकारे खांद्याखाली कापावा लागणे | ८० |

१. १९५१ चा अधिनियम ५३, कलम २७ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६ द्वारे "भाग ख राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अनुकूलन आदेशाद्वारे, "त्या राज्यात" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४६ द्वारे "अनुसूची पहिली" वगळण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ९ | असंकुटाच्या टोकापासून २०.३२ से. मी. च्या पलिकडे ते कोपरहाडाच्या टोकाखाली ११.४३ सें. मी. पेक्षा कमी इतका कापावा लागणे. | ७० |
| १० | एक पंजा किंवा एका पंजाचा अंगठा व चार बोटे गमावणे अथवा कोपरहाडाच्या टोकाखालील ११.४३ सें.मी. च्या पलिकडे कापावा लागणे. | ६० |
| ११ | अंगठा गमावणे. .. .. .. .. | ३० |
| १२ | अंगठा व त्याचे चवडयाचे हात गमावणे. .. .. .. | ४० |
| १३ | एका पंजाची चार बोटे गमावणे. .. .. .. | ५० |
| १४ | एका पंजाची तीन बोटे गमावणे. .. .. .. | ३० |
| १५ | एका पंजाची दोन बोटे गमावणे. .. .. .. | २० |
| १६ | अंगठयाचे शेवटच्या पेराचे हाड गमावणे. .. .. .. | २० |
| [1][१६ क | हाड न गमावता अंगठयाचे टोक छाटावे लागणे] .. .. | १० |
| | अवयव उच्छेदन–कमरेखालचे पाय | |
| १७ | फक्त टाचा उरतील इतपत दोन्ही पावले कापावी लागणे. .. .. | ९० |
| १८ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्याच्या अलिकडे दोन्ही पावले कापावी लागणे. | ८० |
| १९ | चवडा व बोटांची पेरे यामधील सांध्यामधून दोन्ही पावलांची सर्व बोटे कापावी लागणे. | ४० |
| २० | बोटांच्या पेरांमधील पहिल्या सांध्याच्या अलिकडे दोन्ही पावलांची सर्व बोटे कापावी लागणे. | ३० |
| २१ | बोटांच्या पेरांमधील पहिल्या सांध्याच्या पलिकडे दोन्ही पावलांची सर्व बोटे कापावी लागणे. | २० |
| २२ | नितंबातून कापावे लागणे. .. .. .. .. | ९० |
| २३ | महा उर्विकाकूटाच्या टोकापासून मोजल्यानंतर जास्तीत जास्त १२.७० सें. मी. इतपत खुंट उरेल अशाप्रकारे नितंबाखाली कापावे लागणे. | ८० |
| २४ | महा उर्विकाकूटाच्या टोकापासून मोजल्यानंतर १२.७० सें. मी. पेक्षा अधिक पण मांडीच्या मध्यापलिकडे नाही इतपत खुंट उरेल अशाप्रकारे नितंबाखाली कापावे लागणे. | ७० |
| २५ | मांडीच्या मध्यापासून गुडघ्याखाली ८.८९ सें.मी. पर्यंत कापावे लागणे. .. | ६० |
| २६ | गुडघ्याखाली ८.८९ सें.मी. पेक्षा अधिक पण १२.७० सें.मी. पेक्षा अधिक नाही इतपत खुंट उरेल अशा प्रकारे कापावे लागणे. | ५० |
| २७ | गुडघ्याखाली १२.७० सें. मी. पेक्षा अधिक खुंट. .. .. | [2][५०] |
| २८ | टाच उरेल इतपत एक पाऊल कापावे लागणे. .. .. | [3][५०] |
| २९ | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्याच्या अलिकडे एका पावलातून कापावे लागणे. | [4][५०] |
| ३० | चवडा व बोटांची पेरे यांमधील सांध्यापासून एका पावलाची सर्व बोटे गमावणे. .. | २० |

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४७ (क) द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४७ (ख) द्वारे मूळ संख्येऐवजी ही संख्या दाखल करण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४७ (ग) द्वारे मूळ संख्येऐवजी ही संख्या दाखल करण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४७ (घ) द्वारे मूळ संख्येऐवजी ही संख्या दाखल करण्यात आली (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | **अन्य इजा** | |
| ३१ | विकृतिसंकर न होता एक डोळा गमावला जाऊन दुसरा डोळा शाबुत राहणे. | ४० |
| ३२ | विकृतिसंकर न होता किंवा बुबुळ विद्रुप न होता एका डोळयाची दृष्टि जाऊन दुसरा डोळा शाबुत राहणे. | ३० |
| [१][ ३२क | एका डोळयाच्या दृष्टीची अंशतः हानी. .. .. | १०] |
| | **क-उजव्या किंवा डाव्या पंजाची बोटे गमावणे** | |
| | **तर्जनी** | |
| ३३ | संपूर्ण. .. .. .. .. | १४ |
| ३४ | दोन पेरांची हाडे. .. .. .. | ११ |
| ३५ | एका पेराचे हाड. .. .. .. | ९ |
| ३६ | हाड न गमावता टोक गिलोटिनने छाटावे लागणे. .. .. | ५ |
| | **मधले बोट** | |
| ३७ | संपूर्ण. .. .. .. .. | १४ |
| ३८ | दोन पेरांची हाडे. .. .. .. | ९ |
| ३९ | एका पेराचे हाड. .. .. .. | ७ |
| ४० | हाड न गमावता टोक गिलोटिनने छाटावे लागणे. .. .. | ४ |
| | **अनामिका किंवा करंगळी** | |
| ४१ | संपूर्ण. .. .. .. | ७ |
| ४२ | दोन पेरांची हाडे. .. .. .. | ६ |
| ४३ | एका पेराचे हाड. .. .. .. | ५ |
| ४४ | हाड न गमावता टोक गिलोटिनने छाटावे लागणे. .. .. | २ |
| | **ख-उजव्या किंवा डाव्या पावलाची बोटे गमावणे** | |
| | **अंगठा** | |
| ४५ | चवडा व बोटांची पेरे यामधील सांध्यामधून. .. .. | १४ |
| ४६ | काही भाग-हाडाची काहीशी हानी होऊन. .. .. | ३ |
| | **अन्य कोणतेही बोट** | |
| ४७ | चवडा व बोटांची पेरे यामधील सांध्यामधून. .. .. | ३ |
| ४८ | काही भाग-हाडाची काहीशी हानी होऊन. .. .. | १ |
| | **एका पावलाची अंगठा वगळून दोन बोटे** | |
| ४९ | चवडा व बोटांची पेरे यामधील सांध्यामधून. .. .. | ५ |
| ५० | काही भाग-हाडाची काहीशी हानी होऊन. .. .. | २ |
| | **एका पावलाची अंगठा वगळून तीन बोटे** | |
| ५१ | चवडा व बोटांची पेरे यामधील सांध्यामधून. .. .. | ६ |
| ५२ | काही भाग-हाडाची काहीशी हानी होऊन. .. .. | ३ |
| | **एका पावलाची अंगठा वगळून चार बोटे** | |
| ५३ | चवडा व बोटांची पेरे यामधील सांध्यामधून. .. .. | ९ |
| ५४ | काही भाग-हाडाची काहीशी हानी होऊन. .. .. | ३ |

१. १९८९ चा अधिनियम २९, कलम ४७ (ड) द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० ऑक्टोबर, १९८९ रोजी व तेव्हापासून).

[1][ तिसरी अनुसूची

(कलम ५२ क पहा)

**व्यवसायजन्य रोगांची सूची**

| अनुक्रमांक (१) | व्यवसायजन्य रोग (२) | कामधंदा (३) |
|---|---|---|
| | **भाग क** | |
| १ | व्यवसायात ज्यांची लागण होण्याचा खास करून धोका असतो असे संक्रामक आणि परजीवी रोग. | (क) आरोग्यास धोका पोहचविणारे सर्व प्रकारचे काम किंवा प्रयोगशाळेतील काम.<br>(ख) पशुवैद्यकीय कामाचा संबंध येणारे काम.<br>(ग) प्राणी, प्राण्यांचे शव, त्या शवांचे भाग किंवा प्राण्यांमुळे किंवा प्राण्यांच्या शवांमुळे जो दुषित झालेला आहे असा व्यापारीमाल यांच्या हाताळणी संबंधातील काम.<br>(घ) दुषित होण्याचा विशिष्ट धोका असलेले इतर काम. |
| २ | संपीडित वायुमध्ये काम केल्याने होणारे रोग .. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ३ | शिसे किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ४ | नायट्रस धुरामुळे होणारी विषबाधा .. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ५ | कार्बनी फॉस्फरसाच्या संयुगामुळे होणारी विषबाधा .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| | **भाग ख** | |
| १ | फॉस्फरस किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २ | पारा किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ३ | बेन्झीन किंवा त्याच्या विषारी समजातीय पदार्थामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ४ | बेन्झीन किंवा त्याचे समजातीय यांच्यापासून निघणाऱ्या विषारी नायट्रो व अमिडो पदार्थामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ५ | क्रोमिअम किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ६ | आर्सेनिक किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ७ | किरणोत्सारी पदार्थ आणि आयनकारी प्रारण यामुळे होणारे रोग. | किरणोत्सारी पदार्थाची प्रक्रिया किंवा आयनकारी प्रारण क्रिया संपर्कात आणणारे सर्व काम. |
| ८ | डांबर, खड्याडांबर, बिटूमेन, खनिजतेल, अॅन्थ्रासिन, किंवा संयुगे या पदार्थापासून उत्पादित होणारे पदार्थ व त्यांचे अवशेष यामुळे होणारा बाह्यत्वाचा ग्रंथीचा प्रथमावस्थेतील कर्करोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ९ | (अॅलिफटिक, अॅन्ड्रोमॅटिक सिरीजच्या) हायड्रोकार्बनचे विषारी हॅलोजनसाधित पदार्थ यामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १० | कार्बनडायसल्फाईड (द्विगंधिल) मुळे होणारे रोग. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ११ | इन्फारेड किरणोत्सर्गामुळे होणारा व्यवसायजन्य मोतीबिंदू. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १२ | मॅंगेनीज किंवा त्याच्या विषारी संयुगामुळे होणारे रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १३ | अन्यबाबीमध्ये अंतर्भूत नसलेले भौतिक, रासायनिक किंवा जीवशास्त्रीयकारक यामुळे होणारे त्वचारोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |

१. १९८४ चा अधिनियम ४५, कलम १४ अन्वये मूळ अनुसूचीऐवजी दाखल केली.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १४ | आवाजामुळे श्रवणशक्ती कमी होणे .. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १५ | डायनायट्रोफिनॉल किंवा त्याचे समजातीय किंवा डायनाय ट्रोफिनॉल ऐवजी वापरण्यात येणारे पदार्थ किंवा अशा पदार्थांचे क्षार यांमुळे होणारी विषबाधा. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १६ | बेरिलियम किंवा त्याची विषारी संयुगे यांमुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १७ | कॅडिनियम किंवा त्याची विषारी संयुगे यांमुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १८ | कामाच्या प्रक्रियेत अंगभूत असलेल्या मान्यताप्राप्त तीव्र संवेदनकारकांमुळे होणारा व्यवसायजन्य दमा. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| १९ | फ्लूओरिन किंवा त्याची विषारी संयुगे यांमुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २० | नायट्रोग्लिसरिन किंवा इतर नायट्रोॲसिड ईस्टन यामुळे होणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २१ | अल्कोहोल व केटोन्स यांमुळे होणारे रोग .. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २२ | कार्बन मोनॉक्साईड आणि त्याची विषारी साधिते, हायड्रोजन सल्फाईड यांसारख्या श्वासावरोधकामुळे रोणारे रोग. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २३ | ॲस्बेस्टॉसमुळे होणारा फुप्फुसाचा कर्करोग व मध्यकला अर्बुद (मिसोथेलिओमास). | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २४ | मूत्राशय किंवा वृक्क किंवा मूत्रनलिका यांच्या उपकला अभिस्तराचा (एपिथेलिअल लायनिंगचा) प्राथमिक अवस्थेतील अर्बुद (निओप्लाझम). | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| | **भाग ग** | |
| १ | दृढऊतिजनिक (स्क्लेरोजेनीक) धातु रज:कणांमुळे (सिलिकॉसस, अँग्राऊ सिलिकॉसिस ॲस्बेस्टॅसिस) होणारा, न्यूमोकोनिऑसिस आणि सिलिकोटयूबरक्यूलॉसिसमाल, परिणामी येणारी अक्षमता किंवा मृत्यू यांस कारणीभूत होण्यामध्ये सिलिकॉसिस हा अत्यावश्यक घटक असला पाहिजे. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| २ | बॅगॅसॉसिस .. .. .. | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ३ | कापूस, फ्लेक्स, ताग व सिसल यांचे रजकण यांमुळे होणारे श्वसनीफुप्फुस रोग (बायसिनॉसिस). | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ४ | जैवकण श्वसनावाटे आत गेल्यामुळे होणारा बहि:स्थ ॲलर्जीजन्य वायुकोशरोग (एक्स्ट्रिन्सिक अल्व्हीलायटिस). | संबंधित धोका असणारे सर्व काम. |
| ५ | कठीण धातूंमुळे होणारा श्वसनीफुप्फुस रोग .. | संबंधित धोका असणारे सर्व काम.] |